निबंध
७२९

# व्यक्तिचित्रें

लेखक :

वि. ह. कुलकर्णी,

एम्. ए.

प्रकाशक :

देशमुख आणि कंपनी,

२६४ नारायण,

पुणें २.

RFFBK-0006151

किंमत २ रुपये




म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १२९

# व्यक्तिचित्रें

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ठाणें

लेखक

प्रो. वि. ह. कुलकर्णी,
एम्. ए.

ग्रंथ संग्रहालय ठाणें
६१५१

प्रकाशक

देशमुख आणि कंपनी, पुणें २.

किंमत २ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक:
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
२६४ नारायण पेठ, पुणें २.

संचालक:
भ. व्यं. देशमुख,
बी. ए., एल्एल्. बी.

[ या पुस्तकाचे उतारे घेणें व पुढील सर्व आवृत्त्यांचे हक्क लेखकाकडे आहेत. ]

मुद्रक:
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण पेठ, पुणें २.

कै० चि. विश्वनाथ

याच्या

प्रेमळ स्मृतीस

# व्यक्तिचित्रें

—प्रो. वि. ह. कुलकर्णी,
एम्. ए.

## आमचीं प्रकाशनें

**रॉय-चरित्र**
भाई बेके

**फुलें आणि दगड**
वि. स. खांडेकर

**पुनर्जन्म**
साने गुरुजी

**काव्यज्योति**
परिचय ले. : वि. स. खांडेकर

**पारंब्या**
आनंदीबाई जयवंत

**सायंकाल**
वि. स. खांडेकर

**ढासळलेले बुरूज**
लक्ष्मणराव सरदेसाई

**आणखी चिमणराव**
चिं. वि. जोशी

**सख्याहरी**
दत्तु बांदेकर

**पहिलें प्रेम**
वि. स. खांडेकर

**अवशेष**—ग. त्र्यं. माडखोलकर

**आस्तिक**—साने गुरुजी

**तात्या**—ना. धों. ताम्हनकर

**व्यक्तिचित्रें**
प्रो. वि. ह. कुलकर्णी, एम्.ए.

**सहा भाषणें**
वि. स. खांडेकर

**अश्रु**
वि. स. खांडेकर

**नवे संसार**
ग. त्र्यं. माडखोलकर

**खऱ्या-खोट्या आठवणी**
प्रो. वा. म. जोशी

**घरट्याबाहेर**
वि. स. खांडेकर

**क्रौंचवध**
वि. स. खांडेकर

**तिसरी भूक**
वि. स. खांडेकर

**?** ( एक नावीन्यपूर्ण कादंबरी )
ग. त्र्यं. माडखोलकर

**छाया**
वि. स. खांडेकर

**माझे आवडते कवि**
ग. त्र्यं. माडखोलकर

**अविनाश**
वि. स. खांडेकर

**?** ( लघुनिबंध )
अनंत काणेकर

## पुढील प्रकाशनें



जी. के. चेस्टर्टन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६१५१

# जी. के. चेस्टर्टन

वाङ्मयनैपुण्याबद्दल या खेपेचें नोबेल प्राइझ एका जर्मन लेखकाला मिळाल्याचें प्रसिद्ध होण्यापूर्वी या बहुमानाला लायक अशा ज्या लेखकांचीं नांवें घेण्यांत येत होतीं त्यांत चेस्टर्टन यांच्या नांवाचा प्रथम उल्लेख केला जात होता. यावरून लेखक या नात्यानें चेस्टर्टन यांचा लौकिक आज केवढा मोठा आहे याची कल्पना येईल. चेस्टर्टन हे कवि आहेत, निबंधकार आहेत, कथालेखक आहेत, टीकाकार आहेत, इतिहासकार आहेत व चरित्रकार आहेत. त्यांनीं एक नाटक-देखील लिहिलें असून रंगभूमीवर त्याचे प्रयोगहि इतके उठावदार झाले कीं, त्याबद्दल बर्नार्ड शॉसारख्या भरतमुनींनेंसुद्धां त्यांची पाठ थोपटली. त्यांच्या वाङ्मयप्रपंचाचा पसारा इतका मोठा आहे कीं, सरस्वतीच्या मंदिरांत असें एकहि दालन नाहीं कीं, ज्यांत त्यांजकरितां जागा राखून ठेवलेली नाहीं. धार्मिक, सामाजिक आणि

राजकीय विषयांची अगदीं स्वतंत्र बुद्धीनें व निर्भीडपणें चर्चा करणाऱ्या लेखकांत आज ते प्रामुख्यानें झळकतात. तेव्हां अशा विख्यात आणि अष्टपैलू ग्रंथकारासंबंधीं चार शब्द लिहून त्यांच्या मतांची वाचकांस ओळख करून देणें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें.

चेस्टर्टन यांनीं अजूनपर्यंत लिहिलेल्या अठ्ठेचाळीस पुस्तकांमध्यें त्यांनीं लिहिलेल्या इतर किरकोळ लेखांची भर घातली तर ही ग्रंथ-संख्या सहज पन्नासांवर जाईल. परंतु हा प्रचंड ग्रंथसंग्रह चेस्टर्टन यांच्या कोटाच्या खिशामध्यें सहज मावण्यासारखा आहे ! कारण चेस्टर्टन यांच्या शरिराचा आकाराच तसा अफाट आहे. शंभर पुत्रांना जन्म देऊन स्वतः काळोखांत तोंड लपवून बसणाऱ्या गांधारीप्रमाणेंच बहुतेक ग्रंथकारांची स्थिति असते. चेस्टर्टन यांचें व्यक्तिवैशिष्ट्य अगदीं अपूर्व आहे. त्यांनीं जरी आणखी शेंपन्नास पुस्तकें खरडलीं, तरी त्यामुळें त्यांच्या व्यक्तिगत महत्त्वाला ग्रहण लागेल अशी धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. आपल्या ग्रंथसंपत्तीच्या सिंहासनावर पूर्ववत् आरूढ होऊन स्वतःचा थोरपणा प्रस्थापित केल्याशिवाय ते कदापि राहणार नाहींत. चेस्टर्टन यांची एकामागून एक ग्रंथ निर्माण करण्याची शक्ति तशीच अलौकिक असल्यामुळें त्यांच्या पुस्तकांच्या बैठकीला मजबूतपणा येण्याचा संभव आहे म्हणून बरें; नाहीं तर चेस्टर्टन यांच्या विशाल देहाच्या भाराखालीं त्यांच्या बैठकीचा तेव्हांच चुराडा व्हावयाचा ! एक काळ असा होता कीं, त्या वेळीं चेस्टर्टन यांचे लेख न वाचलेला असा एखादा सुशिक्षित इसम लंडनमध्यें आढळला असता, परंतु त्यांची भव्य आकृति ज्याच्या दृष्टीस पडलेली नाहीं असा कोणी सापडला नसता. शेंकडों लोकांच्या गर्दीमध्यें चेस्टर्टन यांना अगदीं दुरूनहि नेमकें ओळखतां येईल एवढा त्यांच्या

शरीराचा आकार आहे. लंडन शहरांतील फ्लीट किंवा स्ट्रँड या रस्त्यांवरून 'नमवी पहा भूमि हा चालतांना' अशा धैर्यधराप्रमाणें चेस्टर्टन जाऊं लागले म्हणजे लोक थबकून चकित नयनांनीं त्यांचेकडे पाहत उभे राहत असत, अशी त्यांजविषयीं एक दंतकथा आहे. ऑम्निबसमधून प्रवास करतांना एकदां चेस्टर्टन यांनीं उठून तीन स्त्रियांना बसण्यास जागा करून दिल्याचा वृत्तान्त प्रसिद्ध आहे. यावरून चेस्टर्टन यांच्या स्त्रीदाक्षिण्याप्रमाणें त्यांच्या शरिराच्या अवाढव्यपणाचीहि कल्पना येईल. रस्त्यांतून जात असतांना एकदां चेस्टर्टन यांची एका गाडीशीं टक्कर होऊन त्यांचा हात दुखावला. त्याबद्दल त्यांच्या एका मित्रानें त्यांजविषयीं जेव्हां सहानुभूतीचे उद्गार काढले तेव्हां चेस्टर्टन म्हणाले, 'मजविषयीं कशाला, गाडीबद्दलच सहानुभूति दाखवा; कारण एखाद्या किरकोळ गाडीची माझ्याशीं टक्कर झाली असती तर तिचे सर्व अवयव मीं खिळखिळे करून टाकले असते.' मेजवानीचे प्रसंगीं चेस्टर्टन यांच्या भारामुळें कुरकुर करूं लागलेल्या खुर्चीवरून त्यांस उठावयास सांगून जेव्हां त्यांना दुसरी एक भलीभक्कम खुर्ची देण्यांत आली तेव्हां ते विनोदानें म्हणाले, 'मेजवानीला बोलाविलेल्या पाहुण्यांची काळजी घेण्याऐवजीं येथें लाकूड-सामानाचीच जास्त काळजी घेतली जात आहे असें दिसतें'. परंतु चेस्टर्टन यांचें ऐनतारुण्यांतील शरीर आतां राहिलेलें नाहीं. थोड्याच दिवसांपूर्वीं चेस्टर्टन यांचें व्याख्यान ऐकण्यास तिकिटें काढून गेलेल्या कांहीं अमेरिकन लोकांस आपले पैसे फुकट गेले असें वाटलें; कारण काय, तर चेस्टर्टन यांच्या लठ्ठपणाविषयीं लोकांनीं त्यांची जी समजूत करून दिली होती तितके कांहीं ते लठ्ठ दिसले नाहींत हें होय! चेस्टर्टन यांची देहयष्टि पूर्वीच्याहून

कृश दिसावी हें अगदीं स्वाभाविक आहे. त्यांचें वय आतां साठीच्या जवळ आलें आहे. त्यांचा जन्म लंडन येथें सन १८७४ सालीं झाला. चेस्टर्टन यांचे लेख वाचले म्हणजे एकंदर प्राचीन संशोधनाविषयीं त्यांचें मन कलुषित झालेलें दिसतें. प्राचीन काळाविषयीं ठाम सिद्धान्त बांधतांना काल्पनिक प्रमाणें बळकट पुरावे म्हणून इतिहाससंशोधक जेव्हां पुढें आणतात तेव्हां त्यांचा उपहास करण्याकडेच चेस्टर्टन यांची प्रवृत्ति दिसते. आपल्या बालपणींच्या आठवणी लिहितांनासुद्धां या उपहासात्मक लेखनपद्धतीचा त्यांनीं अवलंब केला आहे. आपल्या गतआयुष्याचें सिंहावलोकन करतांना ते लिहितात, " तर्कशास्त्राच्या आधारावरच मी जन्मलों आहे असें विधान मी करूं शकतों. माझा बाप्तिस्मा झाला आहे या सिद्धान्तालाहि आप्तवाक्याखेरीज दुसरा पुरावा नाहीं ! चेस्टर्टन यांचें घराणें मूळ प्रॉटेस्टंट; परंतु चेस्टर्टन यांच्या धार्मिक विचारांत एकाएकीं क्रांति झाल्यामुळें भावनावशतेच्या भरांत त्यांनीं कॅथॉलिक पंथाचा अंगीकार केला. सेंट जॉर्ज ही इंग्लंडची राष्ट्रीय विभूति म्हणून आपला बाप्तिस्मा सेंट जॉर्ज या नांवाच्या मंदिरांत झाला याबद्दल चेस्टर्टन यांना अभिमान वाटतो. याच चर्चच्यासमोर वॉटर वर्क्स टॉवर आहे. चेस्टर्टन म्हणतात, 'फेबिअन सोसायटीच्या एखाद्या सभासदाला जर आपला बाप्तिस्मा या वॉटर वर्क्समध्यें झाला असता तर धन्यता वाटली असती.' बर्नार्ड शॉ हे उपरोक्त फेबिअन सोसायटीचे एक कट्टर सभासद आणि मतप्रसाराचे प्रत्येक बाबतींत त्यांचा व चेस्टर्टन यांचा उभा दावा. तेव्हां बाप्तिस्म्यासंबंधींचा वरील टोमणा कोणाला उद्देशून आहे हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. वॉटर वर्क्स टॉवरच्यासमोर असलेलें चर्च हें चेस्टर्टन यांच्या भाविक बुद्धीला आणि धार्मिक दृष्टीला जरी

कितीहि पूज्य वाटलें तरी चेस्टर्टन हे लहान असतां त्यांच्या बालबुद्धीला या टॉवरनें इतकें मोहून टाकलें होतें कीं, पुढें त्यांनीं आपलें 'The Napoleon of Notting Hill' हें अत्यंत गमतीदार पुस्तक याच टॉवरसंबंधीं लिहिलें आहे. बर्नार्ड शॉ यांनीं एकदां 'आपलें शाळेंतील शिक्षण' या विषयावर एक व्याख्यान दिलें त्यांत शाळेंत दिल्या जाणाऱ्या एकंदर शिक्षणपद्धतीवर यथेच्छ तोंडसुख घेऊन झाल्यावर त्यांनीं शेवटीं व्याख्यानाचा समारोप करतांना सांगितलें कीं, 'माझ्या खऱ्या शिक्षणाला सुरुवात शाळेंतून बाहेर पडल्यानंतरच झाली!' चेस्टर्टन यांचा शाळेंतील अनुभव याहून फारसा भिन्न नाहीं. चेस्टर्टन म्हणतात कीं, 'मी ज्या शाळेंत जात असे तींत शाळा चुकविण्याला पोषक असेंच शिक्षण दिलें जात असे.' बहुतेक सर्व कवींप्रमाणें चेस्टर्टन यांनींहि आपल्या काव्यरचनेला प्रारंभ शाळेंत असतांनाच केला होता व हें कवितेचें वेड त्यांना त्या वेळीं इतकें लागलें होतें कीं, त्यांचा शाळेंतील अभ्यासाचा बहुतेक वेळ यमकें जुळविण्याकडेच जात असे. त्या वेळचा आपला गचाळ काव्यसंग्रह आज उपलब्ध होत नाहीं याबद्दल चेस्टर्टन हे समाधान व्यक्त करीत असतात. त्यांतीलच एका विशेष गचाळ कवितेबद्दल त्यांना एकदां बक्षिसहि मिळालें होतें! प्राथमिक शिक्षण कसेंबसें आटोपल्यावर चेस्टर्टन चित्रकलेचें ज्ञान संपादन करण्याकरितां दुसऱ्या एका शाळेंत जाऊं लागले. परंतु कवि असूनदेखील या ललितकलेचा त्यांना लवकरच कंटाळा येऊं लागला. डामडौलाबद्दल प्रसिद्ध असलेल्या शहरांत ज्याप्रमाणें पोषाकाच्या बाबतींत अगदीं थोड्या अवधीमध्यें फार स्थित्यंतरें होत असतात व कपड्यांचा आज शिष्ट गणला गेलेला आकार उद्यां जुना-पुराणा म्हणून मानला जातो; चित्रकलेमध्येंहि

कांहीं अंशीं हाच प्रकार दिसून येतो. पोषाकाप्रमाणें चित्रकलेचे देखील निरनिराळे संप्रदाय आहेत. अशा संप्रदायांपैकीं भावचित्रांची पद्धति चेस्टर्टन यांच्या लहानपणीं रूढ होती. या पद्धतीचा विशेष म्हणजे कोणत्याहि वस्तूचें चित्र हुबेहूब न काढतां ती वस्तु पाहून चित्रकाराच्या मेंदूवर जो परिणाम होईल तो त्यानें निरनिराळ्या रंगांच्या साहाय्यानें व्यक्त करावयाचा. वस्तूच्या साम्यापेक्षां चित्रकाराच्या भावनेलाच अधिक प्राधान्य दिलें जाई. ही विचित्र पद्धति फार दिवस टिकण्याचा बिलकुल संभव नव्हता. अशा रीतीनें वारंवार रंग पालटणाऱ्या चित्रकलेचा चेस्टर्टन यांना अर्थातच वीट आला व त्याविरुद्ध त्यांनीं बंडाचें निशाण उभारलें. चित्रकलेविषयीं त्या वेळीं रूढ असलेल्या कल्पना बदलून टाकण्याकरितां आपणांला किती भगीरथ प्रयत्न करावे लागले याचें वर्णन करतांना चेस्टर्टन म्हणतात. 'गवताचा रंग हिरवा असतो हें सत्य त्या वेळच्या चित्रकारांच्या गळीं उतरविण्यास मला किती तरी यातायात करावी लागली व शेंकडों लेख लिहावे लागले.' परंतु हे शाब्दिक वादविवाद खेळण्यांत चेस्टर्टन यांना जी शक्ति खर्ची घालावी लागली तीच जर त्यांनीं चांगलीं चित्रें काढण्याकडे लावली असती तर ते चांगले चित्रकार तरी झाले असते. चित्रकलेवर कितीहि लेखमाला लिहिल्या तरी त्यामुळें चांगलीं चित्रें काढण्यांत येतील असें थोडेंच आहे? परंतु चित्रकलेवरील आपल्या लेखांमुळें आपणांला ब्रश नीट फिरवितां आला नाहीं तरी लेखणी चांगली चालविण्याचा सराव झाला याबद्दलच त्यांना अधिक समाधान वाटलें. चित्रकलेचें जें थोडें-फार ज्ञान चेस्टर्टन यांनीं या काळांत संपादन केलें तें त्यांनीं अगदींच वायां दवडलें असें म्हणतां येत नाहीं. कारण त्यांचीं व त्यांच्या कांहीं

मित्रांचीं जीं कांहीं सचित्र पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांतलि चित्रें चेस्टर्टन यांनींच काढलेलीं आहेत; त्यावरून या कलेंत त्यांनीं किती प्रगति केली होती हें दिसून येतें.

चेस्टर्टन यांच्या खऱ्या लेखनास प्रारंभ बोअर युद्धापासून झाला. चेस्टर्टन यांची लढाऊ लेखक म्हणून प्रसिद्धि आहे. मात्र या प्रसंगीं त्यांनीं युद्धाच्या विरुद्ध शस्त्र उगारलें होतें. इंग्रज लोकांनीं दक्षिण आफ्रिकेंत बोअर लोकांविरुद्ध लढण्याकरितां रणक्षेत्रांत पाय ठेवला आणि या युद्धाविरुद्ध मोहीम सुरू करण्याकरितां चेस्टर्टन यांनीं वाङ्मय-क्षेत्रांत पाय ठेवला. स्वातंत्र्यप्रिय बोअर लोकांना नतशीर्ष करण्याकरितां इंग्लंडनें हातांत तरवार घेतली आणि साम्राज्यलालसेस इंग्लंडनें बळी पडूं नये म्हणून चेस्टर्टन यांनीं हातांत लेखणी धरली. परंतु इंग्लंडां-तील बहुजनसमाजाच्या डोळ्यांवर आलेली साम्राज्यसत्तेची धुंदी उतरली नसल्यामुळें तरवारींच्या खणखणाटांत चेस्टर्टन यांच्यासारख्या अल्पमतवाल्यांची आरडाओरड कोणाला ऐकूंहि गेली नाहीं. बोअर-युद्धाविरुद्ध पुकारलेलें हें वाग्युद्ध चालू असतांनाच, चेस्टर्टन यांची हिलेअर बेलॉक यांच्याशीं ओळख होऊन पुढें तिचें दृढ मैत्रींत रूपां-तर झालें. चेस्टर्टन आणि बेलॉक यांच्या लिखाणांत एक विशिष्ट प्रकारचें व ठळकपणें नजरेस येईल असें साम्य असल्यामुळें बर्नार्ड शॉ यांनीं या दोन व्यक्तींचें पृथक् अस्तित्व कबूल करण्याचें नाकारून त्यांनीं चेस्टर-बेलॉक या संयुक्त नामाभिधानानें त्यांना संबोधण्यास सुरुवात केली. चेस्टर्टन आणि बेलॉक दोघेहि रोमन कॅथॉलिक पंथाचे कडवे पुरस्कर्ते. दोघांचीहि लेखनांतील धडाडी विलक्षण, दोघांचाहि आत्मविश्वास दांडगा, वावदूकपणांत दोघेहि कोणाला हार जाणार नाहींत; दोघांचीं शरीरेंदेखील एकमेकांशीं स्पर्धा करतील अशीं भक्कम;

तेव्हां बर्नार्ड शॉ यांस या दोन व्यक्तींमध्यें एकच विराट् पुरुष दिसावा हें अगदीं स्वाभाविक आहे.

राजकारणांत चेस्टर्टन हे आपणास उदारमतवादी म्हणून म्हणवितात. आयर्लंडला स्वराज्य द्यावें असें त्यांचें पहिल्यापासून मत होतें. त्या काळीं राजकारणाचा गाडा पैशाचे चाकांवर ढकलला जात होता. लाचलुचपतीचे प्रकार जवळ जवळ उघडपणेंच चालत. परन्तु त्यांविरुद्ध ब्र काढण्याची कोणाची छाती होत नसे. चेस्टर्टन यांनीं राजकारणांतील ही घाण चवाठ्यावर आणण्याकरितां कंबर कसली आणि आपले बंधुराज ( हे पुढें महायुद्धांत कामास आले ) सेसिल चेस्टर्टन यांच्या मदतीनें त्याकरितां एक मुद्दाम वर्तमानपत्र काढून आपल्या मोहिमेला सुरुवात केली. चेस्टर्टन हे शब्दपंडित असले तरी कायदेपंडित नाहींत. वाङ्मयाच्या उच्च वातावरणांत स्वैर विहार करतां आला तरी, राजकारणाच्या खडकाळ जमिनीवर न ठेचाळतां दौड करणें किती अशक्य असतें याचा चेस्टर्टन यांना अनुभव नव्हता. पण तो अनुभव त्यांना लवकरच आला. मार्कोनी-चौकशीच्या प्रकरणांत अब्रूनुकसानकारक लेख लिहिल्याबद्दल त्यांजवर फिर्याद होऊन त्यांच्या पत्राला दंड झाला व पुढें तें लवकरच बंद पडलें. ललितवाङ्मयांत कल्पनेचें खोटें जाळें पसरून त्यांत वाचकाला गुरफटवून टाकल्यास त्याबद्दल त्याची स्तुति होते; परंतु राजकारणांत खऱ्या गोष्टींचा मोकळ्या मनानें नुसता उल्लेख केल्याबद्दल लेखक स्वतःच कायदेकानूंच्या जाळ्यांत कसा सापडतो याचा अनुभव चेस्टर्टन यांस या वेळीं आला. चेस्टर्टन यांच्या भावाचें वर्तमानपत्र जरी बंद पडलें तरी त्यांनीं इतर नियतकालिकांतून राजकीय व सामाजिक मतप्रतिपादनाचें आणि प्रसाराचें आपलें व्रत अखंड चालू ठेवलें.

चेस्टर्टन यांचें बहुतेक लिखाण वादाविवादात्मक आहे. प्रतिपक्षावर तुटून पडण्याच्या धांदलींत भाषेची डागडुजी व साफसफाई करण्याला ते थांबत नसल्यामुळें जिभेप्रमाणेंच त्यांच्या लेखणीचीहि गति अप्रतिहत आहे. कित्येक वेळां तर त्यांचें तोंड व लेखणी हीं एकसमयावच्छेदें निरनिराळया विषयांवर चालूं असतात. चेस्टर्टन यांनीं एखाद्या साप्ताहिकाला लेख द्यावयाचें कबूल करावें, शेवटच्या घटकेपर्यंत त्याचा त्यांना विसर पडावा, संपादक-महाशयांनीं त्यांचा पाठलाग करून त्यांजकडून लेख आंणण्याकरितां माणसांची तुकडी रवाना करावी आणि मग चेस्टर्टन यांना लेखाविषयीं आठवण करून दिल्यावर मित्रांच्या घोळक्यांत त्यांजबरोबर गप्पा ठोकीत असतां व हास्यविनोद करीत असतां लेखाचीं पानेंच्या पानें कोठेंहि खोडाखोड न करितां लिहून द्यावीं हा त्यांजविषयींचा नेहमींचा अनुभव आहे !

लेखक म्हणून प्रसिद्धि होण्यापूर्वीं चेस्टर्टन यांची सांपत्तिक स्थिति फारच हलाखीची होती. त्यांच्या 'Twelve Types' या नांवाच्या पुस्तकाला प्रकाशक कसा मिळाला यासंबंधींची हकीकत जितकी करुणाजनक आहे तितकीच हास्यकारक आहे. चेस्टर्टन यांनीं उपरोक्त पुस्तकाची रूपरेषा एका हॉटेलांत खिशांत शिल्लक राहिलेला शेवटचा एक आणा खर्च केल्यानंतर तेथल्या तेथेंच लिहून काढली आणि पुस्तक लिहून पुरें झाल्यावर एका प्रकाशकानें पुस्तकाच्या निव्वळ नांवावरून तें प्रसिद्ध करण्याचें कबूल केलें ! या नांवांत काय जादू भरली होती याचा उलगडा चेस्टर्टन यांना मागाहून आला. Twelve Types या पुस्तकांत चेस्टर्टन यांनीं निरनिराळया बारा साहित्यसेवकांवर छोटे निबंध लिहिले आहेत. परंतु सर्वच प्रकाशक पुस्तकांतील मजकूर वाचून पुस्तक छापण्याला लायक आहे किंवा

नाहीं हें थोडेंच ठरवितात ! त्यांची दृष्टि अगदीं उथळ आणि वरवरची असते. चेस्टर्टन यांच्या सुदैवानें त्यांना या प्रसंगीं असाच एक गाजरपारखी प्रकाशक भेटला. पुस्तकाच्या नांवावरून त्याला वाटलें कीं, त्यांत निरनिराळया बारा ठशांची म्हणजे खिळ्यांची माहिती दिलेली असून छपाईचें काम सुलभ कसें होईल याविषयीं त्यांत चर्चा केली आहे. प्रकाशकाचें पुस्तकांतील मजकुराविषयांचें अज्ञान आणि चेस्टर्टन यांचें पुस्तकाच्या नांवाच्या गूढार्थाविषयींचें अज्ञान पुस्तक छापून प्रसिद्ध झाल्यावर एकमेकांनीं एकमेकांच्या नजरेस आणलें. परंतु खिळे जुळविणाऱ्या या प्रकाशकाला आपली चूक इतक्या उशिरां कळून आल्यामुळें नंतर तिची दुरुस्ती करणें त्याच्या हातांत राहिलें नाहीं. पश्चात् ज्ञान हें नेहमीं पश्चात्तापालाच कारणीभूत व्हावयाचें. प्रसूत झालेल्या मुलांचें रडणें कानीं पडल्यावर नंतर आईनें आपल्या गरोदरपणाविषयीं आश्चर्य प्रकट करावें त्यांतलाच हा प्रकार झाला. नांवांत काय आहे असें म्हणणाऱ्या लेखकांनीं तरी या गोष्टीपासून योग्य तो बोध घ्यावा !

चेस्टर्टन यांचा स्वभाव जात्याच भांडखोर. वादांग माजविल्याखेरीज त्यांना चैन पडतच नाहीं. उत्तरेंप्रत्युत्तरें करण्याची एकदां सवय जडली म्हणजे मग तें एक व्यसनच होऊन बसतें. आणि मग अगदीं सरळ व स्पष्ट विधानांसंबंधींहि शंकाकुशंका व तर्कवितर्क यांचें जाळें विणीत बसण्याचा मोह पडतो, वादविवादाच्या इंजिनाला एकदां चालना मिळाली म्हणजे शब्दार्थ, वाच्यार्थ, व्यंग्यार्थ वगैरे प्रकारांनीं काढलेला शब्दांचा कीस आणि अर्थाची ओढाताण यांचे डबेदेखील मागोमाग येतात आणि एकदां या गाडीला वेग आला म्हणजे तो तिला थांबवितां येत नाहीं. धोक्याच्या सूचना तिला सुचतनाशा होतात आणि तत्त्वबोधाचें शेवटचें ठिकाण गाठण्यापूर्वींच शहाणपणाच्या रुळांवरून भ्रष्ट

होऊन ती कोलमडून पडण्याचा बराच संभव असतो. शब्दांचा आणि कल्पनांचा हुतुतू घालण्यांत निढावलेल्या लेखकांना असल्या वादविवादांत भाग घ्यावयाला एक प्रकारचा आनंद होत असतो. आगगाडीनें सोडलेल्या धुराच्या लोळांतहि कांहीं अग्निस्फुलिंग प्रकाशमान् झालेले दिसतात त्याचप्रमाणें असल्या वादविवादाच्या धुरळ्यांतूनहि कांहीं उज्ज्वल तत्त्वें दृष्टोत्पत्तीस येतात, नाहीं असें नाहीं. चेस्टर्टन यांनीं आजवर जी प्रसिद्धि मिळविली आहे ती आपल्या वादविवादपटुत्वावरच होय. त्यांचा कीर्तिचंद्र या वाङ्मंथनांतूनच उदित झाला आहे, असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. चेस्टर्टन यांचा सगळा वाङ्मयप्रपंच पूर्वपक्ष व उत्तरपक्ष करण्यावरच चालत आलेला आहे हें त्यांनीं लिहिलेले ग्रंथ अगदीं वरवर चाळल्यानेंहि कळून येतें. कोळ्याप्रमाणें आपल्या शरिरापासूनच निर्माण केलेल्या धाग्यादोऱ्यांनीं स्वतःचें निवासस्थान बनविणारे वाग्वीर अगदीं विरळा. आपल्या वृक्षावरील कोवळ्या पानांनीं आपलें घर बांधणारे किडे आणि ठिकठिकाणच्या काड्या आणि गवताच्या काड्या गोळा करून आपलें घरटें सजविणारे पक्षी यांचाच भरणा जास्त. वाङ्मयक्षेत्रांत चेस्टर्टन यांनीं आपल्या ग्रंथांचीं जीं मंदिरें उभारलीं आहेत त्यांची बहुतेक सामुग्री त्यांनीं इतरांचीं मंदिरें पाडूनच मिळविली आहे हें कबूल करावें लागेल. परंतु त्यांनीं उभारलेल्या मंदिरांच्या रचनेंतील कल्पकता खुद्द चेस्टर्टन यांचीच असल्यामुळें त्यांच्या कारागिरीला वैगुण्य येत नाहीं. या मंदिरांतील मूर्तींची घडण त्यांनीं स्वतःच केली असल्यामुळें त्यांच्या श्रेष्ठपणाला बाध येत नाहीं. परंतु चेस्टर्टन यांची खरी थोरवी या मूर्तींत प्राणप्रतिष्ठा करून आपल्या श्रद्धायुक्त अंतःकरणानें त्यांत नवचैतन्य निर्माण केलें यावरच अवलंबून राहील. वादविवादाचें

चेस्टर्टन यांना बाळकडूच पाजलें होतें असें म्हणावें लागतें. कारण आपल्या तरुणपणच्या आठवणींत ते लिहितात, "माझा वेळ नेहमीं वादविवाद करण्यांत जाई. जो भेटेल त्याजबरोबर माझा भाऊ वाग्युद्ध सुरू करी आणि मी माझ्या भावाबरोबर पूर्वपक्ष-उत्तरपक्ष करीत असे. ज्या वेळीं माझा भाऊ मजबरोबर नसे त्या वेळीं मी स्वतःशींच भांडत असे आणि अशा चुरशीच्या वादविवादांतूनच माझें बहुतेक वाङ्मय बाहेर पडलेलें आहे."

तेव्हां चेस्टर्टन यांच्यासारख्या अभिजात वाग्वीराविषयीं कांहींहि लिहावयाचें म्हणजे साहित्यक्षेत्रांत ज्या ज्या व्यक्तींशीं त्यांनीं दोन हात केले त्या सर्वांचा उल्लेख करावा लागेल. रुडयार्ड किप्लिंग यांचा साम्राज्यवाद, थॉमस हार्डी यांचा निराशावाद, एच्. जी. वेल्स यांचा प्रगतिवाद, ऑस्कर वाइल्ड व उमर ख्य्याम यांचा सुखवाद, या सर्वांशीं सरसकट चेस्टर्टन यांचा विरोध आहे. बर्नार्ड शॉ यांच्या बाबतींत तर या विरोधाला अनेक फाटे फुटलेले आहेत. शॉ यांनीं एक मत पुढें मांडलें आणि चेस्टर्टन यांनीं त्याविरुद्ध आपलें मत प्रतिपादन करण्यास सुरुवात केली नाहीं असें आजपर्यंत कधींच घडलें नाहीं. या दोन प्रसिद्ध व्यक्तींचे सार्वजनिक वादविवाद हा एका काळीं लंडन शहरांतील लोकांचा एक करमणुकीचा प्रकारच होऊन बसला होता. दोघेहि लेखनकलेंत जितके निष्णात आहेत तितकेच किंबहुना त्यापेक्षां अधिकच वादविवाद करण्यांत प्रवीण आहेत. बोलायला उभे राहिले म्हणजे नवीन कल्पना, तिखट कोट्या, आणि कठोर टीका यांचा प्रतिपक्षावर नुसता पाऊस पडावयाचा. वादविवादाच्या बाबतींत शॉ आणि चेस्टर्टन यांच्यामध्यें सरस-निरस ठरविणें फार कठीण आहे. शॉ हे कल्पनेच्या कोलांट-

उड्या घेण्यांत जितके वाकबगार आहेत तितकेच चेस्टर्टन हे शब्दांवर कसरत करण्यांत तरबेज आहेत. तथापि चेस्टर्टन पुष्कळ वेळां फारच सावकाश बोलतात व कोटि करण्याच्या पूर्वी आपण स्वतःच हसतात; त्यामुळें त्यांचें भाषण नेहमींच परिणामकारक होतें असें नाहीं. याच्या उलट शॉ यांचा वाक्प्रवाह इतका अस्खलित व झपाट्यानें असतो कीं, सामान्य बुद्धीचा मनुष्य अगदीं गांगरून, न कळत भाषणाच्या ओघाबरोबर वाहवत जातो. तथापि प्रतिपक्षावर तुटून पटण्यांत चेस्टर्टन कांहीं कमी नाहींत. बोलण्या-प्रमाणें लिहिण्यांतहि चेस्टर्टन हे लढाऊ बाणा आणि आवेश दाखवीत असतात. शिखंडीला पुढें करून मागून बाण सोडणाऱ्या अर्जुनाप्रमाणें युद्ध करणें चेस्टर्टन यांना मान्य नाहीं. भीमसेनाप्रमाणें शत्रूला त्याच्या नांवावें हटकावें व त्याच्यासमोर जाऊन त्याच्या टाळक्यांत गदेचा टोला हाणावा यांत त्यांना मौज वाटते. हे वाद-विवादाचे खटके वारंवार उडण्याचें कारण चेस्टर्टन यांचीं तऱ्हेवाईक व एकान्तिक मतें होत. इंग्लंडांतील राजधर्म व राष्ट्रधर्म प्रॉटेस्टंट; तर चेस्टर्टन हे कडवे रोमन कॅथॉलिक. आपल्या भाषणांत आणि लिखाणांत रोमन कॅथॉलिक पंथाचे पोवाडे त्यांनीं खड्या सुरांत गाइले नाहींत असें कधींहि व्हावयाचें नाहीं. आपण रोमन कॅथॉलिक असल्याबद्दल ते आपल्या ग्रंथांतून इतक्या वेळां सांगत असतात, कीं त्यावरून त्यांच्या धर्मश्रद्धेविषयीं त्यांचा लोकांवर, कीं लोकांचा त्यांच्यावर विश्वास बसत नाहीं, याचें कोडें पडतें. आजची इंग्लंडांतील जनता वैवाहिक बंधनें शिथिल करण्याला तयार, तर चेस्टर्टन तीं अधिक दृढ करावीं या मताचे. काडीमोड त्यांना एकदम नापसंत! अमेरिकें-तील दारूबंदीचा कायदा त्यांना निव्वळ जुलमाचा वाटतो. दारू

विणें हा व्यक्तीचा एक धार्मिक व निसर्गसिद्ध हक्क आहे असें त्यांचें मत! सोशियालिझमची लाट आज सगळ्या जगांत उसळली असून खुद्द इंग्लंडचा राज्यकारभारहि आज सोशियालिस्ट मंत्रिमंडळाच्या ताब्यांत आहे. चेस्टर्टन हे सोशियालिझमचा कडक शब्दांत निषेध करणारे आहेत. जगांतील सर्व राष्ट्रांचें एकछत्री साम्राज्य करण्याची आजच्या मुत्सद्द्यांची महत्त्वाकांक्षा, तर या एकछत्री साम्राज्याचीं अनेक शकलें पाडण्यास चेस्टर्टन टपलेले! सुप्रजाजनन आणि संततिनियमन या शास्त्रांविरुद्ध चेस्टर्टन हातांत शस्त्र घेऊन नेहमींच सज्ज आहेत! माकडापासून पुढें मनुष्याची उत्पत्ति झाली या उत्क्रांतिवादाचा नायनाट करण्याचें चेस्टर्टन आणि हिलेअर बेलॉक यांनीं जणूं कंकणच बांधलेलें आहे. यांत्रिक सुधारणेविषयीं त्यांचें मन पुरें विटून गेलें आहे. भविष्यकाळांत रामराज्याची अपेक्षा करणारांची चेस्टर्टन यांनीं टर उडविली नाहीं असा त्यांचा एक दिवसहि जात नसेल. अशा परिस्थितींत आपल्या पुरामतांचा पुरस्कार परिणामकारक करून दाखवावयाचा असल्यास प्रथम सुधारणा सुधारणा म्हणून कांगावा करणाऱ्या आधुनिक क्रांतिकारक लेखकांच्या मतांविषयीं तिरस्कार उत्पन्न होईल अशा रीतीनें त्यांजवर हल्ला केला पाहिजे हें ओळखून चेस्टर्टन यांनीं आपणांविरुद्ध असलेल्या सरसकट सर्व समकालीन लेखकवर्गावर आग पाखडण्यास सुरुवात केली.

*　　*　　*

नवीन मंदिरें उभारावयाचीं म्हणजे त्या जागचीं पूर्वीचीं जुनीं मंदिरें पाडून टाकणें आवश्यक होऊन बसतें. सज्जनांची स्तुति करतांना दुर्जनांची निंदा करावी लागते; कारण त्याखेरीज सज्जनांच्या सद्गुणांना

उठाव मिळत नाहीं. जगाची ही रीतच आहे; आणि थोडा खोल विचार केला असतां त्यांत थोडेंसें तथ्य आहे असें कबूल करावें लागेल. पापाची कल्पना आल्याखेरीज पुण्याच्या थोरवीचें यथायोग्य आकलन होत नाहीं. प्रत्येक धर्मांत सदाचरणाच्या नियमांबरोबर निषेधात्मक दंडकहि घातलेले असतात ते याचकारितां. दीनांवर दया करा एवढेंच सांगून भागत नाहीं; तर गरीब बापड्यांना नाहक छळूं नका असेंहि त्याबरोबर बजावावें लागतें. 'स्वर्गप्राप्ति' या काव्यामध्यें देवाच्या मोठेपणाचे पोवाडे गाण्यापूर्वी मिल्टनला 'स्वर्गच्युति' हें महाकाव्य लिहून देवाचा दुष्मन जो सैतान त्याला प्रमुखस्थान द्यावें लागलें. स्तुति करतांना शब्दांची वाण पडावी आणि निंदा करतांना मात्र वाक्प्रवाह अस्खलित चालावा हा चमत्कार वाङ्मयसृष्टींत अनेकवार पाहावयास सापडतो. बर्नार्ड शॉ यांच्याप्रमाणें चेस्टर्टन यांना देखील स्वमतप्रतिपादनापूर्वी परमतखंडनार्थ टीकेचें शस्त्र हातीं धरावें लागलें. आपल्या मतांशीं ज्यांचीं मतें जमत नाहींत त्या सर्व लेखकांना चेस्टर्टन यांनीं गुन्हेगार ठरवून 'पाखंडी' या नांवानें संबोधिलें आहे. रुडयार्ड किप्लिंग यांचे कवित्वगुण चेस्टर्टन यांना अमान्य नाहींत; परंतु किप्लिंग यांच्या साम्राज्यवादांत स्वदेशाभिमानाचा लोप झाला आहे असा त्यांचा ह्या अँग्लो-इंडियन कवीवर आक्षेप आहे. प्रवासापासून कितीहि फायदे होत असले किंवा त्यांत कितीहि आनंद होत असला, तरी प्रवाशाचें आपल्या घरावरील प्रेम कमी होतां कामा नये. आधीं इंग्लंडनें सर्व जग पादाक्रांत करण्याची महत्त्वाकांक्षा धरूं नये; आणि धरलीच तरी इंग्लंडनें आपलें स्वत्व कायम राखलें पाहिजे. कारण साम्राज्याचा नाश झाला तरी स्वराज्याचा लोप होणें केव्हांहि इष्ट नाहीं असें चेस्टर्टन यांचें निक्षून

सांगणें आहे. एच्. जी. वेल्स यांजवर चेस्टर्टन यांचा मुख्य आक्षेप असा कीं, त्यांच्या विचारपद्धतींत बुद्धीची कितीहि चमक असली तरी, त्यांत मतांचा कायमपणा किंवा ध्येयाचें निश्चित स्वरूप यांचा पूर्ण अभाव दिसतो. त्यांच्या कल्पनाशक्तीच्या गाडीला थांबण्याला कायमचें असें कोणतेंच ठिकाण नाहीं; ती एकसारखी नवीन नवीन स्टेशनें घेत असते. ती निश्चित स्थळीं जाईल असा चिलकुल भरंवसा नसल्यामुळें प्रवाशांना तिजवर विसंबतां येत नाहीं. एच्. जी. वेल्स जें मत आज प्रतिपादन करतात तेंच उद्यां टाकाऊ ठरवून नवीन मताचा पुरस्कार करण्यास ते मागेंपुढें पाहत नाहींत. भावी सुवर्ण-युगाचीं त्यांनीं अनेक मोहक शब्दचित्रें काढलीं आहेत. परंतु तीं एकाहून एक इतकीं सरस आणि आकर्षक आहेत, कीं तीं पाहणाराचें मन गोंधळून जाऊन त्याला अमुकच एक चित्र सर्वांहून विशेष चांगलें हें ठरविणें अशक्य होऊन जातें. तेरड्याप्रमाणें तीन दिवसांत रंग बदलणाऱ्या एॅच्. जी. वेल्स यांच्या मतांच्या अस्थिरतेसंबंधीं लिहितांना चेस्टर्टन म्हणतात कीं, "जागृतावस्थेंतच काय, पण सुप्तावस्थेंतदेखील त्यांच्या मतांचें संक्रमण होत असावें!" वृक्ष एकसारखा वाढत चालला तरी त्याच्या वाढीला कांहीं तरी मर्यादा पाहिजे; नाहीं तर तो आपल्याच भाराखालीं वाकून जाऊन मोडण्याची किंवा अजीबात उमळून पडण्याची भीति जास्त. सुप्रजाजननशास्त्र, समाजसत्तावाद, विवाह-संस्था इत्यादि विषयांवर एच्. जी. वेल्स यांनीं एका काळीं जीं मतें प्रतिपादन केलीं त्या मतांचा ते हल्लीं पुरस्कार करीत नाहींत. शास्त्रीय सुधारणेनें सर्व जग आमूलाग्र सुधारून टाकण्याची एच्. जी. वेल्स यांची महत्त्वाकांक्षा बुद्धीला कितीहि भुरळ घालणारी असली, तरी शेवटीं त्याचा परिणाम जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकण्याइतकाच अनिष्ट

प्रभात ... ग्रंथालय ... सं. ...

होणार असें चेस्टर्टन यांचें ठाम मत झालें आहे. एच्. जी. वेल्स म्हणतात कीं, " राष्ट्राराष्ट्रांतील लढाया थांबविण्याकरितां पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांचें एक विराट् राष्ट्र बनविलें पाहिजे." युद्धांचा नायनाट करण्याची वेल्स यांची ही कल्पना चेस्टर्टन यांना हास्यास्पद वाटते. चेस्टर्टन यांचें म्हणणें असें कीं, " सर्व देशांचें एकछत्री साम्राज्य बनविलें तरी त्यामुळें युद्धें थांबतील असें म्हणतां येणार नाहीं. तीं निराळ्या कारणास्तव होतील एवढेंच. आज देशाकरितां किंवा जमिनीकरितां लढाया होत असल्या, तर उद्या निरनिराळ्या मतांकरितां किंवा धर्मांकरितां लढाया होतील. हें विश्वचक्र जरी एकसारखें फिरत असलें तरी त्याच्या मुळाशीं एखाद्या स्थिर आणि शाश्वत अशा शक्तीचें अस्तित्व मानलेंच पाहिजे व या गोष्टीकडे दुर्लक्ष करून वेल्स यांनीं सुधारणा सुधारणा म्हणून कितीहि कंठशोष केला तरी तो फुकट होय." चेस्टर्टन यांनीं पाखंडी लोकांच्या मालिकेंत बर्नार्ड शॉ यांना देखील गोविलें आहे; परंतु एवढ्यावरून समाधान न पावून बर्नार्ड शॉ यांजवर त्यांनीं एक स्वतंत्र पुस्तकच लिहिलें आहे. बर्नार्ड शॉ आणि चेस्टर्टन यांजमधील मतभेदासंबंधीं मागें एके ठिकाणीं दिग्दर्शन केलेंच आहे. चेस्टर्टन यांनीं सुरुवातीला जी प्रसिद्धि मिळाविली तिचें श्रेय अगदीं प्रथमपासून त्यांनीं बर्नार्ड शॉ यांशीं आरंभिलेल्या विरोधाला आहे. विरोध करावा तो निदान मोठ्यांशीं करावा; कारण त्यांत यदाकदाचित् आपला पाडाव झालाच तरी आपल्या नांवाचा बोलबाला होतो; या गोष्टीचा फायदा घेऊन चेस्टर्टन यांनीं आपलें टीकाशस्त्र प्रथम बर्नार्ड शॉ यांजवर चालविलें. ज्या वेळीं बर्नार्ड शॉ यांच्याशीं दोन हात करण्याकरितां चेस्टर्टन आखाड्यांत उतरले त्या वेळीं बर्नार्ड शॉ यांची कीर्ति त्रिखंडांत गाजलेली होती. आपल्या अभिनव व क्रांति-

कारक विचारांनीं त्यांनीं सर्व इंग्लंड देश हालवून सोडला होता. धर्म, समाज, वाङ्मय, नीतिमत्ता इत्यादि विषयांसंबंधीं जनतेच्या असलेल्या प्रचलित कल्पनांचे वाभाडे काढून, आपल्या हातांतील टीका-प्रतोदाचे समाजाच्या पाठीवर निष्ठुरपणें ज्यांनीं कोरडे ओढले त्यांचा दरारा केवढा असला पाहिजे याची कल्पनाच करणें बरें. ज्यांनीं हातांत लेखणी घेतांच मी मी म्हणणाऱ्या लेखकांच्या मनाला थरकाप व्हावा, त्यांच्याशीं दोन हात करण्याला आखाड्यांत उतरणें हें लहान-सहान धाडस नव्हतें. शिवाय चेस्टर्टन हे वयानें बर्नार्ड शॉ यांजपेक्षां बरेच लहान. तेव्हां त्यांचें वाग्युद्ध भीष्मार्जुनांच्या संग्रामाप्रमाणेंच सर्वांच्या आश्चर्याचा आणि कौतुकाचा विषय होऊन राहणें अगदीं स्वाभाविक होतें. या सामन्यांत चेस्टर्टन यांची बुद्धिमत्ता इतकी तेजाळपणें चमकली कीं, त्यानें बर्नार्ड शॉ देखील स्तिमित झाल्या-खेरीज राहिले नाहींत. बर्नार्ड शॉ यांच्या तत्त्वज्ञानांतील मुद्दे खोडून काढण्याकरितां यांना एक स्वतंत्र पुस्तकच लिहावें लागलें असें वर म्हटलेंच आहे. या पुस्तकाच्या चार ओळींच्या प्रस्तावनेंत ते लिहितातः " पुष्कळ लोक असें म्हणतात कीं, आपण बर्नार्ड शॉ यांच्याच मताचे आहोंत, तर इतर कित्येक असें म्हणतात कीं, आपणाला त्यांचीं मतेंच कळत नाहींत. परंतु त्यांचीं सर्व मतें कळत असून तीं मान्य न करणारा असा मी एकटाच मनुष्य आहे." या चारच ओळींच्या प्रस्तावनेवरून चेस्टर्टन यांच्या धडाडीप्रमाणें त्यांच्या आत्मविश्वासाचाहि प्रत्यय येतो. कल्पनेचें नावीन्य, वावदूकपणा, कोटिक्रम, धडाडी आणि स्वमताविषयींच्या सत्यतेविषयीं पराकाष्ठेचा आत्मविश्वास व मत-प्रतिपादनाचा बेफामपणा हे बर्नार्ड शॉ यांच्या लिखाणांतील गुणदोष चेस्टर्टन यांच्या लेखनपद्धतींत तितक्याच तीव्रतेनें आढळून येतात.

बर्नार्ड शॉवरील आपल्या पुस्तकांत चेस्टर्टन यांनीं या सर्वांचा सारखाच उपयोग केला आहे. बर्नार्ड शॉ यांनीं ज्या कल्पना अभिनव व क्रांतिकारक म्हणून अत्यंत आवेशानें मांडल्या आहेत, त्या सर्वांवर चेस्टर्टन यांनीं तितक्याच तीव्रतेनें विरोध केला आहे. प्रेम, स्वदेशाभिमान, स्वकुलाविषयीं आदर इत्यादि अंतःकरणाच्या भावनांचा बर्नार्ड शॉ यांनीं जितक्या आवेशानें उपहास केला आहे तितक्याच जोरदारपणें चेस्टर्टन यांनीं या भावनांच्या उदात्तपणाचें आणि श्रेष्ठपणाचें प्रतिपादन केलें आहे. दोघांच्या मतांमधील हा विरोध शेवटीं इतक्या थराला जाऊन पोंचला आहे कीं, ज्या गोष्टींचा बर्नार्ड शॉ यांनीं तिरस्कार करावा, त्यांचा चेस्टर्टन यांनीं पुरस्कार करावा. एकाला जें निंद्य, अनिष्ट आणि त्याज्य वाटावें तेंच दुसऱ्याला वंद्य, इष्ट आणि पूज्य वाटावें. बर्नार्ड शॉ यांनीं ध्येयांची आणि ध्येयवाद्यांची टवाळी केली, तर चेस्टर्टन यांनीं त्यांचें श्रेष्ठत्व आणि महत्त्व पटवून द्यावें. विवाहबंधनें बर्नार्ड शॉ यांस मान्य नाहींत, तर चेस्टर्टन यांस तीं इतकीं आवश्यक वाटतात कीं, काडीमोडदेखील त्यांस नापसंत. मनुष्याच्या निर्बुद्धपणाचा वैताग येऊन बर्नार्ड शॉ यांनीं उच्चतर मानवप्राण्यांची (Superman) जात निर्माण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली, तर चेस्टर्टन यांनीं शॉ यांच्या या काल्पनिक मानवप्राण्याला अमानुष कोटींत ढकलून देऊन अखिल मानवजातीच्या संकलित श्रेष्ठपणावरील आपला विश्वास प्रकट केला.

चेस्टर्टन यांची बहुमोल कामगिरी हीच होय. बहुजनसमाजाला तुच्छ लेखणाऱ्या अहंमन्य पंडितांना त्यांनीं कसून विरोध केला व सामान्य लोकांची बाजू राखली. मनुष्यप्राणी हा बुद्धिहीन असेल, गतानुगतिक असेल, श्रद्धावन्त असेल, खेडवळ असेल, चैनी असेल;

पण तो स्वभावतःच सद्‌गुणशील आहे, प्रेमळ आहे, भावनाप्रधान आहे, ध्येयवादी आहे आणि म्हणूनच आदरणीयहि आहे. तो ध्येयाकरितां आणि धर्माकरितां आपलें रक्त सांडण्यास तयार असतो. स्वदेश आणि स्वधर्म यांजविषयीं आजच्या विद्वान् मंडळींत जी उदासीनता दिसते तीबद्दल चेस्टर्टन यांस मनस्वी चीड आहे. मानवजातीच्या भवितव्यतेचीं काल्पनिक आणि मनोहर चित्रें भडक रंगांत अनेकांनीं रंगविलीं आहेत. परंतु चेस्टर्टन यांना मानवी इतिहासाच्या गतकालांतच त्यांच्या भविष्यकाळचा उज्ज्वल चित्रपट दिसत आहे. आजच्या विसाव्या शतकांतील अहंमन्य नास्तिकापेक्षां तेराव्या शतकांतील भोळा पण भावनाप्रधान, श्रद्धाळु पण शूर, रंगेल पण राष्ट्राकरितां आपले रक्त सांडणारा असा लढवय्या चेस्टर्टन यांस अधिक प्रिय.

चेस्टर्टन हे विनोदी वृत्तीचे तत्त्ववेत्ते आहेत. हसणें हा त्यांचा स्वभावधर्म आहे. ते हंसूं लागले म्हणजे एखाद्या लहान मुलाप्रमाणें मोठमोठ्यानें हसूं लागतात. त्यांची ही बालवृत्ति त्यांच्या हास्यांतच दिसून येते असें नाहीं. त्यांच्या एकंदर मनोरचनेंतच एखाद्या लहान मुलाला शोभेल असा खेळकरपणा आहे. किंबहुना त्यांच्या तत्त्वज्ञानाची उभारणी त्यांच्या या स्वभावविशेषावरच झालेली आहे. जगाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टीमध्यें बालकाची उत्सुकता आणि उत्साह हीं दिसून येतात. चिरपरिचयामुळें आपणाला निसर्गाच्या नित्य आणि नैमित्तिक दृश्यांमध्यें सौंदर्य आढळेनासें होतें. समाजाच्या प्रथमावस्थेमध्यें मनुष्याच्या अधीर दृष्टीला निसर्गाच्या ज्या वस्तूंमध्यें ईश्वरांश दिसला त्याच वस्तूंचीं हल्लीं त्यानें खेळणीं बनविलीं ईश्वराच्या अलौकिकपणाविषयीं आश्चर्य किंवा आदर उत्पन्न होण्याऐवजीं स्वतःच्या सामर्थ्याबद्दल मात्र मनुष्याच्या मनांत गर्व उत्पन्न होऊन विश्वरचनेंत

त्याला सौंदर्य आढळेनासें झालें. पोक्तपणा येणें म्हणजे, सौंदर्यदृष्टीला मंदत्व किंवा अंधत्व येण्यासारखें आहे. निसर्गाकडे दुर्लक्ष करून सृष्टीच्या गूढ तत्त्वांचें आकलन करण्याचा आव घालणें म्हणजे डोळे मिटले असतां चष्म्यांतून कसें दिसतें असें पाहण्यासारखें आहे. चेस्टर्टन यांच्या बालदृष्टीला निसर्गाच्या सामान्य दृश्यांमध्यें देखील सौंदर्य आढळूं लागलें व त्यांची वृत्ति अधिकाधिक धार्मिक बनूं लागली. तथापि, चेस्टर्टन यांची धर्मावर जडलेली श्रद्धा, त्यांनीं केलेला कॅथॉलिक पंथाचा अंगीकार, त्या पंथाची त्यांनीं अत्यंत तीव्रतेनें केलेली तरफदारी ह्या गोष्टींच्या कारणपरंपरेची मीमांसा करण्याकरितां त्या काळीं उदयास आलेल्या नवीन विचारसरणीची व तत्त्वज्ञानाची चिकित्सा करणें अवश्य आहे. सर्व युरोप खंडांत हुतुतू घालून युरोपची समरभूमि रक्तानें माखून टाकणाऱ्या नेपोलियनच्या मृत्यूनंतर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सर्व जगाचें लक्ष वेधून घेईल असें युद्ध झालेलें नाहीं. विशेषतः इंग्लंडच्या इतिहासांतील हा काळ म्हणजे शांततेचा आणि सुखसमृद्धीचा गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या काळांत शास्त्रीय व यांत्रिक शोध यांमध्यें झपाट्यानें प्रगति झाली. या शोधांमुळें मनुष्याच्या राहणीमध्यें जी क्रांति घडून आली त्यापेक्षां त्याच्या राजकीय आणि धार्मिक विचारांच्या बाबतींत ती अधिक घडून आली असें म्हणावयास हरकत नाहीं. जगाच्या उत्पत्तीसंबंधानें लोकांच्या भोळ्या समजुतींना एवढा मोठा धक्का बसला कीं, खुद्द ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलहि ते प्रथम मूकवृत्तीनें व नंतर उघडपणें संशय प्रकट करूं लागले. प्रत्यक्ष ईश्वराचें आसन अशा रीतीनें डळमळीत झाल्यावर ईश्वराचा आवडता पुत्र जो येशु ख्रिस्त त्याच्या अवतारकृत्यासंबंधीं व पर्यायानें त्याच्या तत्त्वज्ञानासंबंधानें लोकांचीं मनें संशयग्रस्त झालीं

यांत नवल काय ? आकाशांतील बाप व त्याच्या आवडत्या पुत्रानें स्थापन केलेला ख्रिस्तीधर्म हीं जगाच्या कल्याणाच्या आड येणारीं मुख्य अरिष्टें होत असें बरळणाऱ्या स्विनबर्नचीं काव्यें लोक मोठ्या आवडीनें वाचूं लागले. या नवीन तत्त्वज्ञानामुळेंच लोकशाहीची लाट उसळून समाजसत्तावादाचा जन्म झाला. या सर्व विचारक्रान्तीचा परिणाम असा झाला कीं, भावनेपेक्षां बुद्धीला आणि तर्कवादाला अधिक प्राधान्य देण्यांत आलें. सर्व गोष्टींची किंमत तर्कनिकषाच्या दगडावर घासून ठरविण्यांत येऊं लागली; आणि स्वदेशाभिमान, प्रेम इत्यादि सात्त्विक भावनांची देखील टवाळी करण्यास सर्व वाग्वीर पुढें सरसावले. देशांतील विद्वान् मंडळींच्या विचारसरणीचा असा वारा वाहूं लागतांच सर्वसामान्य लोकांचीं मनेंदेखील त्याच बाजूला धावूं लागलीं. परंतु या सर्व नवीन तत्त्वज्ञानाचा परिणाम चेस्टर्टन यांच्या मनावर अगदीं उलट झाला. देशाचें वातावरण निराशावादाच्या काळ्याकुट्ट ढगांनीं व्याप्त होऊन गेलें असतां चेस्टर्टन यांची प्रतिभा त्यांत विद्युल्लतेप्रमाणें चमकली. विश्वनिंदकांच्या लिखाणाला चेस्टर्टन यांनीं कुजलेल्या पदार्थांची उपमा दिली आहे. या घाणीच्या दुर्गंधानें चेस्टर्टन यांची विचारवल्ली दूषित होण्याऐवजीं आशावादाच्या सुगंधित पुष्पांनीं मात्र बहरून गेली. लोकांच्या निराशावादांतून त्यांनीं आपल्या आशावादाचें तत्त्वज्ञान बाहेर काढलें. शास्त्रीय प्रगतीमुळें दरक्षणीं जे नवे नवे शोध लागूं लागले त्यामुळें तार्किक बुद्धीचें एवढें स्तोम माजलें कीं, विश्वरचनेंतील हरएक गोष्टीची शास्त्रीय पद्धतीनें कारणपरंपरा लावतां येणें सहज शक्य आहे अशी विचारसरणी प्रचलित झाली. जडवाद आणि उत्क्रान्तिवाद यांचा उगम याच विचारसरणीमध्यें दिसून येतो. विश्वाची स्वयमेवच उत्क्रांति होत असून

मनुष्यप्राणी हें माकडाचें परिणत स्वरूप होय हें उत्क्रान्तिवाद्यांचें आवडतें प्रमेय होय. विश्वरचनेमधील असंख्य उलाढाली यदृच्छेनेंच होत असून यांत ईश्वरी इच्छेचा किंवा संकेताचा कांहीं एक संबंध नाहीं हाच जडवाद होय.

चेस्टर्टन यांनीं ईश्वराचें अस्तित्व स्वतंत्र रीतीनें सिद्ध करून दाखविण्याऐवजीं व श्रद्धेची आवश्यकता पटवून देण्यापूर्वी ईश्वराचें अस्तित्व मान्य करून श्रद्धेची टर उडविणाऱ्यांना फजीत करण्याकरितां निराळ्याच मार्गाचा अवलंब केला. निरीश्वरवाद्यांचे आणि उत्क्रांन्तिवाद्यांचेच मुद्दे घेऊन ते कसे फोल आहेत तें दाखविण्याला त्यांनीं सुरुवात केली. श्रद्धावंतांच्या पायांत दर पावलागणिक रुतणारा जडवाद्यांचा हा काटा काट्यानेंच काढून टाकण्याचें त्यांनीं ठरविलें. शास्त्रीय शोधांमुळें जडवाद्यांचें धोरण चढाईचें झाल्यामुळें श्रद्धावंतांना आपल्या भाबड्या तत्त्वज्ञानाचा पसारा गुंडाळून ठेवून आत्मसंरक्षणाचे उपाय योजण्यांतच काल घालवावा लागला; परंतु चेस्टर्टन हे समरांगणावर येऊन थडकतांच त्यांनीं या वाग्युद्धाचें स्वरूप एकदम पालटून टाकलें. त्यांनीं या वादाचीं सूत्रें हातीं घेतांच श्रद्धावंतांचें आजपर्यंतचें बचावाचें धोरण टाकून देऊन चढाईच्या धोरणाला आरंभ केला. प्रतिपक्षाचे हल्ले परतविण्यांतच आपली शक्ति खर्च करणें त्यांना रुचलें नाहीं. ते धैर्यानें शत्रूवर एकदम तुटून पडले. तर्कवाद्यांशीं दोन हात करतांना त्यांचे घाव झेलून घेण्याकरितां त्यांनीं निव्वळ श्रद्धेची ढालच घेतली नाहीं, तर बुद्धीची तीक्ष्ण धार असलेली तर्काची समशेरच प्रतिपक्षाच्या छातींत खुपसण्याचा त्यांनीं सपाटा चालविला. उत्क्रांतिवाद्यांचें खरें शस्त्र म्हणजे तर्कबुद्धि. ईश्वराचें अस्तित्व तर्कानें सिद्ध करतां येत नाहीं म्हणून त्याचें अस्तित्वच मानतां येत

नाहीं हें त्यांचें म्हणणें. चेस्टर्टन ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्याच्या भरीस पडलेच नाहींत. त्यांनीं असा कोटिक्रम लढविला कीं, जर तर्कवादानें ईश्वराचें अस्तित्व सिद्ध होत नसेल तर त्यामुळें ईश्वर नाहीं असें सिद्धच होत नाहीं. त्यामुळें जर कोणती गोष्ट सिद्ध होत असेल तर ती हीच कीं, ज्या तर्कबुद्धीला ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करतां येत नाहीं ती तर्कबुद्धीच खोटी. एखादें कोडें आपणांला सुटत नाहीं म्हणून तें कोडेंच चूक कशावरून ? फाजील आत्मविश्वास असणें हें दुर्बलतेचें लक्षण होय. आजाऱ्याला एखादी जड वस्तु उचलतां आली नाहीं म्हणजे ती वस्तु कोणालाहि उचलतां येणार नाहीं असें त्यानें प्रतिपादन करणें हें दुर्बलतेप्रमाणें त्याच्या मूर्खपणाचेंहि द्योतक आहे. कल्पनाशक्ति, भावनोत्कटता किंवा श्रद्धा यांची जडवादी चेष्टा करतात. कवीला ते वेड्यांत काढतात; पण कवि वेडा नाहीं. कारण काव्य-सृष्टीमध्यें तरी ईश्वराचें अस्तित्व मानण्याइतकें त्याला आपल्या कल्पना-शक्तीला स्वातंत्र्य देतां येतें; पण बुद्धीला पटत नाहीं म्हणून त्याचें अस्तित्व नाकारणारा मनुष्य कल्पनाशक्तीच्या स्वातंत्र्यालाहि पारखा झालेला असतो. आपल्या 'धर्मपरायणता' ( Orthodoxy ) या ग्रंथांत चेस्टर्टन यांनीं अशा प्रकारचें विवरण करून असा सिद्धान्त काढला आहे कीं, भावनाप्रधान व प्रतिभाशाली कवि हे वेडे नसून निव्वळ बुद्धीवर व तर्कावर विसंबून राहणारेच खरे वेडे होत !

जडवाद्यांना अशा रीतीनें फजीत केल्यानंतर चेस्टर्टन यांनीं आपला मोर्चा ख्रिस्तीधर्मावर तुटून पडणाऱ्यांवर रोखला व आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें शत्रुपक्षाकडून सुटणारे टीकेचे गोळे त्यांच्याच अंगावर पडतील अशी हिकमत लढविली. ख्रिस्ती-धर्मावर आपली एकाएकीं श्रद्धा बसावयाला जर कोणती गोष्ट

मुख्यत्वेंकरून कारणीभूत झाली असेल तर ती नास्तिक वाद्यांचीं व उत्क्रान्तिवाद्यांचीं चोपडीं होत, असें त्यांनीं प्रसिद्ध केलें. आपल्या धार्मिक विचारक्रान्तीचा इतिहास देतांना तें म्हणतात कीं, माझी वृत्ति धार्मिक बनण्याला धर्माची तरफदारी करणारीं पुस्तकें वाचण्याची मला यातायात करावी लागली नाहीं. नास्तिकवादांतून संशयवादांत व संशयवादांतून अखेर आस्तिक्यबुद्धींत जें आपल्या मताचें परिवर्तन झालें त्याला कारण हर्बर्ट स्पेन्सर, हक्स्ले व चार्ल्स ब्रॅडलॉ या उत्क्रांतिवाद्यांचीं व नास्तिकवाद्यांचीं पुस्तकें! ख्रिस्तीधर्माच्या थोरवीसंबंधीं माझ्या मनांत जे कांहीं संशय अजून डोकावत होते ते वरील संशयात्म्यांचीं पुस्तकें वाचतांच चटसारे नाहींसे झाले व ख्रिश्चन धर्मावरील माझा विश्वास अधिकच दृढ झाला. हक्स्ले, हर्बर्ट स्पेन्सर या उत्क्रांतिवाद्यांचीं पुस्तकें मीं जेव्हां वाचून काढिलीं, तेव्हां जगाची खरोखरच उत्क्रान्ति झाली आहे किंवा नाहीं 'याचीच मला भ्रान्ति पडूं लागली. शेवटीं बायबलची यथेच्छ निंदा करणाऱ्या इंगरसोलचे जेव्हां निबंध वाचले तेव्हां मी मनांत म्हटलें, 'खरोखर ख्रिश्चन धर्माकडे माझें परिवर्तन तूंच घडवून आणलेंस!' नास्तिकवाद्यांचीं पुस्तकें वाचल्यामुळेंच धर्मावर आपली श्रद्धा बसली, या विधानामुळें कोणाचा गैरसमज होऊं नये म्हणून चेस्टर्टन यांनीं उत्क्रान्तिवाद्यांचे सिद्धान्त एकामागून एक वाचकांसमोर मांडले व ते परस्परांशीं किती विसंगत आहेत हें दाखवून दिलें. नास्तिकवाद्यांनीं आपलीं विधानें आपणच खोडून टाकलीं आहेत. कारण एका ठिकाणीं ते असें म्हणतात कीं, ख्रिश्चन धर्मानें लोकांना आशावादी बनविलें; तर लगेच दुसरीकडे त्या धर्मानें लोकांना फाजील आशावादी बनविलें म्हणून त्याची टर करतात! ख्रिश्चन धर्मातील तत्त्वांनीं जनतेला

काल्पनिक भीतीनें घाबरवून सोडलें असें विधान करून पुन्हा त्याच धर्मानें लोकांना स्वर्गांतील सुखांची लालूच दाखवून भूलोकावरील संकटांना न जुमानतां त्यांना धैर्यानें तोंड द्यावयास शिकविलें असेंहि म्हणण्यास हे पाखंडी टीकाकार तयारच ! तेव्हां यांतील सत्य काय हें त्या बिचाऱ्या नास्तिकवाद्यांसच विचारलें पाहिजे असें म्हणून चेस्टर्टन यांनीं त्यांचा उपहास केला आहे. असो.

चेस्टर्टन यांच्या धार्मिक विचारक्रांतीचा हा इतिहास आमच्या वाचकांस कंटाळवाणा वाटणें अगदीं साहजिक आहे. पण तो निदान थोडक्यांत दिल्याखेरीज चेस्टर्टन यांच्या वाङ्मयाचें स्वरूप पूर्णपणें लक्षांत येणार नाहीं. म्हणूनच त्याचें दिग्दर्शन केलें आहे. चेस्टर्टन यांच्या मनाची ही विशिष्ट धार्मिक भूमिका नीट लक्षांत घेतली नाहीं, तर आपल्यासारखा सामान्य वाचक त्यांचा कोणताहि लेख वाचतांना गांगरून गेल्याखेरीज राहणार नाहीं. कारण आपल्या धार्मिक, राजकीय आणि सामाजिक मतांचा वेळीं अवेळीं उल्लेख करून आपण रोमन कॅथॉलिक पंथाचे कट्टे अनुयायी असल्याची प्रौढी आपल्या प्रत्येक लेखांत सांगितल्याखेरीज चेस्टर्टन यांना चैनच पडत नाहीं !

चेस्टर्टन यांच्या धार्मिक मतांमध्यें ज्याप्रमाणें एक वैशिष्ट्य दिसून येतें त्याचप्रमाणें त्यांच्या सामाजिक मतांमध्येंहि एक प्रकारचा निराळे-पणा आढळतो.

* * *

चेस्टर्टन यांच्या सामाजिक मतांचा विचार करतांना प्रथम त्यांच्या विवाहविषयक कल्पनांचें दिग्दर्शन करणें आवश्यक आहे. कारण त्याखेरीज घटस्फोटावरील त्यांच्या विचारसरणीचें आकलन नीटसें

होणार नाहीं. काडीमोड पाहिजे म्हणून ओरड करणाऱ्या लोकांस चेस्टर्टन विचारतात कीं, तुम्हांला अगोदर लग्न पाहिजे कीं नाहीं? कारण लग्नसंस्थाच जर तुम्हांला मान्य नसेल तर घटस्फोटाचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. विवाह-बंधनेंच जर मानलीं नाहींत तर तीं तोडण्याकरितां कायदेकानू करण्याची आवश्यकता कोठें राहते? तेव्हां लग्न म्हणजे काय हें प्रथम ठरविलें पाहिजे. चेस्टर्टन म्हणतात, लग्न म्हणजे स्त्री-पुरुषांनीं एकमेकांशीं एकनिष्ठपणें वागण्याचें स्वखुषीनें दिलेलें वचन. आतां यापुढील प्रश्न म्हणजे, वचनें द्यावीं कीं नाहीं; व दिल्यास तीं पाळावीं कीं नाहीं? कोणत्याहि बाबतींत का होईना; पण वचन द्यावें असें एकदां मान्य केलें म्हणजे तें पाळणें हें कर्तव्यच आहे. नाहीं तर कोणी कोणाच्या शब्दावर विश्वास ठेवणार नाहीं. चेस्टर्टन म्हणतात, लग्न हा एक शपथविधि आहे. तें एक व्रत आहे व एकदां त्याचा अंगीकार केला म्हणजे मग त्याचा भंग करणें उचित नाहीं. मनुष्याला प्रत्येक बाबतींत स्वातंत्र्य पाहिजे असें जो तो म्हणतो. मग विवाहबंधनांनीं स्वतःस बांधून घेण्याचें स्वातंत्र्य त्यास कां नसावें? एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रा विरुद्ध युद्ध पुकारलें म्हणजे प्रत्येक स्वदेशाभिमानी मनुष्य आपल्या मायभूमीच्या रक्षणार्थ हातावर शिर घेऊन लढावयास तयार होतोच कीं नाहीं? आपल्या देशाचा सत्पक्ष आहे कीं नाहीं, युद्ध पुकारण्या-पूर्वी आपलें मत कां घेण्यांत आलेलें नाहीं, लढाईंत आपल्या पक्षाचा पराजय होण्याची धास्ती आहे किंवा काय इत्यादि प्रश्न तो विचारीत बसत नाहीं. स्वदेशरक्षणार्थ लढणें एवढेंच त्याला माहीत असतें. भीष्म आणि द्रोण यांना पांडवांचा सत्पक्ष होता हें मान्य असूनहि कौरवांच्या बाजूनें ते लढलेच कीं नाहीं? युद्ध पुकारण्यापूर्वी ज्याच्या

जोरावर विजय संपादन करण्याची राष्ट्र आशा बाळगतें त्या सैन्याची अनुमतिदेखील तें घेत नाहीं. मग विवाहामध्यें वैयक्तिक संमति घेतली जात असूनहि पुरुषानें विवाहबंधन तोडण्याकरितां परवानगीची याचना करावी हें आश्चर्य नव्हे काय ? चेस्टर्टन पुढें विचारतात कीं, समाजांत तरी तुमच्या वैयक्तिक आवडीनिवडींप्रमाणें तुम्हांला कोठें वागावयास मिळतें ? तुमची स्वतःची मोटर असली तरी ती रस्त्यांतून तुम्हांला वाटेल तशी चालवितां येणार नाहीं. नोकरीवर वाटेल तेव्हां जावें, वाटेल तेव्हां जाऊं नये, कचेरींत खुर्चीवर बसावें किंवा जमिनीवर बसावें, काम करावें किंवा करूं नये इत्यादि बाबतींत तुम्हांला स्वातंत्र्य आहे काय ? मग समाजांत राहावयाचें आहे तर तुम्ही आपण होऊन पसंत केलेल्या पत्नीचा त्याग कोणत्या आधारावर करणार ? कुटुंबव्यवस्थेवरच राष्ट्राची भरभराट अवलंबून आहे असें चेस्टर्टन यांचें मत आहे; आणि म्हणून इंग्लंडमध्यें कुटुंबव्यवस्था मोडकळीस येऊं लागलेली पाहून चेस्टर्टन यांना चैन पडत नाहीं. त्यांचा दुसरा मुद्दा असा कीं, प्रथम पसंत केलेल्या पत्नीबरोबर तंटा होऊन दुसऱ्या एखाद्या स्त्रीबरोबर लग्न करण्याकरितां पहिल्या पत्नीशीं काडीमोड करतांना ही दुसरी निवड चुकीची ठरणार नाहीं कशावरून ? ज्याला आपली पहिली बायको अचूक पसंत करतां आली नाहीं, त्याला दुसऱ्या पत्नीची निवड बरोबर करतां येईल हें तरी कशावरून समजावें ! सारांश, अशा क्षणोक्षणीं रंग पालटणाऱ्या पुरुषाला एकसारखा काडीमोड करण्याचा प्रसंग येऊन प्रेमाला बाजारी स्वरूप प्राप्त होणार. चेस्टर्टन म्हणतात, स्त्री-पुरुषांमधील परस्पर-आकर्षणाला व प्रेमाला या संसारांत दुसरी तोड नाहीं; म्हणून विवाहासंबंधीं चर्चा करतांना कित्येकजण ज्या

वेळीं निरनिराळ्या प्रेममय संबंधाच्या उपमा योजतात त्या वेळीं पति-पत्नीमधील विशिष्ट प्रकारचें प्रेम तें लक्षांत घेत नाहींत. राजा व प्रजा, स्वामी आणि सेवक यांचे संबंध कितीहि प्रेमाचे असले तरी ते कांहीं अंशीं सत्तेच्या जोरावर घडवून आणलेले असल्यामुळें, ते तोडतां येतात व कित्येक वेळां तोडून टाकणें इष्टहि असतें. परंतु नवरा-बायकोचा संबंध निव्वळ प्रेमाचा असल्यामुळें तो एखाद्या कराराप्रमाणें मोडतां येणार नाहीं. स्त्री-पुरुषांमध्यें परस्पर आकर्षण उत्पन्न करण्यामध्यें निसर्गाचा व पर्यायानें ईश्वराचा कांहीं विशिष्ट हेतु असला पाहिजे आणि म्हणूनच विवाहाला करार ही संज्ञा न देतां तो एक धार्मिक व पवित्र संबंध आहे हें मान्य केलें पाहिजे. विवाहाचें हें स्वरूप एकदां मान्य केलें म्हणजे त्याच्यामागून कुटुंबव्यवस्थेलाहि मान्यता देणें क्रमप्राप्तच होतें. पतिपत्नी हीं फक्त मुलांना जन्म देण्यापुरतींच जबाबदार; त्यानंतर मुलांचें पालनपोषण राष्ट्रानें करावें; ही विचारसरणी चेस्टर्टन यांस बिलकुल मान्य नाहीं.

घटस्फोटाप्रमाणेंच सुप्रजाजननशास्त्राविरुद्ध देखील एक पुस्तक आणि किरकोळ लेख लिहून चेस्टर्टन यांनीं या शास्त्राबद्दलची आपली नापसंती तीव्र शब्दांत व्यक्त केली आहे. ते म्हणतात, हें शास्त्र अगदींच तऱ्हेवाईक होय; कारण आजपर्यंत विवाहाच्या वेळीं वधूवरांनीं एकमेकांशीं प्रेमानें व निष्ठेनें वागावें एवढाच सर्व शास्त्रांचा व लोकरीतीचा कटाक्ष होता; पण हें सुप्रजाजननशास्त्र लग्नानंतर पुढें होणाऱ्या मुलांबद्दलच इतकी काळजी दाखवितें कीं, विवाहाला आवश्यक जें स्त्री-पुरुषांमधील प्रेम त्याचा विचारदेखील करावयास तें तयार नाहीं. सुप्रजाजननशास्त्र म्हणजे योग्य जोडप्यांचा विवाह घडवून आणण्याचा व विजोड जोडप्यांचा विवाह रद्द करण्याचा कांहीं

मूठभर लोकांना दिलेला अधिकार, अशी चेस्टर्टन यांनीं या शास्त्राची व्याख्या केली आहे. लग्नाची बाब ही निव्वळ वधूवरांच्या वैयक्तिक आवडीनिवडीची असल्यामुळें त्यांच्या आईबापांनीं किंवा पालकांनीं त्यांत लुडबुडूं नये इतकें लग्नाच्या बाबतींत आज स्वातंत्र्य मागितलें जात आहे; असें असतां देशांतील सर्व स्त्री-पुरुषांचीं लग्नें सुप्रजाजनन-शास्त्रज्ञ अशा मूठभर लोकांच्या मतानुरूप घडवून आणण्याला तयार व्हावें ही किती आश्चर्याची आणि शरमेची गोष्ट आहे बरें! पति रोगानें जर्जर झाला असतां त्याच्या बायकोनें त्याची प्रेमानें व एक-निष्ठपणें सेवाचाकरी केली, किंवा पत्नी अंथरुणाला खिळून राहिली असतां पतीनें अहोरात्र तिजजवळ बसून तिची शुश्रूषा केली, तर त्याबद्दल जग आज जें त्याचे स्तुतिपाठ गातें तेंच जग उद्यां हें सुप्रजाजननशास्त्र राजमान्य झालें कीं, या एकनिष्ठ प्रेमाचा इन्कार करील व उपरोक्त स्त्री-पुरुषांचा संबंध तोडून टाकण्याला त्यांना भाग पाडील. आपली बायको निवडून काढण्यांत पुरुष सर्वसाधारणपणें जितकी अक्कल दाखवितो तितकी सुप्रजाजननशास्त्रांतील प्रावीण्य मिळविलेला जरी एखादा गाढा विद्वान् आला, तरी दुसऱ्यांचीं लग्नें जुळविण्यांत दाखवूं शकणार नाहीं असें चेस्टर्टन यांनीं प्रतिपादन केलें आहे. आजपर्यंत जगांत जीं विख्यात व अलौकिक माणसें होऊन गेलीं त्यांचीं मातापितरें पूर्ण निरोगी व एकमेकांना सर्वथैव अनुरूप होतीं असें हें सुप्रजाजननशास्त्र सिद्ध करून देईल काय? शिवाय एखाद्या रोगट मुलीवर प्रेम बसलेल्या निरोगी तरुणाला तिच्याशीं विवाह करूं दिल्यानें आयुष्यांत त्याला जें सुख होईल तें सुख त्याचा दुसऱ्या एखाद्या निरोगी तरुणीबरोबर जबरीनें विवाह लावल्यानें त्याला होईल का? असा सवाल चेस्टर्टन यांनीं या शास्त्रज्ञांना टाकिला आहे.

मनानें व शरीरानें अगदीं निरोगी असे लोक जगांत दहापांचहि आढळणार नाहींत; मग पतिपत्नींचे मेंदू तपासून त्यांचा जबरीनें विवाह लावण्याचा किंवा मोडण्याचा अव्यापारेषु व्यापार या सुप्रजाजनन-शास्त्रज्ञांनीं कां करावा? आणि या शास्त्रज्ञांचे मेंदू तरी कोणी तपासून पाहावयाचे! उद्यां जर या शास्त्रान्वयें एखादा कायदा करण्यांत येऊन वधूवरें डॉक्टरच्या तपासणींत उत्तीर्ण झाल्याखेरीज त्यांना लग्न करण्यास परवाना द्यावयाचा नाहीं असें ठरलें तर विवाहसंस्था अजीबात बंदच करावी लागेल! पत्रिका न जमल्यानें आजपर्यंत जेवढीं लग्नें मोडलीं त्याच्या शतपट लग्नें वधू-वरांचें शारीरिक गुण न जमल्यानें मोडतील! सारांश, वंशपरंपरागत येणाऱ्या गुण-दोषांचें जाळें इतकें गुंतागुंतींचें असतें कीं, कोणत्याहि शास्त्रज्ञानें तें सोडविण्याचा अट्टाहास धरूं नये अशी चेस्टर्टन यांची सूचना आहे. सुप्रजाजननशास्त्राचें अगदीं जवळ-च्या नात्याचें शास्त्र म्हणजे संतति-नियमन हें होय. या शास्त्रावरहि चेस्टर्टन घसरले आहेत. त्यांनीं या शास्त्राला अजातांची म्हणजे जन्म न पावलेल्या मुलांची कत्तल अशी विरोधाभासात्मक संज्ञा दिली आहे.

सध्यां इंग्लंडांत व इतरत्रहि स्त्री-स्वातंत्र्याचा जो पुरस्कार केला जात आहे तो लक्षांत घेतला असतां या बाबतींत चेस्टर्टन यांचीं जीं विलक्षण मतें आहेत तीं वाचून कोणालाहि आश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाहीं. चेस्टर्टन म्हणतात, पुरुषांप्रमाणें नोकरी किंवा उद्योग-धंदा करणें यालाच जर स्त्रिया स्वातंत्र्य समजत असतील तर ती त्यांची मोठी चूक आहे. कारण स्त्रियांना घरांत जेवढें स्वातंत्र्य असतें त्याच्या पावपटहि स्वातंत्र्य नोकरीवाल्या पुरुषांना नसतें. जमाखर्चाचे आंकडे जुळवीत बसतांना त्यांत आपल्या मर्जीप्रमाणें ढवळाढवळ करण्याला त्यांना परवानगी नसते. आज मी अमुकच शाईनें

व अमुकच पद्धतीनें कीर्द-खतावण्या लिहीन असा त्यानें हट्ट धरला तर त्याला कचेरींतून लगेच हाकून देण्यांत येईल; परंतु स्त्रीची घरांतील सत्ता जवळजवळ अनियंत्रित असते. स्वयंपाकांत अमुकच पदार्थ आज तूं कां केलेस असें शहाणा नवरा तिला विचारीत नाहीं व त्यानें विचारलें तरी त्याला शेवटीं तिच्याच म्हणण्याला मान्यता द्यावी लागते. स्त्रीला घरांत जेवढें स्वातंत्र्य असतें तेवढें पुरुषाला घराबाहेरहि नसतें असें चेस्टर्टन यांनीं प्रतिपादिलें आहे ! आणि म्हणून घरांतील राज्ञीपदाचा त्याग करून बाहेर दासीपणा पत्करणाऱ्या नोकरीवाल्या स्त्रियांची चेस्टर्टन नेहमीं टर करीत असतात.

चेस्टर्टन यांचें कोणत्याहि विषयावरील लिखाण नेहमींच इतकें उन्मादक असतें कीं, एखादें उत्तेजक पेय घेऊन नंतर ते लेख लिहावयास बसत असावे असाच बहुधा भास होतो. सुरापानाचे गोडवे गातांना तर तंळिरामालाहि मागें टाकतील इतके ते बेहोष होऊन जातात. चेस्टर्टन म्हणतात, दारूबंदीचा कार्यक्रम यशस्वी झाल्याचें पूर्वींचा इतिहास सांगत नाहीं व पुढील इतिहासहि सांगणार नाहीं. दारू पिण्याचा ज्यांत निषेध केला आहे तें कुराण आज कोणताहि मुसलमान वाचीत नाहीं; पण मदिराक्षीच्या गळ्याभोंवतीं एक हात घालून दुसऱ्या हातानें मदिरेचा चषक ओठाला लावणाऱ्या उमर खय्यामच्या 'रुबायती' मात्र मुसलमान लोक आवडीनें पारायणें करतात; कारण त्यांत सुरापानाचे गोडवे उन्मादक भाषेंत गायिलेले आहेत. चेस्टर्टन हे अमेरिकेंत जाऊन आलेले असून अमेरिकेवर त्यांनीं एक पुस्तकहि लिहिलें आहे. त्यांत अमेरिकेंतील मद्यपान-प्रतिबंधाविषयीं लिहितांना ते म्हणतात कीं, अमेरिकेंत मुळीं दारूबंदीच नाहीं; असलीच तर ती थोड्याशा प्रमाणांत खालच्या म्हणजे निर्धन वर्गांत आहे. अमेरिकेंत

दारूबंदीविषयीं जो कायदा केला आहे तो जणूं याच खालच्या वर्गाकरितां आहे. या कायद्याचा परिणाम मात्र असा झाला आहे कीं, पूर्वी जे दारिद्र्यामुळें अगदीं माफक दारू पीत त्यांना या कायद्यामुळें दारू पिणें अगदीं अशक्य झालें आहे; परंतु सधनवर्ग मात्र पूर्वीप्रमाणेंच आजहि वाटेल तितकी दारू पिऊन मद्यपानविषयक कायद्याला धाब्यावर बसवितो. गरीब लोकांकडून अधिक काम करवून घेण्याकरितां धनिकवर्गाची दारूबंदी ही स्वार्थीपणाची क्लृप्ति आहे. अहोरात्र राबणाऱ्या मजूरवर्गाला दारूच्या धुंदींत तरी आपल्या कष्टमय जिण्याचा थोडा वेळ विसर पडून सुखाचा जो आभास झाला असता तोहि त्यांना मिळूं न देण्याकरितां धनिकवर्गानें दारूबंदीचा हा जुलमी कायदा केला आहे. ह्या दारूबंदीच्या कायद्याचा चेस्टर्टन यांनीं दुसऱ्याहि एका बाजूनें विचार केला आहे. ते म्हणतात, दारूबंदीचा हा कायदा महायुद्धांत अमेरिकेनें पडण्याचें ठरविल्यावर स्वार्थत्याग, आत्मयज्ञ वगैरे उदात्त भावनांची लाट उसळली त्या वेळीं करण्यांत आलेला आहे. कोणत्याहि राष्ट्रावर आणीबाणीचा प्रसंग कोसळला म्हणजे स्वार्थत्यागासारख्या उदात्त भावनांना भरती येऊन चैन, विलास व नाचरंग इत्यादि शारीरिक सुखसोहळ्यांना तात्पुरता तरी आळा बसतो किंवा घालावा लागतो. अशा धामधुमीच्या काळांत हा दारूबंदीचा कायदा शहाणपणाचा ठरला असता. तथापि युद्धसमाप्तीनंतरच्या शांततेच्या व सुबत्तेच्या काळांतहि चैन करणाऱ्या मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्तींवर निर्दयपणें शस्त्र उगारावें हा लढाईतील कत्तलीपेक्षांहि क्रूरपणाचा प्रकार आहे. युद्ध हें क्वचित् काळीं होणार म्हणून दारूबंदीदेखील तात्पुरतीच असावयास पाहिजे; पण अमेरिकेंत युद्ध अपवादात्मक ठरून दारूबंदीचा कायदा मात्र

वज्रलेप नियम होऊन बसला! अमेरिकेंतील या दारू-बंदीच्या इतिहासांतील सर्वांना विदित असलेली पण गुप्त राखण्यांत आलेली एक गोष्ट म्हणजे, हा कायदा मूळ नीग्रो लोकांकरितां करावयाचा होता; पण तें जमेना म्हणून कायद्याच्या पुस्तकांत तो सरसकट सर्व अमेरिकन लोकांना लागू केला आहे एवढेंच. आणि त्याचा परिणाम म्हणजे गोऱ्या लोकांच्या बाबतींत हा कायदा पुस्तकांतच राहिला असून, बिचाऱ्या नीग्रो लोकांवर मात्र त्याची सक्तीनें अंमलबजावणी करण्यांत येत आहे. चेस्टर्टन विचारतात कीं, स्वतंत्र राष्ट्रांत वैयक्तिक स्वातंत्र्य नसेल तर तें राष्ट्र स्वतंत्र कसलें! चैन करणें हा वैयक्तिक स्वातंत्र्याचा एक प्रकार असून कांहीं प्रमाणांत का होईना; पण प्रत्येक व्यक्तीला चैन करावयास कायद्यांत सवड ठेवली असली पाहिजे; नाहीं तर मानवी जीवित सर्वसंगपरित्याग केलेल्या एखाद्या तपस्व्याच्या आयुष्यासारखें कष्टप्रद व नीरस झाल्याखेरीज राहणार नाहीं.

बर्नार्ड शॉ हे शाकाहारी असून दारूला स्पर्शहि करीत नाहींत ही गोष्ट खुद्द त्यांनींच इतक्या वेळां सांगितली आहे कीं, ती एक नवलाची गोष्ट म्हणून इतरांनीं सांगण्याची आतां आवश्यकता उरलेली नाहीं. परंतु चेस्टर्टन हे मांसाहारी व सुरापान करणारे आहेत एवढेंच नव्हे, तर दारू पिणें हा प्रत्येक व्यक्तीचा निसर्गसिद्ध हक्क आहे असें प्रतिपादन करणारांपैकीं आहेत हें वाचून मात्र कित्येकांना अचंबा वाटेल.

चेस्टर्टन यांनीं मांसाशनासंबंधीं केलेली तरफदारी जरा निराळ्या आणि तात्त्विक स्वरूपाची आहे. ते म्हणतात कीं, मृत्यु हा कोणालाच चुकत नाहीं हें खरें; परंतु मनुष्याला मृत्यूची जी एक प्रकारची जाणीव असते ती इतर प्राण्यांत आढळून येत नाहीं. प्राणांतिक

सं. १८१

वेदना जितक्या तीव्रतेनें मनुष्याला जाणवतात तितक्याच तीव्रतेनें त्या पशुपक्ष्यादिकांनाहि जाणवत असतील; नाहीं असें नाहीं. परंतु मृत्यूच्या जाणीवेनें मनुष्यानें मानवी जीवितासंबंधीं जी तत्त्वज्ञानाची उभारणी केली आहे त्यावर त्याची योग्यता अवलंबून असल्यामुळें मनुष्याच्या जीविताला मोल प्राप्त झालें आहे. एका मनुष्यानें दुसऱ्याचा खून करणें हें पाप गणलें गेलें आहे त्याचें कारण हेंच. मृत्युविषयक कल्पना फक्त मनुष्यजातींतच परिणतावस्थेला पोंचल्या आहेत; आणि त्याचें प्रत्यंतर म्हणजे त्यानें मृत्यूचे विविध प्रकार कल्पिले आहेत हें होय. अमक्याचा अंत झाला, फलाण्याचा खून झाला, एकानें आत्महत्या केली, दुसऱ्या एकाला फांशी देण्यांत आलें, तिसऱ्यानें आत्मयज्ञ केला हे एकाच मृत्यूचे उच्च-नीच भेद फक्त मनुष्यजातींतच संभवतात; इतर प्राण्यांत संभवत नाहींत. कालची आठवण व उद्यांची जाणीव मनुष्यमात्रालाच असतें. भविष्यत्कालांतील कार्यक्रम आगाऊ आंखणें मनुष्यालाच शक्य असतें. पशूंना भविष्यकाळाची जाणीव नसते. एखाद्या महत्त्वाकांक्षी मनुष्याला लहानपणींच ठार मारल्यानें त्याच्या शरिराचाच नाश होतो असें नाहीं तर भावी काळांत मूर्तस्वरूप पावणाऱ्या त्याच्या आकांक्षांचाहि विध्वंस केला जातो. आणि म्हणूनच मरतेवेळीं मनुष्याला शारीरिक वेदनांपेक्षा मानसिक वेदना अधिक होतात. मनुष्याचें मरण हें केवळ त्याच्या शरिराचेंच मरण नसून त्याच्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छा, आशा, आकांक्षा इत्यादिकांचें तें मरण असतें; परंतु घोड्याला आज मारलें काय किंवा उद्यां तो आपसुख मेला काय, एकच. मरते वेळीं खुद्द घोड्याच्या मनावर किंवा त्याच्या मरणानें इतर घोड्यांवर कांहींच परिणाम घडून येत नाहीं. दुःख आणि भीति ह्या दोनच भावना मनुष्येतर प्राण्यांत

संभवतात. त्यांना आपण होऊन मरण आलें काय किंवा दुसऱ्यानें मारलें काय, त्यांच्या सबंध आयुष्यावर त्यामुळें कांहींच परिणाम होत नाहीं; आणि म्हणून त्यांना मारलें असतां मनुष्याला पापपुण्य कांहींच लागत नाहीं अशी चेस्टर्टन यांची विचारसरणी आहे. असो.

निरनिराळ्या विषयांवरील चेस्टर्टन यांच्या ज्या मतांचें येथपर्यंत दिग्दर्शन केलें आहे तीं मतें त्यांच्या ग्रंथांत आणि किरकोळ लेखांत वारंवार आढळून येतात. चेस्टर्टन यांचें बहुतेक आयुष्य प्रतिपक्षाशीं झुंज खेळण्यांत गेल्यामुळें त्यांच्या लिखाणांत वावदूकपणाच विशेष आढळतो. आपला मुद्दा मठ्ठ वाचकांच्या चटकन् लक्षांत येणार नाहीं म्हणूनच कीं काय, ते एकच गोष्ट पुन्हः पुन्हा शेंकडों दाखले देऊन सांगत असतात. यामुळें त्यांच्या वाङ्मयाला वर्तमानपत्री स्वरूप आलें आहे. 'G. K.'s Weekly' या नांवाचें त्यांचें स्वतःचें एक साप्ताहिक असून त्यांतूनच त्यांचें बहुतेक वाङ्मय निर्माण झालें आहे. वर्तमानपत्राच्या धंद्यांत पडणाऱ्या लेखकाला शांतपणें विचार करण्याला फुरसद नसल्यामुळें त्यांच्या लेखनांत रेखीवपणा व भारदस्तपणा यांचें प्रमाण कमीच असतें. चेस्टर्टन यांच्या भाषाशैलींत नीटसपणापेक्षां नखरा जास्त; आलंकारिकपणापेक्षां आवेश अधिक. मार्दवाहून मगरूरपणाच फार. स्वमतप्रतिपादनाच्या व परमतखंडनाच्या भरांत भाषेच्या भारदस्तपणाकडे लक्ष पुरविण्याला त्यांना सवडच नाहीं. रत्नखड्यांबरोबर शिंपल्यांच्या राशीच्या राशी उधळणाऱ्या समुद्राप्रमाणेंच चेस्टर्टन यांची लेखनपद्धति आहे. त्यांच्या लेखांत विनोद, चटकदारपणा, शब्दांची आणि कल्पनांची कसरत यांची इतकी गर्दी झालेली असते कीं, त्यांतून मूळ मुद्द्याकडे जावयास वाचकाला उशीर लागला तरी त्याला कंटाळा येत नाहीं.

यात्रेमध्यें देवदर्शनाला गौणत्व येऊन जत्रा पाहण्याला जसें प्राधान्य येतें, त्याप्रमाणें चेस्टर्टन यांच्या कल्पनांच्या आणि दृष्टान्तांच्या पसाऱ्यांतच वाचकाचें मन इतकें गुरफटून जातें कीं, त्यामुळें त्याचें प्रतिपाद्य विषयाकडे क्वचित् दुर्लक्षहि होण्याचा संभव असतो. तथापि वर्तमानपत्री वाङ्मयांत अत्यावश्यक असलेले सर्व गुण चेस्टर्टन यांचे ठिकाणीं उत्कटत्वानें वास करीत आहेत. मतामतांचा गलबलाच जेथें फार तेथें सर्वांत मोठ्यानें व आवेशानें ओरडून आपलें म्हणणें दुसऱ्याच्या गळीं उतरविणें आवश्यक होऊन बसतें. आपल्या मतांचा मोठ्या धडाडीनें पुरस्कार करणें, शब्दच्छल करून किंवा कोटिक्रम लढवून प्रतिपक्ष्याला निरुत्तर करणें, प्रतिस्पर्ध्यानें लढविलेली हिकमत त्याच्यावरच उलटविणें आणि शत्रु समोर असो अगर नसो, त्याचें अस्तित्व आणि सान्निध्य गृहीत धरून वेळीं अवेळीं त्यावर मोठ्या आवेशानें तुटून पडण्याचा आव घालणें इत्यादि वाग्युद्धांतील सर्व कला चेस्टर्टन यांनीं अगदीं आत्मसात् करून टाकिल्या आहेत. त्यांचा हा लढाऊ बाणा इतक्या थराला गेला आहे कीं, त्याकरितां ते नवीन शत्रु निर्माण करतात व वादाचे नवीन नवीन विषय उकरून काढतात. या बाबतींत ते प्रति डॉन क्विक्झोट आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं! शौर्य, साहस, धडाडी, विशिष्ट व विक्षिप्त मतांचें वेड या बाबतींत जरी चेस्टर्टन यांचें उपरोक्त स्पॅनिश शिलेदाराशीं साम्य असलें तरी त्यांच्या ठिकाणीं जें बुद्धीचें वावडें होतें तो प्रकार चेस्टर्टन यांच्या ठिकाणीं जराहि नाहीं, हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे. कॅथॉलिक पंथाचा पुरस्कार करतांना चेस्टर्टन यांनीं प्रतिपक्षांच्या आक्षेपांचें खंडन इतक्या कुशलतेनें केलें कीं, त्यांच्या बुद्धिमत्तेची आणि वादनैपुण्याची सर्वत्र वाहवा झाली. तथापि त्यांची

लोकोत्तर बुद्धिमत्ता आणि सूक्ष्म व तीक्ष्ण विवेचक शक्ति यांमुळें प्रतिस्पर्धी भांबावून गेला, दिपून गेला, किंवा प्रसंगीं चीतदेखील झाला तरी त्याचें मतपरिवर्तन होत नाहीं. चेस्टर्टन यांच्या कोटिक्रमामुळें तो निरुत्तर झाला तरी त्याचें समाधान होत नाहीं. धर्मभावनेचा उदय अंतःकरणांतून होतो; धर्माची इमारत भावना आणि श्रद्धा यांच्या पायावर उभारावयाची असते. बुद्धीची तेजाळ वीज या इमारतीवर पडली तर ती दुभंगण्याचा संभव अधिक. कॅथॉलिक पंथाचा पुरस्कार करतांना चेस्टर्टन यांनीं सर्व भर तर्कबुद्धीवर दिला आहे. त्यांच्या बुद्धिमत्तेच्या आगींत विरोधकांचें आक्षेपद्रुम जळून खाक झाले; पण त्याबरोबर त्यांची धर्मलताहि करपून गेली. श्रद्धेचें खत आणि भावनेचें पाणी मिळाल्याखेरीज धर्मवेलीला अंकुरच फुटत नाहीं. कोटिक्रमाची पद्धति चेस्टर्टन यांनीं इतक्या थराला नेली आहे कीं, त्यामुळें या कोटिक्रमाच्या जोरावर ते वाटेल तें सिद्ध करून दाखवतील असें सर्वांना वाटूं लागतें; आणि नजरबंदी करणाऱ्या जादूगाराप्रमाणें त्यांजकडे लोक अविश्वासानेंच पाहूं लागतात. कार्डिनल न्यूमनप्रमाणें चेस्टर्टन यांना भिन्नपंथीयांचें परिवर्तन घडवून आणतां आलें नाहीं याचें कारण हेंच होय. तथापि चेस्टर्टन यांनीं बुद्धिमत्तेच्या जोरावर कॅथॉलिक धर्मावर होत असलेले हल्ले परतवून लावले ही त्यांची कामगिरी तद्धर्मीयांना विसरून चालणार नाहीं.

बुद्धीच्या प्रखर उन्हांत काव्यलता करपून जाते असा अनुभव आहे; पण चेस्टर्टन यांच्या बुद्धिमत्तेची दाहक शक्ति त्यांच्या मृदु अंतःकरणांतील भावनांना विघातक न होतां उलट पोषकच झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. एरवीं ते एवढे नामांकित कवि कसे होऊं शकले? आज जरी चेस्टर्टन हे वर्तमानपत्रकार म्हणून ओळखिले

जातात तरी उद्यां वाङ्मयांत त्यांचें नांव कवि आणि निबंधकार म्हणूनच कायम राहील. एकंदर वाङ्मयप्रपंचांत काव्यनिर्मितींतच काय तो आपणाला खरा विरंगुळा व आनंद वाटतो असें ते म्हणतात; त्यावरून त्यांच्या मनाची ठेवण काव्यप्रसवाला कशी अनुकूल आहे हें दिसून येतें. निर्यमक कविता त्यांस पसंत नाहीं. चेस्टर्टन यांनीं आपला काव्यसंग्रह पुस्तकरूपानें नुकताच प्रसिद्ध केला आहे; त्यावरून कवि या नात्यानें त्यांची योग्यता फार मोठी आहे हें निदर्शनास आल्यावांचून राहत नाहीं. त्यांच्या कांहीं फुटकळ कविता विनोदी आणि वक्रोक्तिपूर्ण असल्या तरी इतर काव्यखंडांतून त्यांची प्रतिभा उदात्त व गंभीर कल्पनांना पारखी नाहीं हें प्रत्ययास येतें.

चेस्टर्टन यांचें धिप्पाड शरीर आणि त्यांची तऱ्हेवाईक व एकांतिक मतें यांजकडे लक्ष दिलें म्हणजे तें आधुनिक कालांत राहावयास अयोग्य असे एक पुराणपुरुष वाटतात; व एका दृष्टीनें तें खरेंहि आहे. कारण अलीकडच्या काळची समाजव्यवस्था आणि धर्मव्यवस्था त्यांना पसंत नाहीं. इसवी सनाच्या पांचव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत युरोप खंडांत जी सामाजिक, राजकीय आणि धार्मिक व्यवस्था रूढ झाली होती, ती चेस्टर्टन यांस आदर्शभूत वाटते व तो मध्ययुगीन काल आज फिरून यावा असें त्यांस मनापासून वाटत असतें. काळाला कलाटणी देण्याचें सामर्थ्य फक्त अलौकिक व अवतारी पुरुषांतच आढळून येतें. चेस्टर्टन हे अलौकिक पुरुष आहेत हें खरें, परंतु अवतारी खास नाहींत. त्यामुळें काळाचा ओघ फिरविण्याच्या धडपडींत त्यांना यश येईल असें बिलकुल वाटत नाहीं. सामान्य माणसाप्रमाणें कालाच्या प्रवाहाबरोबर वाहत न जातां आपलें स्थान खंबीरपणें धरून ठेवून गतकालाकडे आशावादीपणानें व निश्चल दृष्टीनें पाहत

राहण्यांत त्यांनीं जें मनोधैर्य प्रगट केलें आहे त्यावरच त्यांची थोरवी अवलंबून आहे. धर्मावर श्रद्धाच काय, पण धर्मवेडेपणा हा देखील त्यांना गुण वाटतो. स्वदेशाभिमान ही एक अत्यावश्यक भावना असून स्वदेशहितार्थ सदैव युद्धाला तयार असणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे असें ते प्रतिपादन करतात. चेस्टर्टन यांस सर्वथैव अनुरूप अशी पत्नी लाभलेली असून त्यांचें वैवाहिक आयुष्य अत्यंत सुखाचें आहे. एकपत्नीव्रताचे ते कट्टे पुरस्कर्ते असून घटस्फोट त्यांना मान्य नाहीं. एकंदर मनुष्यजातीवर त्यांचें प्रेम असून सर्वसाधारण जनतेच्या चांगुलपणावर त्यांचा दृढ विश्वास आहे. सांप्रदाय आणि पूर्वपरंपरा हीं केव्हांहि सोडतां कामा नयेत असें त्यांचें मत आहे. मनुष्यानें सदैव साधुवृत्तीनें राहणें त्यांना पसंत नाहीं. जगांत दोन दिवस काढावयाचे ते ईश्वरावर निष्ठा ठेवून चैनीनें व भविष्यकाळाचा कांहीं एक विचार न करतां काढावे हें त्यांच्या तत्त्वज्ञानाचें सार आहे, असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. जगाची प्रगति खरोखरच होत आहे काय हें सांगणें फार कठीण आहे. प्रगति होत आहे असें मानलें तरी जुन्यानव्याच्या ओढाताणीमध्यें नवमतवाल्यांचा एकदम जोर झाल्यास समाजाचा तोल एकीकडे झुकून तो भलत्याच अवस्थेंत पडण्याची भीति असल्यामुळें चेस्टर्टन यांनीं पुराणमतांचा नवीन पद्धतीनें पुरस्कार करून तो होईल तितका स्थिरावस्थेंत ठेवण्याचा यत्न केला। हीच त्यांच्या चरित्राची फलश्रुति होय.



आर्नोल्ड बेनेट

# आर्नोल्ड बेनेट

माझीं कित्येक लहानमोठीं कामें तुंबून राहिलीं आहेत. माझ्या मनांतून माझें टेबल साफ करावयाचें आज किती तरी दिवस घोळत आहे. घरांतील पुस्तकांवरील धूळ झाडून तीं नीट वर्गवारीनें लावून ठेवण्याचें मीं मनांत योजिल्याला आज किती तरी दिवस झाले. खोलीच्या भिंती अगदीं वाईट दिसूं लागल्यामुळें त्यांना एकदां छानदार रंग देऊन टाकावा असें मी दररोज म्हणतों. घरांतील सर्व मंडळींचा ग्रुफ फोटो काढावयाचें ठरल्याला आज जवळ जवळ वर्ष होऊन गेलें, पण तो अद्यापि निघालेला नाहीं. भिंतीवरील मोठें घड्याळ सारखें मागें पडत असल्यामुळें तें एकदां साफसूफ करावयाला घड्याळजीकडे टाकावें असें म्हटल्याशिवाय एकहि दिवस जात नाहीं. आज किती दिवस नानासाहेब सर्व मंडळीला घेऊन एखाद्या रविवारीं राहायला— निदान जेवायला या, म्हणून पाठीस लागले

आहेत, परंतु अजून त्यांच्या येथें जाण्याचा योग येत नाहीं. माझ्या निरनिराळ्या स्नेह्यांचीं तीन-चार पत्रें येऊन पडल्याला जवळ जवळ दोन आठवडे होत आले आहेत, तरी अद्यापि मीं त्यांना उत्तरें पाठविलेलीं नाहींत. अशा तऱ्हेचीं अगदीं क्षुल्लक कामें उरकून टाकायला देखील मला फुरसत होत नाहीं; मग तुमच्यासारख्या कविता रचावयाला, गोष्टी लिहावयाला, ज्ञान-संग्रह करावयाला आणि मानसिक व आत्मिक उन्नति करावयाला वेळ कसा सापडणार? या नोकरीमुळें अगदीं सगळा दिवस फुकट जातो हो! कांहीं म्हटल्या कांहीं करतां येत नाहीं. खरोखर परिस्थिति मोठी बिकट होत चालली आहे. पोटाला दोन घास मिळविण्यासाठीं धडपड करण्यांतच सगळें आयुष्य फुकट जातें.

वेळेच्या अभावासंबंधीं ह्या व अशाच स्वरूपाच्या दुसऱ्या तक्रारी निरनिराळ्या लोकांकडून आपल्या कानीं पडत असतात; व आपणहि त्यांच्या सुरांत आपला सूर मिळवून संमतिदर्शक माना डोलवीत असतों. तथापि या तक्रारी फोल आहेत, त्यांत कांहीं तथ्य नाहीं, हें आपल्या लक्षांतहि येत नाहीं. आपल्याप्रमाणेंच बहुजनसमाजाचे अनुभव असल्यामुळें आपल्या चुकीच्या समजुतीला अप्रत्यक्षपणें पुष्टि मिळते; परंतु आपल्या या भ्रामक समजुती आर्नोल्ड बेनेटसारखा खमंग इसम जोंपर्यंत आपणांला भेटला नाहीं तोंपर्यंत तग धरून राहतात. आम्हांला वेळ न सापडण्यासंबंधीं आमच्या सर्व खऱ्या-खोट्या तक्रारी जर का आम्ही आर्नोल्ड बेनेट (ते जिवंत आहेत अशी कल्पना करून) यांजपुढें मांडल्या, तर एकूण एक सर्व तक्रारींचे फुगे तडातड् फुटून जाऊन आमची फटफजिती उडण्याला बिलकुल वेळ लागणार नाहीं. आमचा मूर्खपणा आमच्या पदरांत घालण्याकरितां बेनेट हे आमच्या

समोर व्याख्यानहि देणार नाहींत किंवा आम्हांला तत्त्वज्ञानाचे धडे पण शिकविणार नाहींत. हातांत फक्त एक कागद व पेन्सिल घेऊन आणि चेहरा शांत व गंभीर करून ते आम्हांला म्हणतील—

"नोकरीमुळें व संसाराच्या इतर तापामुळें आणि व्यापांमुळें तुम्हांला दुसरीं आवश्यक (व अनावश्यक) कामें करायला फुरसद सापडत नाहीं याबद्दल मला फार हळहळ व सहानुभूति वाटते. मीहि तुमच्यासारखा एक यःकश्चित् मनुष्य आहे, व माझी आर्थिक परिस्थितीहि तुमच्याहून फारशी समाधानकारक नाहीं; कारण माझ्या मिळकतीप्रमाणें माझा खर्चहि अवाढव्य आहे. तेव्हां आपणां सर्वांना आहे त्यांतच कसाबसा वेळ काढून आपलीं महत्त्वाचीं कामें केलीं पाहिजेत. तेव्हां आपण दररोजचें एक वेळापत्रकच तयार करूं या. दिवसाचे तास किती?—चोवीस. तुम्ही सकाळीं किती वाजतां निजून उठतां?"

हा प्रश्न ऐकतांच तुम्ही कावरेबावरे होणें अगदीं स्वाभाविक आहे व या गृहस्थाजवळ आपणांला वेळ सापडत नाहीं असें बोललों नसतों तर बरें झालें असतें असेंहि तुमच्या मनांत येईल; पण आतां वाईट वाटून उपयोगी नाहीं. तुमचा हात आतां रगाड्यांत सापडला आहे. बेनेट यांचा स्वभाव तुम्हांला माहीत नाहीं. ते आतां तुम्हांला थोडेच मोकळे सोडणार आहेत! तेव्हां आतां तुम्हांला सकाळीं सात वाजतां उठतों असें सांगण्याची लाज वाटत असेल तर खोटें बोलण्याचें पाप पदरीं घेऊन "मी होय? मी सकाळीं...पांच वाजतां उठतों" असें ठासून सांगा.

बेनेट यांस रात्रीं फार वेळ जागण्यापेक्षां, पहाटेस उठणेंच अधिक

पसंत आहे. परंतु आपलें मत गुलदस्तांत ठेवून ते आश्चर्यचकित मुद्रा करून म्हणतील—

"काय ? इतक्या पहाटे तुम्ही निजून उठतां ? (डोळे मिचकावून) जिवाचे इतके हाल करण्यांत काय हशील आहे ? माझ्याकडून आणखी दोन तास घ्या. माझ्या मतें तुम्हीं सकाळीं सात वाजतां निजून उठावें."

आपण उगाच खोटें बोललों असें तुम्हांला वाटेल. पण आतां त्याला इलाज नाहीं. खोटें बोलूं नये; पण आपण बोललों खरें. तेव्हां आतां खोट्यालाच चिकटून बसलें पाहिजे. नाहीं तर बेनेट म्हणतील— "तुम्हीं प्रथमपासूनच खोटें बोलायला सुरवात केलीत; तेव्हां तुम्हांला वेळ सापडत नाहीं ही तुमची तक्रार बिलकुल खरी दिसत नाहीं !"

बेनेट—तेव्हां काय समजलांत. तुम्ही एखाद्या सोकाजीरावासारखे सात वाजतां निजून उठलेत तरी माझी हरकत नाहीं. बरें, तुमचें ऑफिस किती वाजतांचें असतें ?

पृच्छक—साडेदहा.

बेनेट—तुम्ही शहराबाहेर राहत असल्यामुळें तुम्हांला घरांतून नऊ वाजतांच बाहेर पडलें पाहिजे. तेव्हां सात ते नऊ तुमचा वेळ स्नान (संध्या) जेवणें यांतच जाणार. बरें, तुमची गाडी किती वाजतांची ?

पृच्छक—सव्वानऊची.

बेनेट—तुम्ही स्टेशनावर किती वाजतां पोंचतां ?

पृच्छक—नऊ वाजून पांच मिनिटांनीं.

बेनेट—काय ? नऊ वाजून पांच मिनिटांनीं ? इतक्या लवकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९५१

स्टेशनवर कशाला जातां? तुमचीं दहा मिनिटें जर अशा तऱ्हेनें दररोज फुकट जाऊं लागलीं तर रविवार सोडून महिन्याचे तुमचे चार तास म्हणजे वर्षांचे दोन दिवस म्हणजे पुढील पन्नास वर्षांच्या आयुष्यांतील शंभर दिवस अगदीं नाहक व कायमचे फुकट गेले ! तेव्हां तुम्ही दहा-दहा मिनिटें गाडीच्या अगोदर न जातां गाडीच्या फक्त एकच मिनिट अगोदर जात जा. बरें, तुम्हांला गाडींत वाचण्याचा वगैरे कांहीं नाद ?

**पृच्छक**—नाद म्हणजे कांहीं विचारूं नका. गाडींत चांगला अर्धा-पाऊण तास घालवावा लागतो, तेव्हां वर्तमानपत्र विकत घेऊन अथपासून इतिपर्यंत वाचून काढतों. ( किंचित फुशारकीनें ) आम्हांला गाडींत चकाट्या पिटीत बसण्याचा किंवा पत्त्यांनीं खेळण्याचा तिटकारा आहे.

**बेनेट**—तुम्ही वर्तमानपत्र स्वतः विकत घेतां हें उत्तम. शेजारच्या इसमाच्या हातांतील वर्तमानपत्राकडे डोकावून पाहण्यापेक्षां स्वतः विकत घेऊन वाचणेंच अधिक चांगलें. परंतु तुम्ही माझें ऐका. ऑफिसांत जातांना गाडींत वर्तमानपत्रें बिलकुल वाचावयाचीं नाहींत. वर्तमानपत्रें हीं घाईघाईनें लिहून घाईघाईनें छापलेलीं असतात; म्हणून तीं अगदीं थकल्या वेळीं, कचेरींतून परत येतांना व घाईघाईनेंच वाचलीं पाहिजेत. अहो, खुद्द मला वर्तमानपत्रें वाचण्याचा तुमच्या-पेक्षांहि अधिक नाद आहे. मी दररोज पांच इंग्रजी व दोन फ्रेंच दैनिकें आणि त्याखेरीज कित्येक साप्ताहिकें अगदीं नियमितपणें वाचतों. नुसतें वर्तमानपत्री वाङ्मय वाचण्यांत जर तुमचा रोजचा अर्धा तास फुकट जाऊं लागला; म्हणजे तुमच्या आयुष्यांतलीं साडे-तीन वर्षें पाण्यांत गेलीं. तेव्हां ऑफिसांत जातांना वर्तमानपत्रें न

वाचतां कादंबरीखेरीज एखाद्या गंभीर विषयावरील तुमच्या आवडीचीं पुस्तकें वाचीत जा. बरें, तुमचें ऑफिस सुटतें केव्हां ?

**पृच्छक**—ऑफिस सुटण्याची वेळ साडेपांचची आहे; परंतु कामाच्या मानाप्रमाणें ऑफिसांतून सुटायला सहा-साडेसहा होतात.

**बेनेट**—कांहीं हरकत नाहीं. आपण पगार खातों, तेव्हां ऑफिसांतील कामांत चुकारपणा बिलकुल उपयोगी नाहीं. १०॥ ते ६॥ पर्यंत तुम्हीं कसा वेळ घालविलात हें तुम्हांला मी विचारणार नाहीं. तथापि तुम्हांला मध्यें अर्धा-पाऊण तास सुटी असते इकडे माझें दुर्लक्ष झालेलें नाहीं. खरें पाहिलें असतां या वेळांत तुम्हीं वर्तमानपत्रें वाचून काढलीं पाहिजेत. बरें, पण तें असो. ऑफिसांतून घरीं आल्यावर तुम्ही थकून जाणें अगदीं स्वाभाविक आहे. निदान घरांतील मंडळीस आपण फार थकलों आहोंत, असें तुम्हीं जरूर दाखविलें पाहिजे. नाहीं तर तुमच्या ऑफिसांतील कामाची मातब्बरी राहणार नाहीं. घरीं येतांच चहापाणी झाल्यावर तुम्ही फिरायला जाणार; नाहीं तर गप्पागोष्टी करीत बसणार. पुढें रात्रीचें जेवण होतांच विड्या ओढणार. कदाचित् बाजाची पेटी वाजविणार, क्वचित् बिझिकचा डाव टाकणार; केव्हां केव्हां एखादें पुस्तक किंवा मासिक चाळून त्यांतील चित्रें पाहणार व आतां झोपावें असें म्हणत म्हणत एक तास फुकट घालविणार व शेवटीं अकरा वाजतां एकदांचें बिछान्यावर अंग टाकणार! आणि पुन्हा सकाळीं सात वाजतां उठणार! मी तुम्हांला सांगतों, मनुष्याला इतकी झोप चांगली नाहीं. (एका प्रसिद्ध डॉक्टरनें लिहिलेलें एक अतिशय जाड पुस्तक उघडून) हा सुप्रसिद्ध डॉक्टर काय म्हणतो तें पाहा— 'बहुतेक लोक आपलें अर्धेअधिक आयुष्य मूर्खपणानें निव्वळ झोपेंत

फुकट घालवितात'. तेव्हां पाहा. जर तुम्हांला सात वाजतां उठायचें असेल तर तुम्हीं एक वाजण्यापूर्वी झोंपतां कामा नये; व अकरा वाजतां झोपावयाचें असेल तर तुम्हांला सकाळीं पांच वाजतां उठून कामाला लागलें पाहिजे. (चेहरा गंभीर करून) मी बोलतों तिकडे जरा लक्ष द्या. दिवसाचे तास चोवीस. आठ तास तुम्हीं नोकरी केलीत. उरले सोळा तास. त्यांतून झोपेचे सहा तास गेले. म्हणजे बाकी राहिले दहा तास. तुम्ही मघांशी म्हणत होतां कीं, नोकरीमुळें तुम्हांला कांहीं एक काम करायला फुरसद मिळत नाहीं. मग ह्या दहा तासांचा हिशेब द्या पाहूं! ह्या दहा तासांत तुम्हीं म्हणण्या-सारखें काय काम केलेंत? तुम्ही म्हणाल कीं, आम्ही इतकें (?) काम करतों तेव्हां थोडासा वेळ आळसांत व करमणुकींत आम्हीं घातला म्हणून काय झालें? पण मी कुठें नाहीं म्हणतों आहे! आळसांत व करमणुकींत थोडासा वेळ जरूर घालवावा. पण दहा तास म्हणजे 'थोडासा' वेळ कीं काय? विड्या ओढणें, गप्पा ठोकणें आणि पत्त्यांनीं खेळणें यांत दररोज तुम्ही दहा तास घालविणार? वेळेला कांहीं किंमत आहे कीं नाहीं! मी तुम्हांला एक तास विड्या फुंकायला व तपकीर ओढायला, एक तास गप्पा ठोकण्याला व दोन तास पाहिजे त्या करमणुकींत वेळ घालवायला देतों. तरी देखील तुमचे सहा तास उरतातच. ह्या सहा तासांत तुम्हांला किती कामें करतां येणें शक्य आहे याचें तुम्हीं कधीं गणित केलें आहे काय? या सहा तासांत तुमचीं तुंबून राहिलेलीं सर्व कामें तर होतीलच; पण त्याखेरीज तुमच्या अल्प आयुष्यांतसुद्धां तुम्हांला ४०-५० कादंबऱ्या, २५-३० नाटकें व इतर विषयांवर २०-३० किरकोळ पुस्तकें सहज लिहितां येतील; एवढेंच नव्हे तर त्यावर माझ्याप्रमाणें अलोट पैसा व उज्ज्वल

कीर्तिहि तुम्हांला संपादन करतां येईल ! हें सर्व मी तुम्हांला माझ्या स्वतःच्या अनुभवावरूनच सांगतों आहें.

**पृच्छक**—( किंचित् शरमून विनयपूर्वक ) मिस्टर बेनेट, तुम्हीं आपणां स्वतःकरितां तयार केलेलें वेळापत्रक मला मेहेरबानी करून देऊं शकाल काय ?

**बेनेट**—कां नाहीं देणार ! जरूर देईन. ( How to Live 24 Hours a Day हें पुस्तक बॅगमधून काढून ) तुम्ही माझें हें छोटें पुस्तक वाचा. त्यांत माझें वेळापत्रक तुम्हांला सापडेल.

**पृच्छक**—( पुस्तकाचा आनंदानें स्वीकार करून ) परंतु काय हो, मिस्टर बेनेट, वेळापत्रकाप्रमाणें दररोज ठरलेल्या वेळीं ठरलेलीं कामें करावयाला आपलें शरीर म्हणजे टाइम-टेबलप्रमाणें ठराविक वेळीं ठराविक स्टेशनवर उभी राहणारी गाडी नव्हे ! मनुष्य जर इतक्या वक्तशीरपणें दररोज काम करूं लागला, तर त्याच्यांत आणि एखाद्या यंत्रांत फरक तो काय राहिला ? मनुष्याचें शरीर म्हणजे कांहीं घड्याळाचें यंत्र नव्हे !

**बेनेट**—हा तुमचा केवळ भ्रम आहे. मनुष्यांत आणि एखाद्या यंत्रांत कांहींच फरक नाहीं.

**पृच्छक**—( आश्चर्यानें ) काय ! मनुष्यांत आणि यंत्रांत कांहींच फरक नाहीं ? तुम्ही हें सिद्ध करून द्याल काय ?

**बेनेट**—सहज सिद्ध करून देईन. तुम्ही समजतां इतका मनुष्यांत आणि यंत्रांत बिलकुल फरक नाहीं. याविषयीं माझें म्हणणें काय आहे हें जर तुम्हांला कळावयास पाहिजे असेल, तर माझें The Human Machine हें पुस्तक वाचा. (बॅगमधून पुस्तक काढून देतात. )

**पृच्छक**—( आनंदानें पुस्तक घेऊन ) वा: ! मिस्टर बेनेट, तुम्ही तर विचार केल्याशिवाय कोणतेंच विधान करीत नाहीं असें दिसतें ! तथापि मनुष्यानें एखाद्या यंत्राप्रमाणें वागावयाचें म्हणजे त्याला मन आपल्या ताब्यांत ठेवतां आलें पाहिजे.

**बेनेट**—अलबत्. पण त्यांत एवढें कठीण तें काय आहे ? अभ्यासानें या गोष्टी सहज शक्य आहेत. या बाबतींत पुष्कळ उपयुक्त माहिती तुम्हांला या माझ्या दोन पुस्तकांत मिळेल. ( बेनेट Mental Efficiency व Self and Self-managment हीं आपलीं दोन पुस्तकें बॅगमधून काढून पृच्छकाच्या हातीं देतात. )

**पृच्छक**—( अत्यानंदानें पण किंचित् ओशाळून ) खरोखरीच कमाल केलीत तुम्हीं. तुम्हीं मानसशास्त्राचा चांगलाच अभ्यास केलेला दिसतो. तथापि कादंबऱ्या व नाटकें यासंबंधीं कांहीं वेळापूर्वी तुम्हीं केलेल्या विधानाबद्दल माझ्या कांहीं शंका आहेत त्यांचें आपण निरसन कराल काय ?

**बेनेट**—आनंदानें.

**पृच्छक**—शंका येवढीच कीं, मन यंत्राप्रमाणें कितीहि ताब्यांत ठेवलें तरी त्यामुळें आपणाला उत्तम कादंबऱ्या व नाटकें लिहितां येतील असें माझें मन मला सांगत नाहीं. उत्कृष्ट वाङ्मय निर्माण व्हावयाला नैसर्गिक प्रतिभाच पाहिजे, सरस्वतीदेवीचा वरदहस्त असल्याखेरीज—

**बेनेट**—प्रतिभा अन् स्फूर्ति हीं सर्व थोतांडें आहेत. त्यांचे पवाडे मजपुढें गाऊं नका. ( छाती फुगवून किंचित् गर्वानें) आतां हेंच पाहा, मी कांहीं एखादा सामान्य ग्रंथकार नाहीं हें तुम्हांला कबूल केलेंच पाहिजे. कांहीं नाहीं तरी निदान शेंपन्नास पुस्तकें मीं आजपर्यंत

लिहिलीं आहेत; परंतु तीं लिहितांना प्रतिभादेवीची मला एकदांहि आराधना करावी लागलेली नाहीं. ठराविक तासांत ठराविक शब्द याप्रमाणें मीं माझीं सर्व पुस्तकें लिहिलेलीं असून त्यांवर मीं आज इतका पैसा मिळविला आहे. यांत अलौकिक असें कांहीं नाहीं. तुम्हीदेखील माझ्याइतकीं व माझ्यासारखीं पुस्तकें लिहूं शकाल. मात्र तत्पूर्वीं माझीं त्या विषयांवरील दोन उत्कृष्ट पुस्तकें तुम्हांला वाचावीं लागतील. (The Author's Craft व The Truth About an Author हीं पुस्तकें बॅगमधून काढून देतात.)

**पृच्छक**—(बेनेट यांच्या चांगुलपणाची कशी स्तुति करावी हें न समजल्यामुळें जरा गोंधळून जाऊन) खरोखर, तुमच्या मोठेपणाची कशी तारीफ करावी हें मला—

**बेनेट**—(मनांतून खूष होऊन पण चेहऱ्यावर आनंद न दाखवितां) छे, छे! तारीफ करण्याचें कांहीं कारण नाहीं. या गोष्टी केवळ अभ्यासानें—

**पृच्छक**—तें कबूल; परंतु तुमच्यासारख्या सड्या माणसालाच या गोष्टी शक्य आहेत. आमच्यासारख्या विवाहशृंखलांनीं बद्ध झालेल्या माणसांना तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें—

**बेनेट**—अहो चुकताहांत तुम्ही! आधीं मी सडाफटिंग आहे हा तुमचा गैरसमज आहे. माझें एका फ्रेंच बाईबरोबर लग्न झालेलें आहे; परंतु तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें लग्नासंबंधीं माझा अनुभव नाहीं. उलटपक्षीं लग्न झाल्यामुळें माझ्या अर्धांगीला सौख्य मिळावें व तिला कांहीं कमी पडूं नये म्हणून मला श्रम करण्याला अधिक उत्साह येतो व माझ्या सुखसोयींकडे आपलेपणानें पाहणारी पत्नी मला मिळाल्यामुळें मला आतां पूर्वीपेक्षां किती तरी अधिक वेळहि

मिळूं लागला आहे. विवाहपूर्व जर तुम्हांला दर दिवशीं चार तास फुरसद मिळत असली, तर विवाहोत्तर तुम्हांला सहा तास फुरसद मिळाली पाहिजे. माझें Married Life हें पुस्तक तुम्हीं वाचलेंत म्हणजे लग्नासंबंधीं आपलें धोरण कसें असलें पाहिजे, लग्न झाल्यानंतर आपल्या वागणुकींत फरक करणें आवश्यक आहे किंवा काय; व आवश्यक असल्यास तो किती प्रमाणांत केला पाहिजे हें तुम्हांला कळून येईल. माझें हें पुस्तक मुख्यत्वेंकरून अविवाहित तरुणांच्याच जास्त उपयोगाचें आहे हें जरी खरें, तरी विवाहित मंडळींनींहि तें वाचलें असतां त्यांना त्यांत पुष्कळच घेण्यासारखें मिळेल अशी माझी खात्री आहे. (बेनेट आपल्या बॅगमधून उपरोक्त पुस्तक बाहेर काढीत नाहींत असें पाहून—)

पृच्छक—तुम्ही म्हणतां हें पुस्तक अजून प्रसिद्ध व्हावयाचें आहे वाटतें? कांहीं हरकत नाहीं. तुम्हीं मानवी जीवितासंबंधीं सर्व बाजूंनीं विचार केलेला दिसतो. या विषयासंबंधीं तुम्हीं जीं जीं म्हणून पुस्तकें लिहिलीं आहेत तीं जर मला वाचायला मिळतील—

बेनेट—कां नाहीं मिळणार? आम्हांला तुमच्यासारखे जितके जिज्ञासु वाचक मिळतील तितके पाहिजेच असतात. किंबहुना तुमच्यासारखे उत्साही वाचक जगांत असतात म्हणूनच आम्ही असलीं पुस्तकें लिहितों. नाहीं तर आम्हांला असल्या विषयांवर पुस्तकें लिहावयाला हुरूप कसा येणार? Married Life या पुस्तकाखेरीज माझें जवळ जवळ त्याच विषयाची अधिक सांगोपांग चर्चा केलेलें How to Make the Best of Life या नांवाचें दुसरें एक अत्युत्कृष्ट पुस्तक वाचण्याची मी तुम्हांला शिफारस करतों. हीं दोन्ही पुस्तकें लागोपाठ वाचणें जास्त फायदेशीर असल्यामुळें मघांशी मीं एकच

पुस्तक बॅगमधून बाहेर काढलें नाहीं. ( बॅगमधून दोन्ही पुस्तकें बाहेर काढून ) हीं दोन्ही पुस्तकें वाचावीं अशी तुम्हांला शिफारसच नव्हे तर आग्रह आहे. तुमच्यासारखे दांडग्या जिज्ञासेचे वाचक जगांत केव्हांहि एका हाताच्या बोटांवर—

पृच्छक—( बेनेटसारख्या सुप्रसिद्ध ग्रंथकारानें आपली स्तुति केल्यामुळें नवपरिणीत वधूप्रमाणें लज्जित होऊन ) छे, छे! आम्ही कसले वाचक! पण खरें सांगायचें म्हणजे तुम्हीं लिहिलेलीं सर्वच पुस्तकें वाचून काढावयाचीं अशी मनांत मीं मधांशीच प्रतिज्ञा करून टाकली आहे, ( बेनेट यांच्या हातांतील उपरोक्त दोन्ही पुस्तकें घेऊन ) आपल्यासारख्या बड्या ग्रंथकारानें आपण होऊन इतकीं पुस्तकें मला दिलीं याविषयीं मला किती अभिमान वाटत आहे हें मला शब्दांनीं व्यक्त करून दाखवितां येत नाहीं. खरोखर आपल्या या अनुग्रहाबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. मला—

बेनेट—छे, छे! त्यांत आभार मानण्यासारखें काय आहे! हीं पुस्तकें तुम्हीं कोणत्याहि दुकादाराकडून मागविलीं असतां तुम्हांला सहज मिळालीं असतीं. माझ्या How to Make the Best of Life याच पुस्तकाची किंमत काय ती जरा जास्त म्हणजे पांच रुपये आहे. इतर सर्व पुस्तकें अगदीं माफक किंमतीला म्हणजे प्रत्येकीं केवळ दीड रुपयाला मिळूं शकतात. नाहीं म्हणायला The Truth About an Author याची किंमत सव्वा-तीन रुपये आहे. म्हणजे तुम्हांला एकंदर फक्त १८॥ रुपये द्यावे लागतील. हीं पुस्तकें दुकानदाराकडून तुम्हीं मागविलीं असतीं तर तुम्हांला टपालाचा खर्च आला असता तो हीं पुस्तकें तुम्हीं खुद्द

माझ्याजवळूनच घेतल्यामुळें तुम्हांला आलीं नाहीं; हाच काय तो तुमचा फायदा. आतां खुद्द ग्रंथकाराच्या हातून तुम्हांला हीं पुस्तकें मिळालीं म्हणून तुम्ही म्हणतां कीं तुम्हांला एक प्रकारचा अभिमान वाटतो; पण हा तुमचा केवळ मनाचा मोठेपणा होय.

**पृच्छक**—( हीं सर्व पुस्तकें आपणांला नजर केलेलीं नाहींत हें कळून येतांच तोंडांत मारल्याप्रमाणें खजील होऊन, परंतु सर्व पुस्तकें वाचण्यासंबंधींच्या मनांतील प्रतिज्ञेचा उच्चार केल्यामुळें तोंडावर कृत्रिम हास्य आणून ) कसला कसला मोठेपणा ( कच खाऊन ) आपलीं सर्व पुस्तकें मी आतांच वाचून काढूं शकेन असें थोडेंच आहे. तूर्त त्यांतील एक-दोनच वाचण्याचा माझा इरादा आहे; तेव्हां—

**बेनेट**—तुम्ही चुकतां आहांत. माझा Buying and Reading हा निबंध जर तुमच्या वाचनांत आला असता तर तुम्हीं असे उद्गार तोंडांतून काढलेच नसतेत. त्या निबंधांत स्वतः पुस्तकें विकत न घेतां तीं फुकट वाचायला चटावलेल्या लोकांवर मीं ताशेरा झाडला असून, वाचण्यालायक प्रत्येक पुस्तक पैसे टाकून विकत घेणेंच कसें श्रेयस्कर आहे हें मीं उत्तम रीतीनें सिद्ध करून दाखविलें आहे. शिवाय तुम्हीं मजजवळून आतां विकत घेतलेलीं पुस्तकें हीं मीं निव्वळ प्रसंगोपात्त लिहिलेलीं पुस्तकें आहेत. मीं जी लोकप्रियता आज संपादन केली आहे व दोन पैसे संग्रहीं टाकले आहेत ते केवळ माझ्या कादंबऱ्यांवर. मीं सुमारें ३०-३५ कादंबऱ्या लिहिल्या असून, त्यांतील निदान दहापंधरा तरी अत्यंत लोकप्रिय झाल्या असून त्यांवर सर्व वृत्तपत्रांतून उत्तम अभिप्राय आले आहेत. तुम्हांला माझ्या सर्वच कादंबऱ्या आवडतील असें म्हणण्याचें धाडस मी

करीत नाहीं. परंतु तुमच्या एकंदर स्वभावावरून माझ्या ८-१० कादंबऱ्या व ५-६ नाटकें तरी तुम्हांला आवडल्याखेरीज राहणार नाहींत असें मी खात्रीपूर्वक विधान करूं शकतों. पण हें मी तुम्हांला सांगायला कशाला पाहिजे? मी प्रत्यक्ष तुम्हांला काढूनच— ( बेनेट आपल्या बॅगकडे बघतात. )

पृच्छक—( फिकट चेहरा करून व भीतीनें गांगरून ) नको! नको! इतकी तसदी कशाला घेतां? तूर्त इतकींच पुरेत. आपल्या इतर पुस्तकांची फक्त यादीच द्या म्हणजे झालें. ( जड अंतःकरणानें घेतलेल्या पुस्तकांचे पैसे मोजून ) आत्ताच्या आत्तां मला एके ठिकाणीं कामाला जावयाचें आहे. पुढें केव्हां तरी मी आपली भेट जरूर घेईन. मघांशी तुम्हीं सांगितल्याप्रमाणें वेळेची काटकसर करण्याचें मीं ठरविलेंच आहे. तेव्हां आतां मला शक्य तितक्या लवकर तिकडे गेलेंच पाहिजे. पुस्तकांचें ओझें हातांत घेऊन घाईघाईनें निघून जातात. )

उपरोक्त संभाषण जरी स्वकपोलकल्पित आहे, तरी त्यांतील वेळेसंबंधींचें व आयुष्यविषयक तत्त्वज्ञान आमचें नसून, खुद्द बेनेट यांचेंच आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच. संभाषणांत बेनेट यांच्या ज्या ज्या पुस्तकांचा उल्लेख आला आहे तीं प्रत्येकानें एकदां अवश्य ( पण बेनेट यांच्या मताप्रमाणें विकत न घेतां ग्रंथसंग्रहालयांतून आणून ) वाचून काढण्यालायक आहेत; कारण त्याखेरीज बेनेट यांच्या यशाचें मर्म नीटसें ध्यानांत येणार नाहीं.

बेनेट यांच्या चरित्राचें निरीक्षण केलें असतां त्यांनीं आपलें आयुष्य खरोखरीच एखाद्या यंत्राप्रमाणें वेळापत्रकाबरहुकुम घालविलें असें कबूल करावें लागतें. " आर्नोल्ड बेनेट ह्यांनीं मध्यें केव्हांहि विशेष

खळ पडूं न देतां, आपण स्वतः आखलेल्या धोरणानें सतत ३७ वर्षे जितक्या वक्तशीरपणानें काम केलें तितक्या वक्तशीरपणानें दुसरा कोणी काम करूं शकेल असें मला वाटत नाहीं." अशा आशयाचे उद्‌गार खुद्द बेनेट यांच्या पत्नीनेंच काढले आहेत. लग्नानंतरहि बेनेट यांनीं आपल्या दैनिक कार्यक्रमांत फारसा फरक केला नाहीं. पहाटे उठावयाचें, (लग्न झाल्यावरहि) आपला चहा आपण स्वतः करून घ्यायचा व आदल्या दिवशीं स्मरणवहींत काढलेल्या टिप्पणीवरून आपल्या लिखाणास सुरुवात करावयाची असा त्यांचा परिपाठ होता. बेनेट यांच्या अंगांत कोणत्याहि तऱ्हेचा कोट असो, कोटाच्या ठराविक खिशांत त्यांची स्मरणवही बिनचूक असावयाची. बेनेट यांच्या तैनातीला त्यांच्या अर्धांगीखेरीज एक लेडी सेक्रेटरी व इतर अनेक परिचारिका असूनहि आपला सकाळचा चहा आपण स्वतः करून पिण्याच्या त्यांच्या या हट्टाचें त्यांच्या पत्नीनेंच कौतुकानें वर्णन केलें आहे. आदल्या दिवशीं रात्रीं ती चहाचें सर्व साहित्य आपल्या पतिराजांच्या झोपण्याच्या खोलीमध्यें तयार करून ठेवीत असे. सकाळीं नियमितपणें अभ्यंग-स्नान आटोपून बरोबर ९ वाजतां ते न्याहारी करीत. वर्तमानपत्रांचें वाचन ते याच वेळीं उरकून घेत. न्याहारीनंतर सिगारेट ओढणें हा त्यांच्या कार्यक्रमांतलाच एक भाग होता. सिगारेट ओढायला लागणाऱ्या अवधींत ते आपलें मन एकाग्र करीत व लगेच आपल्या लेखनशाळेंत जाऊन आपल्या लेखनकार्याला सुरुवात करीत. स्मरण-वहींत लेखनाला पुरेशी सामुग्री नाहीं असें जर त्यांना आढळून आलें, तर ते स्मरणवही घेऊन फिरायला जात व एकदोन तासांत परत येऊन पुन्हा लिहावयाला सुरुवात करीत. दुपारच्या जेवणानंतर त्यांची वामकुक्षी पंचवीस वर्षांत एकदांहि टळली नाहीं. १ जानेवारी-

पासून ३१ डिसेंबरपर्यंत बेनेट यांचा दैनिक कार्यक्रम अखंड चाललेला असावयाचा. वयाच्या पंचविसाव्या वर्षापासून ते विनोदानें म्हणत असत कीं, मी चाळिसाव्या वर्षी फ्रेंच बाईबरोबर लग्न करणार आहे; आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, वयाच्या बरोबर चाळिसाव्या वर्षी त्यांनीं एका फ्रेंच बाईबरोबर लग्न केलें! जन्ममरणाच्या गोष्टी आपल्या हातच्या नाहींत म्हणून; नाहीं तर बेनेट यांनीं त्या बाबतींतहि आपलें म्हणणें खरें करून दाखविलें असतें!



मॅक्झिम गॉर्की

# क्रान्तिकारक कलावन्त मॅक्झिम गॉर्की

## गॉर्की व हिंदुस्थान

गेल्या महिन्याच्या १६ व्या तारखेस हिंदुस्थानांत बऱ्याच ठिकाणीं गॉर्की-दिन मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. वस्तुतः गॉर्की हा रशियन म्हणजे हिंदुस्थानच्या दृष्टीनें एक विदेशी व विधर्मी लेखक; शिवाय त्याला नोबेल प्राइझहि मिळालेलें नाहीं! तेव्हां हिंदुस्थानात त्याचें एवढें स्तोम कां माजविण्यांत यावें हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. गॉर्कीचा नुकताच झालेला मृत्यु हीच केवळ त्याच्या गुणानुवर्णाला यदृच्छेनें कारणीभूत झालेली घटना नाहीं. कारण मृत्यूमुळेंच जर मनुष्याच्या मोठेपणांत भर पडत असती, तर गॉर्कीच्या अगोदरच कांहीं दिवस जी. के. चेस्टर्टन व तत्पूर्वीं ऑंरी बारब्यूस व रुड्यार्ड किप्लिंग इत्यादि विख्यात साहित्यिकांच्या मृत्यूनंतर

दुखवट्याच्या सभा भरविण्यांत यावयास पाहिजे होत्या. पण या साहित्यिकांच्या मृत्यूनंतर त्यांजवर नियतकालिकांतून लेख लिहिण्यांत आले, तरी त्यांच्या गुणगौरवार्थ कोणी जाहीर सभा भरविल्या नाहींत किंवा मिरवणुकीहि काढल्या नाहींत. मग हिंदुस्थानांत विदेशी व विधर्मी गॉर्कीबद्दल एवढा पक्षपात कां? याला उत्तर इतकेंच कीं रशियाशीं अनेक बाबतींत साम्य असणाऱ्या हिंदुस्थानांतील ज्या विशिष्ट वर्गानें हा गॉर्कीदिन साजरा केला त्याला गॉर्की हा विदेशी व विधर्मी वाटत नाहीं, तर आपलाच—आपल्या आकांक्षा व्यक्त करणारा लेखक वाटतो.

## गॉर्कीचें वैशिष्टय

गॉर्कीचें वैशिष्टय यांतच आहे. त्याची वाङ्मयीन व इतर क्षेत्रांतील कामगिरी ही आज एका विशिष्ट देशापुरतीच मर्यादित झालेली नाहीं. ज्या वर्गकलहाच्या भावनेनें त्यानें आपलें बरेंचसें वाङ्मय निर्माण केलें व मजूरवर्गापुढें निश्चित ध्येय ठेवून तें साधण्याकरितां त्यांना कार्यप्रवण केलें तो वर्गकलह राष्ट्राराष्ट्रांमधील कृत्रिम मर्यादा ओलांडून सर्व जगभर आज अत्यंत उग्र स्वरूपांत फैलावलेला दिसून येत आहे. तेव्हां हिंदुस्थानांत या वर्गकलहाचें तत्त्वज्ञान पटलें आहे अशा लोकांना गॉर्कीबद्दल आपलेपणा वाटावा यांत नवल तें काय?

## गॉर्की व इतर रशियन लेखक

निव्वळ लेखक या दृष्टीनें पाहिलें तर जागतिक वाङ्मयांतच काय, पण खुद्द रशियन वाङ्मयांतच गॉर्कीपेक्षां श्रेष्ठ असे कलावंत लेखक बरेच निर्माण झाले असल्याचें आढळून येईल. पुश्किन,

तर्जिनेव्ह, डोस्टोव्हस्की, चेकॉव्ह व टॉल्स्टॉय यांपैकीं प्रत्येक लेखक गॉर्कीच्या तोडीचा आहे; एवढेंच नव्हे, तर कलेच्या, स्वभाव-रेखनाच्या किंवा कथनकौशल्याच्या दृष्टीनें विचार केला तर, उपर्युक्त लेखकांपैकीं निदान दोनतीन लेखक तरी गॉर्कीपेक्षां निःसंशय श्रेष्ठ दर्जाचे ठरतील, हें कोणालाहि कबूल करावें लागेल. उपरिनिर्दिष्ट पांचाहि लेखकांपेक्षां गॉर्कीनें रशियांत जी अधिक लोकप्रियता संपादन केली, तिला त्याच्या लिखाणांतील कोणते गुण कारणीभूत झाले तें पाहणें जरूर आहे. डोस्टोव्हस्की काय किंवा चेकॉव्ह काय– यांनीं रशियांतील झारशाहीच्या जुलुमामुळें गांजलेल्या व गंजलेल्या अशा पददलित लोकांच्या सुखःदुखांची– विशेषतः दुःखांची– अगदीं सहृदयतेनें चित्रें रेखाटलीं व दारिद्र्य हें अनेक प्रकारच्या पापांना कसें जन्म देतें याचें मोठें हृदयस्पर्शी वर्णन केलें. परिस्थितीखालीं दडपून गेलेल्या समाजाचें सूक्ष्म अवलोकन त्यांच्या लिखाणांत पदोपदीं दृष्टीस पडतें. मानवी मनोव्यापारांचे सूक्ष्म धागेदोरे कुशलतेनें गुंफण्यांत व गुंफल्यानंतर ते हलक्या हातानें सोडविण्यांत हे दोघेहि लेखक मोठे वाकबगार होते यांत शंका नाहीं. परंतु गॉर्कीशीं तुलना करतां त्यांच्या लिखाणांत जें मोठें वैगुण्य आढळून येतें तें हें कीं, दलितवर्गाच्या सुखदुःखांची त्यांनीं फक्त हळव्या अंतःकरणानें मानसिक चिकित्सा केली व त्यांच्या दुःखांना दैवी आपत्ति समजून समाजांतील पापांना पर्यायानें परमेश्वर व परमेश्वरानें निर्माण केलेली विषम परिस्थिति हीच कारणीभूत झाली आहे, असें त्यांनीं गृहीत धरलें व ते ईश्वरी कृपाप्रसादाची वाट पाहत बसले. यामुळें त्यांचें तत्त्वज्ञान निराशावादी व दुबळें बनलें आहे. परंतु ज्या परिस्थितीखालीं मनुष्यप्राणी चिरडला गेल्यामुळें वाटेल तीं पापें करण्यास उद्युक्त होतो ती परिस्थिति ईश्वर-

निर्मित नसून मनुष्यानेंच निर्माण केली आहे व ती बदलून टाकण्याचें सामर्थ्यहि मनुष्याच्या हातांतच असतें, हें सामाजिक तत्त्व त्यांच्या विचाराच्या कक्षेंत येऊं शकलें नाहीं. यामुळेंच त्यांच्या साऱ्या लिखाणावर निराशेची भेसूर छाया पडलेली दिसून येते.

## गॉर्कीचा बंडखोरपणा

याच्या उलट गॉर्कीच्या वाङ्मयांत जिवंतपणा व बंडखोरपणा हे गुण अगदीं प्रथमपासून आढळून येतात. त्यानें अगदीं सुरुवातीला ज्या गोष्टी लिहिल्या आहेत, त्यांतील व्यक्तींमध्यें दणकटपणा, निर्भय-पणा, परंपरेविषयीं तुच्छता व शिष्टसंमत नीतीच्या कल्पनांबद्दल अनादर हे गुण प्रामुख्यानें प्रतीत होतात. अर्थात्, सुसंस्कृत व नाजुक मनाला गॉर्कीच्या मानसपुत्रांचा आणि कन्यकांचा हा उच्छृंखलपणा मानवण्यासारखा नसल्यामुळें, त्यांनीं गॉर्कीच्या वाङ्मयावर अश्लीलतेचा शिक्का मारणें अगदीं स्वाभाविक होतें.

## गॉर्कीच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या घटना

गॉर्कीचें स्वतःचें आयुष्य सुरुवातीला हालअपेष्टांतच गेल्यामुळें, रशियाच्या खालच्या व मध्यमवर्गाच्या आयुष्याशीं त्याचा उत्तम परिचय झाला होता. तथापि गॉर्की हा कांहीं एकदम मजूरवर्गाचा लेखक बनला नाहीं. वर्गकलहाचें तत्त्वज्ञान त्याला अद्याप कळावयाचें होतें. त्यामुळें त्याच्या सुरुवातीच्या वाङ्मयांत वास्तवतेबरोबरच एक प्रकारच्या कल्पनाजन्य अशा सुखवादाचेंहि मिश्रण झालेलें दिसून येतें. गॉर्कीचे (त्याचें खरें नांव अलेक्सी मॅक्सिमोविच् असें होतें) आईबाप त्याच्या लहानपणींच वारल्यामुळें अगदीं कोवळ्या वयांतच त्याला आपल्या पोटाची खळगी भरण्याकरितां हर एक प्रकारचे धंदे

करावे लागले. छोकऱ्याचें, कपबशा विसळण्याचें, माळ्याचें, तमाशांत लावण्या म्हणण्याचें, सडका दुरुस्त करण्याचें अशीं नाहीं नाहीं तीं कामें करावीं लागल्यामुळें, गॉर्की इतका वैतागून गेला कीं, वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं त्यानें आत्महत्याहि करण्याचा प्रयत्न करून पाहिला पण तो सिद्धीस गेला नाहीं! पोटासाठीं त्याला पायींच पुष्कळ भटकावें लागलें. प्रवासांत नाना प्रकारच्या माणसांशीं त्याचा संबंध आला. आपल्या सुरुवातीच्या लिखाणांतून भटक्या लोकांचींच चित्रें त्यानें रंगविलीं आहेत.

गॉर्कीची वृत्ति अगदीं सुरुवातीपासून बंडखोरपणाची असल्यामुळें, झारशाही उलथून पाडण्याकरितां अस्तित्वांत आलेल्या गुप्त कटवाल्यांशीं गॉर्कीचा लवकरच संबंध जडला व क्रान्तिकारक चळवळींना त्यानें हरतऱ्हेची मदत करण्याचें ठरविलें व त्याचें प्रायश्चित्तहि त्याला लवकरच भोगावें लागलें. क्रान्तिकारक चळवळींशीं संबंध ठेवल्याबद्दल त्याला पहिल्याप्रथम १८९८ सालीं व पुन्हा १९०१ मध्यें पकडण्यांत आलें.

## गॉर्की व लेनिन

याच सुमारास गॉर्कीचा लेनिनशीं परिचय होऊन, मार्क्सप्रणीत वर्गकलहाच्या तत्त्वज्ञानाशीं त्याची तोंडओळख झाली. १९०५ सालीं कामगारलोकांनीं आपलीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगून, त्याबाबत दाद मागण्याकरितां झारच्या राजवाड्याला गराडा घालावयाचें ठरविलें तेव्हां रक्तपात होऊं नये म्हणून, ज्या लोकांनीं प्रधानमंडळाच्या भेटी घेतल्या त्यांत गॉर्की अग्रेसर होता; परंतु त्याच्या मध्यस्थीचा कांहीं एक परिणाम न होतां, दुसऱ्याच दिवशीं

राजवाड्यासमोर गोळा झालेल्या लोकांची कत्तल झाल्यामुळें त्यांच्या रक्ताच्या सड्यानें लालभडक झालेल्या बर्फावरून चालत जाण्याचें त्याच्या नशिबीं आलें. गॉर्कीनें सरकारच्या ह्या पाशवी कृत्यावर जळजळीत शब्दांत उघडपणें टीका केल्यामुळें त्याला तावडतोब पकडण्यांत आलें; परंतु त्याबद्दल युरोपांतील बहुतेक सुशिक्षित राष्ट्रांनीं गवगवा केल्यामुळें गॉर्कीची सुटका झाली. तरी पण आपणाला सोडून देण्यांत आलें असलें तरी, सरकारी रोषाला आपण केव्हां बळी पडूं याची शाश्वति नसल्यामुळें गॉर्कीनें परिस्थिति बदलेपर्यंत देशत्याग करण्याचें ठरविलें. रशियन जनतेसंबंधीं लोकांच्या अंतःकरणांत सहानुभूति उत्पन्न करून, शक्य झाल्यास क्रांतिकारक चळवळीला त्यांचा पाठिंबा मिळावा म्हणून गॉर्कीनें १९०६ सालीं अमेरिकेला भेट दिली; परंतु गॉर्कीनें आपलें लग्न खिस्ती मंदिरांत लावलें नाहीं ह्या सबबी-वर त्याला अमेरिकेंत उतरूं न देण्याचा तेथें प्रयत्न करण्यांत आला. या प्रकाराला अमेरिकन लोकांच्या आचरटपणाइतकेंच झारच्या अमेरिकेंतील कांहीं हस्तकांचेहि परिश्रम कारणीभूत झाले होते ही गोष्ट वेगळी. तथापि, कांहीं उदारमतवादी लोकांच्या मध्यस्थीमुळें गॉर्कीचे पाय अमेरिकेला लावण्याचें भाग्य तद्देशीयांना लाभलें. १९०३ सालीं गॉर्की हा लंडनमध्यें त्या वेळीं स्पेशल डेमॉक्रॅटिक पक्षाची जी कॉंग्रेस भरली होती तिला हजर राहिला. बोल्शेविक व मेन्शेविक यांच्यामध्यें फूट पडण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागतांच, गॉर्कीनें लेनिन-शीं सख्य केलें व तेव्हांपासून त्यांच्या खऱ्या मैत्रीला सुरुवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. इंग्लंडहून गॉर्की इटालींत आला व नेपल्स शहराजवळ काप्री या नांवाचें जें एक इतिहासप्रसिद्ध बेट आहे तेथें वास्तव्य करण्याचें त्यानें ठरविलें. या बेटांत रशियांतून

मुद्दाम आणविलेल्या कामगार लोकांना आपल्या कांहीं मित्रांच्या साहाय्यानें राजकीय शिक्षण द्यावयाचें गॉर्कीनें ठरविलें; परन्तु ज्या भूतदयाप्रेरित विशिष्ट ध्येयवादाचा पुरस्कार करण्याचें गॉर्कीनें ठरविलें होतें त्याला लेनिनचा विरोध असल्यामुळें, या दोघांच्या मैत्रींत बाध येण्याचा संभव उत्पन्न झाला. परंतु लेनिननें गॉर्कीला व बोग्डोनॉव्हप्रभृति व इतर 'देव'वाद्यांना लवकरच ताळ्यावर आणून बोल्शेव्हिक पक्षांतील फूट पाडावयाचा प्रसंग मोठ्या शिताफीनें टाळला. महायुद्ध सुरू होण्याच्या आधीं गॉर्कीला रशियांत परत यावयाची परवानगी मिळाली. महायुद्धांत भांडवलशाहीचा विजय झालेला पाहून गॉर्कीला क्रांतिकारक चळवळीच्या भवितव्याविषयीं निराशा वाटूं लागली व तो मानवी संस्कृतीचें रक्षण करणाऱ्या गोष्टी बोलूं लागला. परंतु दरम्यान रशियांत अनपेक्षित रीतीनें राज्यक्रांति होऊन, झारशाही धुळीला मिळाली व बोल्शेविकांचें वर्चस्व प्रस्थापित झालें. लेनिनच्या कर्तबगारीविषयीं गॉर्कीला खात्री नव्हती व त्यामुळें लेनिननें आपल्या हातांत सत्ता घेण्याचें प्रयत्न सुरू करतांच गॉर्कीला त्यांत देशाच्या अधःपाताखेरीज दुसरें कांहीं दिसेना. परंतु लेनिन विजयी ठरला व लवकरच सर्व रशियाचीं सूत्रें त्याच्या हातीं आलीं. तथापि लोकांच्या राजकीय हक्कांवर व मतस्वातंत्र्यावर लेनिननें वरवंटा फिरवावयाला सुरुवात करतांच गॉर्कीचें पित्त खवळलें व त्यानें संस्कृतिरक्षणार्थ वृत्तपत्रांतून लेनिन व त्याचे साथीदार यांजवर टीका करावयास सुरुवात केली. गॉर्कीच्या ह्या संस्कृतिरक्षणाच्या उपद्व्यापाला आळा घालावयाचा म्हणजे त्याचें वर्तमानपत्रच बंद करून टाकलें पाहिजे असें लेनिननें ठरविलें; परंतु दोघांच्याहि सुदैवामुळें गॉर्कीचें पत्र आपोआपच बंद पडल्यामुळें त्यांचे दुरावलेले संबंध अजीबात तुटले

नाहींत. लेनिनच्या अंतःकरणांत गॉर्कीविषयीं खरेंखुरें प्रेम वाटत होतें व त्याच्या लेखनसामर्थ्याची त्याला चांगलीच जाणीव होती. गॉर्की हा मजुरांचाच खरा कैवारी असल्यामुळें, आज ना उद्यां तो आपल्या पक्षाला आत्मीय भावनेनें निःसंशय येऊन मिळेल असें लेनिननें भाकित केलें होतें; व रशियाच्या सुदैवामुळें तें लवकरच अक्षरशः खरें ठरलें. गॉर्की तेव्हांपासून मजुरांचा खरा पुढारी बनला व यापुढील त्याचें वाङ्मय निर्भेळ मजूरवादी बनलें.

असें जरी होतें तरी गॉर्कीला स्टॅलिनपक्षीय ठोकळेबाज कम्यूनिस्ट कधींच म्हणतां यावयाचें नाहीं. आयुष्याच्या अखेरीस गॉर्कीची स्टॅलिनशीं दोस्ती—कदाचित् जिगरदोस्ती—होती हें खरें; त्यामुळें क्वचित् प्रसंगीं कांहीं अनुचित अशीं कृत्यें त्यानें केलीं हेंहि खोटें नाहीं; परंतु एकंदरीनें गॉर्कीच्या स्टॅलिनवरील वजनाचा हितकारक असाच परिणाम झाला. सर्व बोल्शेविक पुढाऱ्यांत कला आणि वाङ्मय यांविषयीं अधिक मूलगामी व अधिक विचारशील मतप्रतिपादन ट्रॉट्स्कीनें केलें होतें. त्याच्या विचारसरणीचा पगडा रशियन कलावंतांवर बराच होता. ट्रॉट्स्कीला रशियांतून हद्दपार केल्यावर त्याच्या प्रभावी धोरणाचा मोड करण्यासाठीं स्टॅलिननें रॅप ही संस्था अस्तित्वांत आणली. तिच्या अरेरावी कारभारामुळें रशियन कला व रशियन साहित्य यांची स्थिति अनुकंपनीय झाली. या रॅपचा आततायी, बेअकली कारभार संपुष्टांत आणण्यास गॉर्कीचेच परिश्रम मुख्यतः कारण झाले.

पण सोव्हिएट वाङ्मयाची याहून अधिक महत्त्वाची सेवा गॉर्कीनें रशियन लेखकांचें नेतृत्व स्वीकारून व आपल्या प्रभावी उदाहरणानें त्यांच्या वाङ्मयसेवेस स्पृहणीय वळण लावून केली. गॉर्कीपासून

मिळालेल्या स्फूर्तीमुळें व त्याच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनानें रशियांतील शेंकडों लेखक अक्षरशः लिहावयास (म्हणजे कीर्दखतावणीच्या चोपड्या लिखण्यास नव्हे!) शिकविलें असें म्हणणें मुळींच अतिशयोक्तीचें नाहीं. रशियांतील तरुण व होतकरू लेखकांची हस्तलिखितें प्रत्यहीं गॉर्कीच्या घरची वाट चालावयाची व त्या प्रत्येकाला गॉर्कीनें सहानुभूतीनें परामर्श घेऊन व त्यांत आपुलकीनें सुधारणा करून परत पाठवावयाचें— हा क्रम गेलीं कित्येक वर्षें अविरत चालला होता. स्वतः सेवोलॉड आयूव्हॅनॉव्ह (Vsevolod Ivanov) यानें याबद्दलची आपली एक हकीगत सांगितली आहे. त्याचें एक नाटक छापखान्यांतील खिळ्यांनीं जखडलेलें असतांना त्याला त्यावर टीका करणारें गॉर्कीचें पत्र मिळालें. त्या टीकेचा परिणाम इतका प्रभावी ठरला कीं, आयूव्हॅनॉव्हनें छापखान्यांतून हस्तलिखित परत मागविलें व त्यांत किती तरी सुधारणा केल्या. गॉर्कीच्या या समयोचित सूचनांनीं त्या नाटकाला अपयशाच्या पाशांतून सोडविलें असें आयूव्हॅनॉव्हचें मत आहे.

आयव्हॅनॉव्हच्या या हकीकतीकडे आत्मप्रत्ययानें बोट दाखविणारे हजारों रशियन साहित्यिक निघतील. एका वयोवृद्ध कोंबडीसभोंवतीं सान पिलांचा गराडा पडला आहे अशा देखाव्याचें एक व्यंगचित्र रशियांत अतिशय प्रसिद्ध आहे. या पिलांच्या घोळक्यांत ज्यांच्या कृति 'जागतिक' कीर्ति मिळवून राहिल्या आहेत अशा किती तरी साहित्यिकाच्या मूर्ति ओळखूं येतात. या एका व्यंगचित्रांत गॉर्कीच्या आयुष्याचें एक महत्त्वाचें अंग यथार्थत्वानें रंगविलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## गॉर्कीचें शिक्षण

गॉर्कीला लहानपणापासून व्यवस्थित असें शिक्षण कधींच नव्हतें.

जें जें हातीं आलें तें तें त्यानें वाचून काढल्यामुळें त्याच्या ज्ञानांत खडबडीतपणा फार होता. निव्वळ तात्त्विक विचार करीत राहण्याचा त्याला मनस्वी कंटाळा होता व त्यामुळें पंडितांबद्दल त्याच्या मनांत कायमची अढी बसून राहिली होती. त्याच्या कादंबऱ्यांत व गोष्टींत विद्याविभूषित लोकांची वारंवार टर केलेली आढळून येते. जगांत प्रत्यक्ष वावरलेल्या व टक्केटोणपे खाल्लेल्या अशिक्षित पण कार्यतत्पर व कार्यक्षम लोकांबद्दल गॉर्कीला फार आदर वाटत असे व अशा व्यक्तींनाच त्यानें आपल्या कथात्मक वाङ्मयांत प्राधान्य दिलें आहे. त्याच्या जगप्रसिद्ध 'मदर' ह्या कादंबरींत त्यानें आपलीं मुख्य पात्रें याच दृष्टीनें रेखाटलीं आहेत.

## गॉर्की व टॉल्स्टॉय्

गॉर्कीच्या आधीं राजकीयदृष्ट्या महत्त्वाचें असें कोणी वाङ्मय निर्माण केलें असेल तर तें टॉल्स्टॉय् यांनीं होय. पण टॉल्स्टॉय् यांचा जन्म सरदार घराण्यांत झाला असल्यामुळें, गॉर्कीप्रमाणें मजूरवर्गाशीं त्यांना पूर्णपणें समरस होतां येणें शक्य नव्हतें. शिवाय टॉल्स्टॉय यांची अहिंसा वृत्ति व धार्मिक भावना यांचा मेळ क्रांतिकारक तत्त्वज्ञानाशीं पडणें शक्य नसल्यामुळें, बोल्शेविकांच्या अमदानींत त्यांचा वाङ्मयसंसार सुरळीत चालला असता काय, याविषयीं जबरदस्त शंका येते. टॉल्स्टॉय् यांच्या नीतिविषयक कल्पना फार सूक्ष्म असल्यामुळें त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून व्यक्तीच्या मनोभावनांमध्येंच चालत असलेला झगडा चित्रित करण्याकडे अधिक लक्ष पुरविलें आहे. त्यामुळें गॉर्कीप्रमाणें त्यांच्या कादंबऱ्यांत वर्गकलहाचीं चित्रें रेखाटलेलीं आढळून येत नाहींत. टॉल्स्टॉय् यांच्या लिखाणांत कलावंत आणि

उपदेशक यांच्यामध्यें जी ओढाताण सतत प्रत्ययास येते ती गॉर्कीच्या वाङ्मयांत बिलकुल दिसून येत नाहीं. टॉल्स्टॉय्प्रमाणेंच गॉर्की यालाहि कलेकरितां कला हें तत्त्व पसंत नव्हतें. परंतु टॉल्स्टाय् यांच्या कलेला उपदेशकाच्या वृत्तीमुळें जो क्वचित् हिणकसपणा आला आहे, तो गॉर्कीच्या कलेंत आलेला नाहीं, उलट प्रचारकी दृष्टिकोनामुळें त्याच्या कलेला एक प्रकारचें चैतन्ययुक्त सौंदर्य प्राप्त झालेलें आढळून येतें.

## लेखणी आणि तरवार

बर्नार्ड शॉ म्हणतात कीं आपला धंदा लेखकाचा आहे, क्रांतिकारकाचा नाहीं. त्यामुळें युद्ध उपस्थित झाल्यास आपण लेखणीनें लढूं; पण हातांत तरवार घेऊन लढणें हें आपलें ब्रीद नव्हे. गॉर्कीचें तत्त्व याच्या अगदीं विरुद्ध आहे. गॉर्की म्हणतो, मजुरांच्या हितास्तव लढणें हें आपलें ध्येय असून, तें साध्य करण्याला वाङ्मय हें केवळ एक साधन आहे. आणि साधनाला साध्यापेक्षां केव्हांहि अधिक महत्त्व देतां कामा नये. यामुळें लढाईचा प्रसंग येतांच आपण लेखणी टाकून देऊन हातांत तरवार धरूं व मजुरांच्या पलटणींत जाऊन उभे राहूं. गॉर्कीची ही विचारसरणी त्याच्या लढाऊ वृत्तीची उत्तम निदर्शक आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

# सर ऑर्थर कॉनन डॉयल

खून, दरोडे, मारामाऱ्या, गुप्तपोलिसांचें चातुर्य यासारख्या अद्भुत रसानें ओथंबलेल्या नवलकथा वाचण्याची अगर सिनेमांत पाहण्याची ज्यांना आवड आहे त्यांना सर ऑर्थर कॉनन डॉयल हे कोण आहेत हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. १९०२ सालीं कॉनन डॉयल यांना सरकारनें 'सर' हा किताब देऊन त्यांना नामधारी सरदार केलें हें खरें; तथापि कॉनन डॉयल यांच्या अंगामध्यें लढाऊ गुण इतके विपुल आहेत, कीं त्यांचें चीज मृत्यूशीं दोन हात करावयाला सदैव तयार असणाऱ्या 'मध्ययुगां'तील एखाद्या सरदार घराण्यांतच अधिक झालें असतें. कॉनन डॉयल यांच्या ठिकाणीं निसर्गानें साहसादि गुणांचें जन्मतःच बीजारोपण करून त्यांचा विकास होईल अशी उत्तम शरीरप्रकृतीहि त्यांना दिली आहे. त्यांचा उंच बांधा, त्यांची धिप्पाड छाती आणि आधींच बारीक असणाऱ्या डोळ्यांना आणखी बारीक



कॉनन डॉयल

करणारे त्यांचे फुगीर गाल पाहिले म्हणजे हातांत लांबच लांब भाले घेऊन सैरावैरा दौड करीत चालेल्या घोडेस्वारांनीं युरोप खंड ज्या वेळीं गजबजून गेलें होतें त्या वेळीं कॉनन डॉयल यांचा जन्म झाला नाहीं याबद्दल वैषम्य वाटलें नाहीं तरी विधात्याच्या योजनेंतील औचित्यभंगाची जाणीव झाल्याखेरीज राहत नाहीं. तथापि आजच्या सुधारणायुगांत जीं साहसें करणें शक्य आहे तीं सर्व कॉनन डॉयल यांनीं केलीं आहेत. वाङ्मय-क्षेत्रांतील त्यांची कामगिरीदेखील त्यांच्या अनेक साहसांपैकीं एक साहसच असून, इतर गोष्टींप्रमाणें यांतहि त्यांनीं आपलें यश संपादन केलें आहे. असा एकहि खेळ नाहीं कीं, ज्यांत कॉनन डॉयल यांनीं थोडेंबहुत तरी नांव मिळविलेलें नाहीं. घोड्यांच्या आणि मोटारींच्या शर्यतींमध्यें त्यांनीं भाग घेतलेला आहे, हिंवाळ्यामध्यें बर्फाच्या उंच कड्यांवरून ते घसरत खालीं आलेले आहेत, बलूनमध्यें बसून त्यांनीं जिवंतपणींच थोडें-फार स्वर्गारोहणहि केलें आहे. करमणुकीखातर आपल्या मित्रांशीं तरवारीचे हातहि त्यांनीं केलेले आहेत, आणि बॉक्सिंग, गोल्फ, फुटबॉल, क्रिकेट इत्यादि सामान्य खेळांत प्रावीण्य दाखवून त्यांनीं अनेक पदकें मिळविलीं आहेत. एवढेंच नव्हे तर, खेळांत झालेल्या जखमांचीं कायमचीं स्मृति-चिन्हेंहि त्यांनीं शरीरावर धारण केलेलीं आहेत. त्यांचें एक बोट फुटबॉल खेळतांना मोडलें, क्रिकेटमध्यें त्यांचीं दोन बोटें पिंजून शिवाय एका ढोपराची वाटीहि निखळली, घोड्याच्या लाथेनें त्यांचा एक डोळा फुटण्याच्या बेतांत होता आणि एकदां तर वेगानें मोटार हाकीत असतां अपघात होऊन ते स्वतःच मोटारीखालीं सापडले व मंडळी जमा होऊन त्यांच्या पाठीवर आरूढ झालेली त्यांचीच मोटार उचलून एका बाजूस करीपर्यंत, मोटारचें ओझें त्यांना आपल्या पाठीवर

सहन करावें लागलें. अशा रीतीनें दुसऱ्यांच्या प्राणांची पर्वा न बाळगितां मोटार हाकल्यास क्वचित् स्वतःच्याच प्राणावर कसें बेततें याचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव आला! खेळांतल्याप्रमाणें प्रवासांतहि कॉनन डॉयल यांनीं विविध तऱ्हेचे अनुभव घेतले असून, जिवावरच्या कित्येक प्रसंगांतून ते सुरक्षितपणें पार पडले आहेत. यूरोप, आफ्रिका आणि अमेरिका हें त्रिखंड तर त्यांनीं आपल्या तरुणपणींच धुंडाळलें व दहा वर्षांपूर्वीं ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांतूनहि ते फेरफटका करून आले. प्रवासांत त्यांना जे हरतऱ्हेचे अनुभव आले त्यांचा त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांत भरपूर उपयोग केला आहे.

कॉनन डॉयल हे जरी आयरिश कुळांतले आहेत तरी त्यांच्या वडिलांना स्कॉटलंडमध्यें नोकरी असल्यामुळें कॉनन डॉयल यांना आपलें बाळपण त्याच देशामध्यें घालवावें लागलें. ते प्रथमतः ज्या शाळेंत प्रविष्ट झाले तेथील शिस्त फार कडक असून, तेथें विद्यार्थ्यांवर चवदाव्या रत्नाचा प्रयोग वारंवार केला जात असे, आणि त्या वेळीं कॉनन डॉयल यांची गति अभ्यासापेक्षां धिंगामस्ती करण्यांत विशेष असल्यामुळें, त्यांजवर शिक्षकांची शाबासकी घेण्याऐवजीं त्यांच्या छड्या घेण्याचे प्रसंग अधिक आले. त्या शाळेंतील एक शिक्षक मुलांना इतक्या निर्दयपणें मारी कीं, थंडीच्या दिवसांमध्यें विद्यार्थ्यांच्या हाताची सूज चार-चार दिवस काढत नसे. परंतु या शिक्षकालाहि कॉनन डॉयल हार गेले नाहींत!

कॉनन डॉयल यांच्या वडिलांची सांपत्तिक स्थिति समाधानकारक नसल्यामुळें, निव्वळ हौसेखातर विद्यार्जन करणें त्यांना शक्य नव्हतें. कॉनन डॉयल यांनीं डॉक्टर होण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें ते एम्. डी. होऊन प्रॅक्टिसहि करूं लागले व त्याकरितां त्यांनीं बरीच स्थलांतरेंहि

केलीं. मेडिकल कॉलेजमध्यें शिकत असतां कॉनन डॉयल यांना वैद्यकी-संबंधीं काय ज्ञान मिळालें असेल तें असो, परंतु डॉ. बेल या नांवाच्या तेथील एका सर्जनपासून मात्र त्यांनीं एक निराळीच विद्या संपादन केली आणि त्याचेंच दृश्यफल म्हणजे कॉनन डॉयल यांच्या गोष्टींतील हिकमतवान् गुप्तपोलीस 'शेरलॉक होम्स' हा होय. गुप्तपोलिसांच्या चातुर्याच्या आणि धाडसांच्या अनेक गोष्टी आणि कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत; परंतु कॉनन डॉयल यांच्या शेरलॉक होम्सचा विशेष हा, कीं गुन्हेगाराच्या हलगर्जीपणाचा किंवा चुकांचा कांहीं एक फायदा न घेतां आपला सर्व व्यूह निव्वळ पायाशुद्ध तर्कपद्धतीवर रचून कोणत्याहि गुन्ह्याच्या छडा तो केवळ आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर लावतो. उपरिनिर्दिष्ट डॉ. बेल यांची तर्कपद्धति अशाच प्रकारची होती. एकदां ते लेक्चर देत असतां वर्गांतील मागच्या रांगेंतून एक चेंडू जमिनीवर उड्या मारीत प्रोफेसरसाहेबांच्या जवळ आला. प्रोफेसरमजकुरांनीं तिकडे कांहीं एक लक्ष न देतां, जणूं कांहींच घडलें नाहीं असें दाखवून आपलें भाषण चालूं ठेवलें. परंतु थोड्याच अवधींत त्यांनीं दहाव्या बाकावर बसलेल्या एका विद्यार्थ्याला उभें राहावयास सांगून, त्याला आपला गुन्हा कबूल करावयास लाविलें. चेंडू त्यांजकडे उड्या मारीत येत असतां त्याची गति आणि जमिनीवर झालेले त्याचे आघात यावरून त्यांनीं अंतर मोजून गुन्हेगाराला अचूक पकडलें. डॉ. बेल यांच्या हाताखालीं काम करीत असतां त्यांच्या चातुर्याचे अनेक मासले कॉनन डॉयल यांस पाहावयास मिळाले. एकदां त्यांजकडे आलेल्या एका रोग्याला डॉ. बेल यांनीं पुढील प्रश्न विचारले. " का हो ! तुम्हांला सैन्यामध्यें कधीं नोकरी होती काय ?" " होय." " ही नोकरी सुटल्याला फार दिवस झाले नसतील ?" " नाहींत." तुम्ही हायलंड तुकडीमध्यें

होता, नाहीं?" "होय." "बरें, तुमचा कधीं बॅरबॅडॉस बेटामध्यें मुक्काम होता का?" "होय." डॉ. बेल यांनीं एकामागून एक असे प्रश्न विचारतांच त्यांजकडे आलेला रोगी तर निव्वळ आश्चर्यानें थक्क होऊन गेला. त्यांच्या हाताखालच्या मंडळींनाहि हें काय गौडबंगाल आहे हें कळेना. डॉ. बेल यांनीं मागाहून त्याचा खुलासा केला. ते म्हणाले, "भेटावयाला आलेला गृहस्थ दिसण्यांत तर सभ्य दिसत होता, परंतु मला भेटतांच त्यानें आपली टोपी हातांत काढून घेतली नाहीं. त्यावरून तो सैन्यांत असावा असा मीं तर्क केला. बरें सैन्यांतून त्याची नोकरी सुटल्यास जर बरेच दिवस झाले असते, तर टोपी काढण्याचा शिष्टाचार त्याला एव्हांशा माहीत झाला असतां आणि बॅरबॅडॉस बेटाविषयीं म्हणाल तर, त्याला जो रोग झाला तो त्या प्रांतांतच विशेषेंकरून उद्भवतो." डॉ. बेल यांच्या वरील तर्कपद्धतीवरून कॉनन डॉयल यांचा शेरलॉक होम्स हा कोणत्या प्रकारचा गुप्त पोलीस आहे याची कल्पना येईल. कॉनन डॉयल यांनीं 'शेरलॉक होम्स' लिहितांच लगेच त्याचा सिनेमांत चित्रपट घेण्यांत आला. या एका गोष्टीवरूनच त्याच्या प्रसिद्धीचें अनुमान काढतां येतें.

कॉनन डॉयल यांनीं शेंकडों गोष्टी व कित्येक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. या सर्वांना ढोबळपणें ऐतिहासिक नवलकथा या सदराखालीं घालतां येईल. त्यांच्या कादंबऱ्यांमध्यें यांनीं अगदीं प्राचीन काळापासून तों थेट आधुनिक काळापर्यंत कोणत्या ना कोणत्या तरी काळाचें यथार्थ चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे. सामाजिक अगर इतर कादंबऱ्यांशीं तुलना करतांना ऐतिहासिक कादंबऱ्यांचा दर्जा कोणताहि असो, पण एवढें मात्र खास कीं, कथानकाची उभारणी एकदां ऐतिहासिक कालावर केली, कीं त्या काळचें हुबेहुब चित्र

डोळ्यांपुढें उभें करणें हें काम अत्यंत बिकट आहे. सामाजिक कादंबऱ्यांपेक्षां उत्तम ऐतिहासिक कादंबऱ्यांची पैदास एवढी कमी कां होते हें यावरून कळून येईल. कॉनन डॉयल हे कोणत्याहि काळाचें चित्र रंगविण्यापूर्वी फारच परिश्रम घेत असत. त्या काळांतील चाली-रीतीचा व भाषापद्धतीचा चांगला अभ्यास करून याचीं तें टिपणें करीत व मग कादंबरी लिहावयाला हातीं घेत. त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांमध्यें बॉक्सिंग आणि द्वंद्वयुद्धें या प्रकारांचीं इतकी हुबेहुब वर्णनें केलीं आहेत कीं, त्यांची माहिती असलेला वाचक आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन जातो.

गेल्या महायुद्धांत कॉनन डॉयल यांनीं आपल्या देशाकरितां हरएक प्रकारची कामगिरी केली होती एवढेंच नव्हे, तर त्यांनीं सैन्यामध्येंहि आपलें नांव दाखल केलें होतें. प्रत्यक्ष लढण्याचा प्रसंग त्यांजवर आला नाहीं व त्याबद्दल त्यांना फार हळहळ वाटली. लढायांसंबंधीं त्यांनीं अनेक लेख लिहिले असून कांहीं युद्धांचा इतिहासहि त्यांनीं लिहिला आहे. इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या देशांतील बहुतेक प्रसिद्ध पुरुषांशीं कॉनन डॉयल यांचा उत्तम परिचय आहे. लॉइड् जॉर्ज यांजबरोबर एकान्तांत त्यांनीं चहापान केलें आहे. प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या खांद्यावर हात ठेवून ते फिरावयाला गेलेले आहेत, नोबेल प्राइझ मिळविणारे रुड्यार्ड किप्लिंग यांना गोल्फ खेळावयाला त्यांनींच शिकविलें. मेरिडिथ, बर्नार्ड शॉ, एच्. जी. वेल्स इत्यादि प्रसिद्ध लेखकांशींहि त्यांचा दाट परिचय आहे.

कॉनन डॉयल यांच्या चरित्रामध्यें आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे आणि ती म्हणजे त्यांचा परलोकविद्येसंबंधाचा व्यासंग

ही होय. कॉनन डॉयल यांचा या आधुनिक शास्त्रावर सर्वथैव विश्वास आहे. एवढेंच नव्हे तर त्यांनीं या विषयावर चिकित्सापूर्वक अनेक लेख व पुस्तकेंहि लिहिलीं आहेत. या पुस्तकांतून त्यांनीं आपले स्वतःचे अनुभव दिले असल्यामुळें तर, त्यांचें फार महत्त्व आहे. आपल्या एका लेखांत आपली आई, पुतण्या व लढाईत मारला गेलेला आपला मुलगा या सर्वांचें आपणाला त्यांच्या मरणोत्तर प्रत्यक्ष दर्शन झालें आहे असा त्यांनीं आपला अनुभव सांगितला आहे. सारांश, खेळाडू, प्रवासी, लेखक व शास्त्रज्ञ इत्यादि विविध अंगांनीं युक्त असें कॉनन डॉयल यांचें जीवनचरित्र त्यांनीं लिहिलेल्या एखाद्या कादंबरीइतकेंच मनोवेधक आणि चटकदार आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

---



ग्रीटा गार्बो

# ग्रीटा गार्बो

ग्रीटा गार्बो! स्त्री-सौंदर्याची धवलचंद्रिका, स्वीडनची अनाभिषिक्त राणी! हॉलिवुडची वनदेवता! चित्रपट-सृष्टींतील अभिनय-सम्राज्ञी! कवि-कल्पना-सृष्टींतील उर्वशी! उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत उदय पावलेली तारका! स्त्रीस्वभावाच्या गूढत्वाचें प्रतीक! अज्ञेयत्वाची मानवी भूमिका! विधात्यानें मानवजातीला घातलेलें चालतें-बोलतें कोडें! तुझें यथार्थानें वर्णन करण्याला कोण समर्थ आहे? चित्रपटसृष्टींतील नटींची तूं आदर्श-देवता आहेस. अनेक पुरुषांचीं अंतःकरणें तूं आपल्याकडे ओढून घेतलीं आहेस. कित्येकांना तूं झुरणीला लावलें आहेस. तुझ्या एका बालपणाच्या सहचरानें तर, तूं प्राप्त होत नाहींस म्हणून मृत्यूला कवटाळलें. जगांतील इतर देशांची तर गोष्टच बोलावयास नको; परंतु खुद्द अमेरिकेमध्यें, फार कशाला खुद्द तूं ज्या ठिकाणीं राहत आहेस त्याच प्रान्तांतील किती लोकांचे डोळे

तुझें प्रत्यक्ष दर्शन घेण्याकरितां आतुर झालेले आहेत हें तुला माहीत आहे? तुझ्या प्रतिमांनीं जगांतील किती दिवाणखाने सुशोभित केले आहेत याची तुला कल्पना आहे का? तुझा लाभ तर दूरच, पण तुझ्या अधरोष्ठाचें अमृतहि स्वर्लोकांतील अमृताइतकेंच दुष्प्राप्य, पण चंद्रकिरणांप्रमाणें मृदु व शीतल अशा हातांचें नुसतें एकवार चुंबन घ्यावयास मिळालें तरी, स्वतःला धन्य समजणारे व आपलें जीवित-कार्य सफल झालें असें समजणारे सौंदर्यपिपासु लोक या जगांत किती आहेत, याचें तूं कधीं गणित केलें आहेस काय? ज्यांच्याशीं तुझा परिचय आहे, ज्यांना तुझें मृदु भाषण प्रत्यहीं ऐकावयाला मिळतें, ज्यांच्या संगतींत तुला दिवसाचे कित्येक तास घालवावे लागतात आणि ज्या कलावन्तांच्या सान्निध्यांत तुला आपल्या कलेचा विलास आणि विकास करावयाचा असतो, त्या अभिनयसम्राटांनाहि तुझें खरें स्वरूप अद्याप पूर्णपणें कळलेलें नाहीं, मग इतरेजनांचा काय पाड! तुझ्या स्वभावाची तुला स्वतःला तरी ओळख झाली आहे काय? तूं अतिमानुष आहेस कीं अमानुष आहेस? कीं सर्वसाधारण मनुष्याप्रमाणेंच तुझा स्वभाव असून सोईखातर चेहऱ्यावर गूढत्वाचें आवरण घेतलें आहेस? कीं मनुष्यस्वभावाची वाईट बाजू तेवढी तुझ्या नजरेस पडल्यामुळें, तूं हें मौनव्रत पत्करलें आहेस? होय! जगाचा वाईट अनुभव आल्यामुळेंच तूं बहुधा हें व्रत घेतलें असावेंस. तुझी मुद्रा तेंच सांगते. समुद्राचा नीलिमा व आकाशाची अथांगता तुझ्या डोळ्यांत भरलेली असूनहि त्यांत खोलच खोल दडलेली विषण्णतेची छटा दृष्टिगोचर झाल्याशिवाय राहत नाहीं. तुझ्या डोळ्यांतील गूढ भावना कोणालाहि सहजासहजीं दिसूं नयेत म्हणून तर परमेश्वरानें तुझ्या पापणीचे केस इतके लांबच लांब निर्माण केले

नसतील ना? रेशमाप्रमाणें लाल व मृदु अशा तुझ्या अधरोष्ठावर विषण्णतेची दीर्घ रेषाच काढलेली दिसते. तुझें हास्य देखील ढगा-आड लपलेल्या चंद्राप्रमाणें संदिग्ध आणि उदास वाटत नाहीं का? तूं जर खरोखरच दुःखी नसशील तर तुला करुणरसानें ओथंबलेल्या तेवढ्याच भूमिका घेणें कां आवडतें? प्रेमाखातर राज्ञीपदाचा व माय-भूमीचा त्याग करूनसुद्धां खडतर दैवानें जिला सुख लाभूं दिलें नाहीं, त्या स्वीडनच्या राणीची--'क्वीन क्रिश्चिना' हिची भूमिका तूं आपण होऊनच निवडली नाहींस का? टॉलस्टॉयच्या ॲना कॅरेनिनाची भूमिका तूं इतकी उत्कृष्ट करतेस याचें खरें कारण तिच्या अंतःकरणांतील उठलेल्या भावनांच्या कल्लोळांचे प्रतिध्वनि तुझ्या अंतःकरणांत उठून तुला जणूं साक्षात्कार झाल्याचा भास झाला हेंच कीं नाहीं? तूं जर खरोखर दुःखी नसशील, तर एकान्तवास तुला इतका प्रिय कां? कितीहि बडा मनुष्य असो, त्याची भेट घेण्याचें तूं कां नाकारतेस? चित्रपटसृष्टींतील सर्व प्रसिद्ध नटी मुलाखती देतात, मग तुलाच मुलाखतींचा एवढा तिटकारा कां? नटीचा पेशा पत्करूनहि गिरि-कंदरांत वास करणाऱ्या एखाद्या योगिनीप्रमाणें तूं आपली काल-क्रमणा करतेस याचें कारण काय? चित्रपटसृष्टीचा आपणाला अगदीं कंटाळा आला असून, आपण लवकरच अमेरिका सोडून आपल्या मायभूमीस परत जाणार व तेथेंच निसर्गसौंदर्यानें नटलेल्या एखाद्या निर्मानुष अशा स्थलीं आयुष्याचे उरलेले दिवस व्यतीत करणार, असे उद्गार तूं सतत कां काढीत असतेस?

ग्रीटा गार्बोला उद्देशून केलेलें वरील भाषण कित्येकांना निव्वळ काव्यमय वाटेल; पण खरोखर तें वस्तुस्थितिनिदर्शक आहे, त्यांत अति-शयोक्ति बिलकुल नाहीं. ज्यांना ग्रीटा गार्बोच्या रहस्यमय आयुष्याची

थोडीबहुत माहिती आहे, अशा लोकांना वरील वर्णन वाचून बिलकुल आश्चर्य वाटणार नाहीं. स्वीडनमधील अत्यंत गरीब व अज्ञात अशा कुळामध्यें जन्म पावलेली ग्रीटा आज त्या देशाची खरोखरच अनभिषिक्त राणी होऊन बसली आहे, ही गोष्ट रोमांचकारी नाहीं असें कोण म्हणेल? स्वीडन देशाच्या तिकिटांवर ग्रीटा गार्बोचें छायाचित्र घालण्यापर्यंत जेथें मजल गेली व ज्या देशाचा प्रत्यक्ष राजपुत्र तिच्यावर अनुरक्त होऊन तिच्याशीं विवाहबद्ध होण्याच्या विचारांत होता, त्या देशाची ग्रीटा गार्बो ही अनभिषिक्त राणी म्हणणें ह्यांत अतिशयोक्ति कोठें आहे? जी लहानपणीं अन्नाला मोताद होती तिचें वार्षिक उत्पन्न आज लक्षावधि डॉलर्स आहे, ही विधिघटना आश्चर्यकारक नाहीं का? रस्त्यावर टाकलेलें पोर पुढें नूरजहान म्हणून दिल्लीच्या बादशहाची पट्टराणी झालें ही घटना जितकी नवलपूर्ण, तितकीच ग्रीटा गार्बोच्या आयुष्याची हकीकत कुतूहलजनक आहे.

ग्रीटा गार्बोचा जन्म स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथें १७ सप्टेंबर १९०५ रोजीं झाला. म्हणजे आज कीर्तिशिखराच्या कळसाला पोंहोचलेल्या ग्रीटाचें वय अवघें ३१ वर्षांचें आहे. ग्रीटा ही तिच्या मातापितरांची तिसरी मुलगी. ग्रीटाचें मूळचें आडनांव गस्टॅस्फन असें होतें; परंतु मुख्य नायिकेचें काम करणाऱ्या नटीचें नांव इतकें लांब, खडबडीत व उच्चारसौकर्याला विघातक असणें इष्ट नाहीं म्हणून तें पुढें गार्बो असें बदलण्यांत आलें. पुढें नांव कमावण्याकरितां प्रथम मूळचें नांव गमवावें लागणें, ही इष्टापत्तिच समजावयाची कीं काय? ग्रीटाच्या प्रौढपणीच्या एकलकोंडेपणाला परिस्थितीमुळें अधिक कडवेपणा आला असला, तरी तो तिच्यांत बीजरूपानें बालपणापासून वसत असावा असें म्हणावें लागतें. कारण अगदीं बालवयांतसुद्धां ग्रीटा

ही एकान्तवासप्रिय होती. आधींच उत्तरेकडील थंड प्रदेशांतील माणसांची उंची जास्त; त्यांत ग्रीटा गार्बोची उंची तर विशेषच होती. वयाच्या आठव्या वर्षीं ती आपल्या वडील भावंडांपेक्षांहि उंच दिसूं लागली ! शेजारी-पाजारी म्हणूं लागले, 'पोर आणखीं उंच वाढली तर बेढब दिसूं लागेल.' पण सुदैवानें त्यानंतर ग्रीटा फारशी वाढली नाहीं. तरी आजची तिची उंची पांच फूट सहा इंच इतकी आहे. सबंध हॉलीवुडमध्यें लिलिअन टॅश्मन या नटीखेरीज ग्रीटा गार्बोइतकी उंच दुसरी नटी नाहीं ! त्यामुळें ग्रीटा गार्बोला शोभून दिसेल असा नायक शोधून काढण्याला मॅट्रो गोल्डविनच्या चालकांना फारच दक्षता बाळगावी लागते. एकदां तर ग्रीटाला उचलून नेतांना एक नट घामाघूम झाल्यामुळें, डायरेक्टरला त्या नटाची उचलबांगडी करावी लागली. ग्रीटाला आईपेक्षां आपल्या वडिलांचाच अधिक ळळा होता. तिनें आपल्या वडिलांच्या तोंडवळणाबरोबर त्यांचें प्रेमहि ओढून घेतलें होतें. परन्तु दुर्दैवानें ग्रीटाला पितृसुख फार दिवस लाभलें नाहीं. कारण वयाच्या चवदाव्या वर्षींच ती पितृसुखाला आंचवली. पित्याच्या आकस्मिक निधनामुळें बिचारीं मुलें अगदींच उघडीं पडलीं. घरांतील दारिद्र्यामुळें मुलांना कोवळ्या वयांतच पोटाकरितां उद्योगधंदा करावा लागला. ग्रीटानें आपला शाळेचा वेळ संभाळून एका न्हाव्याच्या दुकानांत काम पत्करलें. या ठिकाणीं तिला साबणाचा फेस तयार करून केव्हां केव्हां गिऱ्हाइकांच्या दाढीलाहि लावावा लागत असे. त्यांना ग्रीटाच्या कोमल हातांनीं आपल्या गालांवर तिच्या हाताइतकाच मऊ असा फेस लावून घेण्याचें भाग्य लाभलें त्यांना आज काय वाटत असेल बरें ? जिनें त्या वेळीं एका सैरंध्रीचें काम केलें ती आज एखाद्या राणीच्या रुबाबांत राहत आहे, या विचारांनींच त्यांचें

शरीर पुलकित होत असेल! परन्तु आतां साबण लावून घेणें तर दूरच– पण तिजकडून नुसती चापट मारून घेण्याचेंहि भाग्य त्यांच्या गालांना आतां उरलेलें नाहीं! ग्रीटाकडे साबण लावण्याखेरीज वस्तरे पुसून कोरडे स्वच्छ करण्याचेंहि काम असे.

एकदां ग्रीटा शहरांतील नाटकगृहाच्या दरवाजासमोर रस्त्यांत उभी राहून तेथील शोभा पाहत होती. नाटकगृहाच्या मागच्या दरवाजानें मोठ्या डौलांत व तोऱ्यांत प्रवेश करणाऱ्या नटींकडे पाहून ग्रीटाला त्यांच्या ऐश्वर्याचा हेवा वाटला व आपणालाहि हें भाग्य कधीं लाभेल काय, असाहि विचार क्षत्रमात्र तिच्या डोक्यांत येऊन गेला. पण परिस्थितीमुळें ह्या आशेला फळ तर दूरच पण मोहोरसुद्धां येण्याचा संभव नाहीं असें तिला त्या वेळीं वाटलें. विषण्ण अंतःकरणानें ती घरीं गेली. दारिद्र्यामुळें ग्रीटाला शाळेंतील शिक्षण घेणेंहि कठीण झालें. तिनें शाळा सोडली व एका तयार कपड्यांच्या दुकानांत नोकरी धरली. तिजकडे बायकांच्या टोप्या नीट वर्गवारीनें लावून ठेवण्याचें काम होतें. योगायोग असा कीं, ह्या कामांतूनच तिचें भाग्य उदयास आलें. टोप्यांची जाहिरात देण्याकरितां ग्रीटाचे निरनिराळ्या तऱ्हेच्या टोप्यांसह फोटो काढण्यांत आले व त्यांत असें आढळून आलें कीं, ग्रीटाच्या डोक्याचीच नव्हे, तर चेहऱ्याची ठेवणहि फोटोला फार अनुकूल अशी आहे. पुढें एका फिल्म-डायरेक्टरच्या डोक्यांत असें आलें कीं, आपल्या पिक्चरमध्यें हास्यरस उत्पन्न करण्याकरितां गबाळ्या पोषाकांतील एखाद्या स्त्रीचे दोनतीन शॉट्स घ्यावे. या विडंबनात्मक भूमिकेकरितां ग्रीटाचीच निवड करण्यांत आली. ग्रीटाच्या उंच व सडपातळ शरीरयष्टीमुळें तिची भूमिका इतकी खुलून दिसली कीं, तिला पुढील पिक्चरमध्येंहि काम देण्याचें वचन देण्यांत आलें!

किती विचित्र घटना ही ! जिनें पुढें करुणरसाच्या भूमिका घेऊन प्रेक्षकांच्या डोळ्यांतून आंसवें काढलीं, तिच्या नशिबीं प्रथम प्रेक्षकांना हसविण्याकरितां थिल्लरपणाचें काम करण्याचें यावें ना ? पुढें १९२२ सालीं म्हणजे ग्रीटाच्या सतराव्या वर्षी एका पिक्चरमध्यें तिला साधारण बरी अशी एक भूमिका देण्यांत आली व ती करण्याकरितां ग्रीटानें त्या स्टोअरशीं असलेला आपला संबंध सोडून दिला. याच काळांत ग्रीटानें स्टॉकहोम येथील एका प्रसिद्ध संस्थेंत अभिनयकलेचें तीन-चार वर्षें शिक्षण घेतलें व आपला भावी व्यवसाय निश्चित केला. तिचा विचार प्रथम रंगभूमीवर येण्याचा होता, परंतु एकंदर घटना तिला चित्रपटसृष्टीकडे खेचून नेत होत्या. लवकरच ग्रीटाचा भाग्य-काळ आला. तिला एका मोठ्या पिक्चरमध्यें मुख्य नायिकेचें काम देण्यांत आलें व याच चित्रपटामध्यें तिचें मूळचें आडनांव बदलून तिला गार्बो हें नवीन अनुप्रासात्मक व सुटसुटीत नांव देण्यांत आलें. ह्या चित्रपटांतील गार्बोचें काम इतकें चांगलें वठलें कीं, जर्मनींतहि या चित्रपटाची सर्वत्र वाहवा झाली. गार्बोला जर्मनींत नेण्यांत आलें. पुढील चित्रपटाकरितां एका मुसलमानी कथानकाची निवड करण्यांत आल्यामुळें, गार्बोला खुद्द कॉन्स्टँटिनोपल या शहरीं नेण्यांत आलें. परंतु कांहीं अडचणीमुळें हा चित्रपट मध्येंच सोडून द्यावा लागला, व गार्बो पुन्हा जर्मनींत आली. या ठिकाणीं गार्बोनें जर्मन व इंग्रजी भाषांशीं परिचय करून घेतला. हा काळ अर्थात् मूकचित्रपटांचा होता व ह्या धंद्यांत पडलेल्या लोकांना रंगभूमीशीं टक्कर द्यावी लागत असल्यामुळें, पात्रांची निवड मोठ्या कसोशीनें करावी लागत असे. बोलपट सुरू व्हावयाला अद्याप बराच अवकाश होता.

याच सुमारास गार्बोच्या आयुष्यांत एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट

घडून आली; व ती म्हणजे मॉरिस स्टिलर ह्या व्यक्तीशीं गार्बोचा झालेला परिचय हा होय. गार्बोला चित्रपटसृष्टींत आज जें एवढें उच्च स्थान प्राप्त झालें आहे त्याचें सर्व श्रेय ह्या व्यक्तीला आहे. मॉरिस स्टिलर हा युरोपांतील एक अत्यंत नाणावलेला दिग्दर्शक होता. हा दिसायला जरी अगदीं कुरूप व बोजड होता तरी त्याची सौंदर्यदृष्टि अचूक आणि चोखंदळ होती. त्यानें ग्रीटा गार्बोला हेरून आपल्या हाताशीं धरलें, व तिला उत्कृष्ट नटी म्हणून जगापुढें आणण्याचा त्यानें निश्चय केला. स्टिलरबरोबर गार्बो जर्मनींत गेली व तेथें तिनें त्याच्या देखरेखीखालीं चित्रपटांत काम केलें. याच वेळीं हॉलीवुडमधील मेट्रो गोल्डविन स्टूडियोचा एक प्रमुख इसम जर्मनी-मध्यें धंद्यानिमित्त आला असतां त्यानें हा स्टिलरचा चित्रपट पाहिला व स्टिलरला अमेरिकेंत बोलावलें. गार्बोशिवाय स्टिलर अमेरिकेंत जावयास तयार होईना म्हणून तिलाहि काम देण्याचें कबूल करण्यांत आलें व अशा रीतीनें ग्रीटा गार्बोचा हॉलीवुडमध्यें प्रवेश झाला. ग्रीटाचा जन्म हलक्या कुळांत झाला असून, तिचें लहानपणचें शिक्षणहि यथातथाच असल्यामुळें, ग्रीटाच्या मनावरील बालपणचे संस्कार अजून नाहींसे झालें नव्हते. त्यामुळें अमेरिकेंत जातांच तेथील लोकांच्या चालीरीति पाहून या वनहरिणीला फारच गोंधळल्यासारखें झालें. जुन्यापुराण्या वातावरणांत वाढलेल्या ग्रीटाला अमेरिकन लोकांच्या नीतिविषयक पुढारलेल्या कल्पना पाहून इतका धक्का बसला कीं, आधींच मुग्ध असलेला तिचा स्वभाव अधिकच अंतर्मुख बनला. त्यांतूनहि युरोपांतून एक नवीन आलेलें पात्र या दृष्टीनें हॉलीवुड-मधील निढावलेले कलावंत तिजकडे जरा भेदक नजरेनें पाहूं लागले व कांहीं व्यक्तींनीं मत्सरयुक्त भावनेनें गार्बोची उंची, तिचे

भले मोठाले पाय, तिचे रुंद खांदे, तिची लांब जिवणी, तिचें मोठें कपाळ व तिचा गबाळा पोषाक इत्यादि गोष्टी पाहून तिची टर केली. गार्बोला या एकंदर प्रकाराचा इतका संताप आला कीं, आल्यापायीं परत मायभूमीला जावें असें वाटूं लागलें. परंतु स्टिलरच्या आश्वासनामुळें व उत्तेजनामुळें हॉलीवुडमध्यें राहावयाचें तिनें कबूल केलें. 'टॉरेंट' ऊर्फ 'पाणलोट' ह्या चित्रपटामध्यें तिला मुख्य नायिकेची भूमिका देण्यांत आली, पण त्याच्या दिग्दर्शित्वाचें काम स्टिलरकडे न देतां दुसऱ्या एकाकडे देण्यांत आलें. ह्या दिग्दर्शकानें गार्बोला फार त्रास दिला. तरी देखील हा चित्रपट न्यूयॉर्कसारख्या ठिकाणीं यशस्वी ठरल्यामुळें, गार्बोच्या नांवाचा बोलबाला होऊं लागला व वर्तमानपत्रांतून तिची मुक्तकंठानें स्तुति करण्यांत आली. झालें. लगेच निरनिराळ्या वर्तमानपत्रांच्या बातमीदारांनीं हॉलीवुडकडे धाव घेतली व ते सर्व गार्बोच्या मुलाखती घेण्याकरितां तेथें तळ देऊन बसले. आधींच अमेरिकन लोकांसंबंधीं गार्बोच्या मनांत जबरदस्त अढी बसून राहिली होती; त्यांत आणखी एक मुलाखतीचा नवीन प्रकार सुरू झालेला पाहतांच मुखदुर्बळ व लाजाळू गार्बोनें आपल्या तोंडाला कायमचें कुलूप घालण्याचें ठरविलें. त्याबरोबर बातमीदार चिडले व त्यांनीं खोट्यानाट्या बातम्या द्यावयास सुरवात केली. एकानें असें प्रसिद्ध केलें कीं, गार्बो ही वस्तुतः इंग्रज स्त्री असून आपण स्वीडनमधील असल्याचा ती उगाच बहाणा करीत आहे. दुसरा त्याच्याहि पुढें गेला; त्यानें असें प्रसिद्ध केलें कीं, गार्बो ही अमेरिकनच आहे; पण एक 'स्टंट' म्हणून मुद्दाम तिला परदेशी बनविण्यांत आलें आहे!

गार्बोचा हॉलीवुडमधील दुसरा चित्रपट म्हणजे 'टेम्प्ट्रेस' किंवा 'मायाविनी' हा होय. ह्या चित्रपटाच्या दिग्दर्शकत्वाचें काम स्टिलर

यांस देण्यांत आलें नाहीं तर त्यांत आपण काम करणार नाहीं, असें गार्बो हिनें निक्षून सांगितल्यामुळें स्टिलरची दिग्दर्शक म्हणून नेमणूक करण्यांत आली; परंतु इतर मत्सरी दिग्दर्शकांच्या विरोधामुळें व कारवाईमुळें स्टिलर इतका वैतागून गेला कीं, त्यानें आपलें काम मध्येंच सोडून दिलें. तरी देखील हा चित्रपट यशस्वी ठरून गार्बोच्या यशांत अधिकच भर पडली व हॉलीवुडमधील तिचें स्थान चांगलेंच स्थिर झालें.

यानंतर गार्बोच्या आयुष्यांत एक क्रान्ति घडून आली. अजून-पर्यंत स्टिलर हाच गार्बोचा एकमेव आधारस्तंभ होता. स्टिलरच्या गार्बोवरील प्रेमांत सहचराच्या सौहार्दाबरोबरच पित्याचें वात्सल्यहि होतें. त्याच्या एकनिष्ठ प्रेमाचा गार्बोला अनुभव आला असल्यामुळें अमेरिकेसारख्या परक्या देशांत ती सर्वस्वीं स्टिलरवरच विसंबून होती. परन्तु यानंतर जॅक गिल्बर्ट ह्या तरुण नटाचा गार्बोशीं संबंध आल्यामुळें, स्टिलर गार्बोला दुरावल्यासारखा झाला. गिल्बर्ट हा मोठा देखणा व उमदा पुरुष असून बायकांचीं मनें आपल्याकडे ओढून घेण्यांत मोठा तरबेज होता. 'दि फ्लेश अँड दि डेव्हिल' म्हणजे 'काम आणि सैतान' या चित्रपटांत गार्बोबरोबर काम करण्या-करितां त्याचीच निवड करण्यांत आली होती. गिल्बर्टची छाप गार्बोवर इतकी पडली कीं, त्याचें आतां उभयतांच्या लग्नांतच पर्यव-सान होणार असेंच बहुतेकांना वाटलें. दोघेंहि एकत्र बसूं फिरूं लागलीं. गार्बो एवढी एकान्तप्रिय ना, पण ती गिल्बर्टबरोबर समा-रंभांत भाग घेऊं लागली. लग्नाशिवाय त्यांचे बहुतेक सोहाळे झाले असेंच सर्वांना वाटूं लागलें. वर्तमानपत्रांनीं तर त्यांचा लग्नसमारंभहि उरकून टाकला! बिचारा स्टिलर एकान्तवासांत कोठें तरी काळ कंठूं

लागला. गार्बोची गिल्बर्टशीं होत असलेली सलगी स्टिलरच्या अंतःकरणांत इतकी सलूं लागली कीं, अमेरिकेंतील आपलें चंबूगबाळें उचलून त्यानें मायभूमीस प्रयाण केलें. स्टिलरचें अमेरिकेंतील वास्तव्य एकंदरींत त्याला सुखदायक न होतां शोकदायकच ठरलें. त्याच्या कलेचें चीज अमेरिकेंत झालें नाहीं; किंबहुना त्याच्या हितशत्रूंनीं होऊं दिलें नाहीं; परन्तु गार्बोला पुढें आणण्याचा मान त्यानें मिळविला. स्टिलर अमेरिकेंतून निघून गेल्यानंतर गार्बोनें 'स्वर्गीय देवता', 'अगम्य सुंदरी', 'खटलेबाज स्त्री' इत्यादि चित्रपटांत कामें केलीं; तथापि गार्बो स्टिलरला विसरून जाण्याइतकी कृतघ्न नव्हती. गिल्बर्टशीं ती अद्याप विवाहबद्ध झाली नव्हती. स्टिलर आजारी पडल्याची बातमी तिला कळतांच तिनें स्वीडनला जाण्याचें ठरविलें; परंतु ती तेथें जाण्यापूर्वींच स्टिलर मरण पावला ( १९२८ ). गार्बो मायभूमीला परत गेल्यावर प्रथम तिनें स्टिलरच्या थडग्याचें दर्शन घेतलें व तें आपल्या कृतज्ञतेच्या अश्रूंनीं अक्षरशः भिजविलें. "मला जगांत जर आज कांहीं किंमत असेल, तर त्याचें सारें श्रेय स्टिलरला आहे" असे उद्‌गार गार्बो नेहमीं काढते.

गार्बो हॉलीवुडला परत आली तेव्हां बोलपट सुरू झाले. गार्बोचा आवाज बोलपटाला योग्य ठरला, तरी तिला इंग्रजी उच्चार नीट शिकण्याकरितां बरेच परिश्रम घ्यावे लागले. अजून देखील गार्बोच्या उच्चारांत 'ट'वर्गाचा अतिरेक दिसून येतो. गार्बो स्वीडनहून परत आली तों दरम्यान गिल्बर्टनें लग्न केलें होतें! गिल्बर्टशीं लग्न न करण्यांत आपण शहाणपणा केला असेंच गार्बोला वाटलें. गिल्बर्ट-प्रकरणानंतर लार्स हॅन्सेन, ल्यू एअर्स, क्लार्क गॅबल, जॉर्ज ब्रेंट इत्यादि प्रसिद्ध नटांच्या व मॅमॉडलिन ह्या दिग्दर्शकाच्या प्रेमपाशांत

गार्बो क्रमाक्रमानें सापडली असल्याच्या अफवा नियतकालिकांतून प्रसिद्ध होत होत्या व अगदीं अलीकडे मॅक्स गम्पेल या स्वीडिश लक्षाधीशाशीं गार्बोचा लग्न करण्याचा इरादा असल्याचीहि बातमी प्रसिद्ध झाली आहे; परन्तु गार्बो ह्या जन्मीं कोणाशींहि विवाहबद्ध होईलसें वाटत नाहीं. तिच्या प्रेमाची जी कसोटी आहे त्याला एकहि मनुष्य उतरणें शक्य नाहीं असेंच म्हटलें पाहिजे.

बोलपटांचें युग सुरू झाल्यानंतर गार्बोनें आजपर्यंत जवळ जवळ दहा चित्रपटांत काम केलें असेल. 'ॲना ख्रिस्ती' ह्या बोलपटामध्यें गार्बोचा आवाज श्रोतृवृंदाला प्रथम ऐकावयाला मिळाला. ह्या बोलपटांत ग्रीटा गार्बोबरोबर सुविख्यात नटी मेरी ड्रेसलर हिनेंहि काम केलें होतें. बोलपटाचें शूटिंग पुरें झाल्यानंतर गार्बो हिला असें वाटलें कीं, मेरी ड्रेसलरचें काम आपल्यापेक्षां अधिक चांगलें झाल्यामुळें, आतां आपलें महत्त्व फारसें राहणार नाहीं; परन्तु सुदैवानें तिचा हा समज चुकीचा ठरला व तिच्या कामाबद्दल तिची सर्वत्र वाहवाच झाली. ह्यानंतर महत्त्वाचा बोलपट म्हणजे सुप्रसिद्ध कादंबरीकर्त्री व्हिकी बॉम् हिच्या कादंबरीवर आधारलेला 'ग्रँड हॉटेल' हा होय. ह्या बोलपटांत गार्बो-व्यतिरिक्त जोन क्रॉफर्ड, जॉन व लायनेल बॅरिमूर व वॉलेस बीरि इत्यादि पहिल्या दर्जाच्या नटांनीं भूमिका घेतल्या होत्या. सदरहु बोलपटांतील गार्बोची भूमिका नेहमींप्रमाणेंच चांगली वठली असली तरी, लायनेल बॅरिमूरची भूमिका गार्बोच्या भूमिकेपेक्षांहि सरस वठली आहे यांत शंका नाहीं; परंतु मध्यंतरीं किंचित् कमी झालेलें यश गार्बोनें 'क्विन क्रिश्चिना' व 'ॲना कॅरेनिना' या बोलपटांतील आपल्या नितान्तरम्य अभिनयानें फिरून पूर्वीपेक्षांहि अधिक उज्ज्वल केलें आहे हें कोणालाहि कबूल करावें लागेल. 'माता-हारि' या बोलपटांत गार्बोचें

उत्कृष्ट नृत्य पाहावयास सापडतें व या कलेंतहि ती कशी निष्णात आहे याचें प्रत्यंतर येतें.

१९२९ नंतर पुन्हा तीन वर्षांनीं म्हणजे १९३२ सालीं गार्बो पुन्हा एकदां आपल्या मायभूमीचें दर्शन घेऊन आली. या वेळीं स्वीडनमध्यें तिचें इतकें प्रचंड स्वागत करण्यांत आलें कीं, एखाद्या सम्राज्ञीनेंहि तिचा हेवा करावा. लक्षावधि लोकांच्या गराड्यांतून आपली सुटका करून घेण्याकरितां गार्बोला ज्या नाना तऱ्हेच्या युक्त्या योजाव्या लागल्या त्यांचें सविस्तर वर्णन करावयाचें म्हटलें तर तो एक स्वतंत्र लेखच होईल. या वेळीं युरोपांतहि गार्बोचें सर्वत्र मोठ्या थाटाचें स्वागत झालें.

गार्बोनें चित्रपटसृष्टींत जें इतकें महनीय व स्पृहणीय यश मिळविलें त्यांतील खरें मर्म समजावून घेतलें पाहिजे. गार्बोची उंच व सडपातळ शरीरयष्टि, नितळ अंगकान्ति, भव्य भालप्रदेश, कांहीं विलक्षण तेजानें चमकणारे डोळे, व भावनांच्या अगदीं नाजुक छटा देखील व्यक्त करण्याइतका संस्कारक्षम चेहरा इत्यादि गुणसमुच्चयामुळें गार्बोची मूर्ति कोणाहि प्रेक्षकाच्या मनाची पकड घ्यावयास समर्थ हें खरें. तथापि चित्रपटसृष्टींत सर्वांगीण यश मिळविण्याला जे विविध गुण लागतात ते सर्वच गार्बोच्या ठिकाणीं आहेत असें नाहीं. गार्बोचा आवाज मधुर असला तरी तिला चांगलें गातां येत नाहीं. जीनेट मॅक्डोनाल्ड ही आपल्या गानमाधुर्यानेंच श्रोतृवर्गाला तल्लीन करून टाकते. गार्बो नृत्यकलेमध्यें प्रवीण आहे हें खरें, पण ती जिंजर रॉजर्सप्रमाणें धंदेवाईक नर्तकी नाहीं. त्याचप्रमाणें उत्तान शृंगाराच्या परिपोषाला आवश्यक असलेले ढंगदारपणा किंवा बेडरवृत्ति वगैरे गुणांचाहि तिच्या ठिकाणीं अभाव आहे. परंतु असें असूनहि अभिनय-

नैपुण्यांत तिची बरोबरी करणारी आज दुसरी नटी नाहीं याचें कारण तिच्या अभिनयांतील स्वाभाविकपणा व सहजपणा हे गुण होत. गार्बो आपल्या भूमिकेशीं इतकी तन्मय होऊन जाते कीं, काम करतांना स्वतःच्या अस्तित्वाची जाणीवहि तिला होत नाहीं. परन्तु गार्बोचा स्वभावच प्रौढ, संयमशील, मुग्ध व विनम्र असल्यामुळें तिच्या स्वाभाविक अभिनयांत हेच गुण व्यक्त व्हावे त्यांत आश्चर्य नाहीं. सर्वसाधारणपणें चित्रपटसृष्टींतील बहुतेक नटी आपल्या अभिनयांत भडकपणा आणतात किंवा त्यांना तसें शिकविण्यांत येतें. परंतु संयम हाच गार्बोचा एक स्वयंविशिष्ट गुण आहे. तिच्या भावना फक्त तिच्या अथांग डोळ्यांत केंद्रीभूत होऊन प्रकट होत असतात. तिच्या डोळ्यांच्या मदतीला क्वचित् तिचे ओठहि धावून येतात. ज्या भावना व्यक्त करण्याकरितां इतरांना आपल्या चेहऱ्याच्या सर्व स्नायूंना ताण द्यावा लागतो त्या भावना गार्बो आपला अधरोष्ठ किंचित् वक्र करून सहज व्यक्त करते. गार्बोचें सर्व आयुष्यच निराशामय वातावरणांत गेल्यामुळें तिला करुणरसाचा परिपोष उत्तम रीतीनें करतां येतो व त्या रसाला अनुकूल अशा भूमिकाच तिला देण्यांत येतात व ज्या भूमिकांशीं गार्बोला समरस होतां येत नाहीं त्या ती घेण्याचें साफ नाकारते; व आपल्यावर ती भूमिका लादल्यास आपण हॉलीवुड सोडून आपल्या मातृभूमीला परत जाण्याची ती धमकी देते व प्रसंग येतांच ती अमलांतहि आणते. त्यामुळें गार्बोला स्टूडिओमधील सर्व लोक वचकून असतात. तिचें काम चालू असतांना स्टूडियोमध्यें ती कोणाहि अनावश्यक माणसाला बसूं देत नाहीं.

गार्बोच्या लोकप्रियतेंत तिच्या स्वभावांतील तऱ्हेवाईकपणाचाहि बराचसा भाग आहे. तिच्या एकान्तवासप्रियतेमुळें तिचें आयुष्य मोठें

रहस्यमय बनलें आहे. सार्वजनिक समारंभांत गार्बो कधींहि भाग घेत नाहीं. कोणाहि अनोळखी माणसाची ती भेट घेत नाहीं. इंग्लंडचे एका वेळचे मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचे चिरंजीव अमेरिकेंत गेले असतां, त्यांनीं गार्बोशीं परिचय करून घेण्याची इच्छा दर्शविली, परंतु गार्बोनें त्याला साफ नकार दिला. गार्बो म्हणते, "मला माझ्या कलेमध्यें पाहा. माझ्या खाजगी आयुष्याशीं इतरांना काय कर्तव्य आहे? कवीची काव्यकृति आपण अभ्यासावी व त्यांत आनंद मानावा. तो तें काव्य कसें लिहितो हें जाणण्याकरितां कोणी धडपड करूं नये." परंतु मनुष्यस्वभाव अगदीं विचित्र आहे. तो एक वेळ काव्य वाचणार नाहीं. परंतु तें काव्य कसें लिहिलें जातें व कवि काय खातो आणि पितो या गोष्टींचीच त्याला अधिक जिज्ञासा असते. गार्बोच्या खाजगी जीवनाची माहिती मिळवण्याकरितां कित्येकांनीं ज्या मार्गांचा अवलंब केला आहे ते पाहिले म्हणजे विस्मय वाटल्यावांचून राहत नाहीं. कोणी तिच्या नोकरांना लाच देतो, कोणी तिचा नोकरच होण्याकरितां धडपडतो, व कोणी तिच्या जाण्यायेण्याच्या वेळांवर पाळत ठेवून रस्त्यावर तासन् तास उभे राहतात! ह्या सर्व जाचांतून सुटण्याकरितां गार्बोला मोठी दक्षता बाळगावी लागते. तिला आपल्या घरावर सक्त पहारा ठेवावा लागतो. प्रवास करतांना तिला आपलीं नांवें वारंवार बदलावीं लागतात. नुसते बाजारांतील जिन्नस आणण्याकरितां तिला अनेक युक्त्या व क्लृप्त्या लढवाव्या लागतात.

परंतु गार्बोच्या आयुष्यांतच रहस्यमय असें कांहींच नाहीं. मोठ्या पहाटेस उठणें व विवस्त्र होऊन समुद्रस्नान करणें; नंतर सकाळीं कांहीं वेळ अंगावर सूर्याचे कोवळे किरण घेणें, न्याहारी करणें, चित्रपटसृष्टीसंबंधींचीं मासिकें वाचणें, ग्रामोफोन रेकॉर्ड्स लावणें,

घोड्यावरून रपेट करणें, घराजवळील खाजगी जलाशयांत पोहणें, अगदीं निकटच्या मित्रांच्या भेटीगाठी घेणें, क्वचित् प्रसंगीं नाटकाला किंवा सिनेमाला जाणें व स्टूडियोंत काम करणें हाच तिच्या आयुष्याचा ठराविक कार्यक्रम आहे. पोषाक अगदीं साधा असतो; तिला स्टॉकिंग्ज अगदीं आवडत नाहींत; ती कच्चीं फळें व भाजीपाला खाते; निर्विष केलेल्या सिगारेट्स् ओढते; तिला आइसक्रीम फार प्रिय आहे. ती मोठी मितव्ययी किंबहुना कंजूष आहे. तिला मुलांचा मोठा षोक आहे. आपण संसारांत पडल्यास सहा मुलाबाळांची आई होणें आपणास आवडेल असें ती म्हणते. लग्न न केल्यास कदाचित् एखादें मूल दत्तक घेण्याचाहि तिचा विचार आहे. कुत्रे, मांजरें व पोपट यांचा तिला मोठा षोक आहे. गार्बोच्या आयुष्यांत यापेक्षां अधिक रहस्यमय असें कांहींच नाहीं. खाजगी जीवनांत ती अगदीं एखाद्या यःकश्चित् माणसाप्रमाणेंच वागते, परंतु खरी ग्रीटा गार्बो मात्र रुपेरी पडद्यावरच पाहावयास मिळते, हें विसरतां कामा नये.



चार्ली चॅप्लिन

७]

# चार्ली चॅप्लिन

कोणत्याहि सुप्रसिद्ध मनुष्याचें नांव उच्चारलें म्हणजे त्यांची सबंध मूर्ति आपल्या डोळ्यांसमोर उभी राहण्यापूर्वी त्याची चेहरेपट्टी, व त्यांतहि त्याचें व्यक्तिवैशिष्ट्य ज्यांत समाविष्ट झालें आहे ती गोष्ट, आपल्या मनश्चक्षूंसमोर प्रथम उभी राहते. बाल्डविनचें नांव उच्चारतांच त्याच्या चपट्या नाकाबरोबरच त्याच्या चिरुटाचीहि आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. हिटलरची आठवण होतांच त्याच्या रुंद व आखूड मिशांचे दोन ठळक ठिपके आपल्या नजरेसमोर प्रथम उभे राहतात. मुसोलिनीचें सारें वैशिष्ट्य त्याच्या जबड्यांत आणि घट्ट वळलेल्या मुठींत समाविष्ट झालेलें आढळून येतें. सुंदर नाक आणि सोज्ज्वळ दाढी हीं मनांत न आणतां रविबाबूंची मूर्ति डोळ्यांसमोर आणणें शक्य आहे काय? माजी कैसरच्या चढेल मिशाच त्याच्या महत्त्वाकांक्षेची जाणीव करून देण्यास पुरेशा होत्या. बर्नार्ड शॉ यांची

लांब दाढी व भव्य कपाळ हीं दोन्ही वैशिष्टयपूर्ण असलीं तरी त्यांच्या भिवयांखालीं चकमत असलेली त्यांची मिस्किल दृष्टिच आधीं आपल्या दृष्टीचा वेध घेते. तुम्ही कोणत्याहि चष्म्यांतून पाहिलेंत तरी हॅरॉल्ड लॉइडचा चष्माच तुमच्या डोळयांसमोर आधीं उभा राहणार. पण—

## चार्ली आणि चालू जमाना

पण चार्ली चॅप्लिनचें नांव उच्चारतांच त्याच्या डोक्यावर धांदरटपणानें बसलेली १९०७ सालची डर्बीशाही टोपी, तीखालून अस्ताव्यस्तपणें बाहेर येऊं पाहणारे त्याचे भुरभुरे केस, आश्चर्यप्रेरित प्रश्नार्थक भावनेनें किंचित् वर चढलेल्या भिवया, मूकशब्दांनीं हृदयाला जाऊन भिडणारे व काजळ घातल्यामुळें अधिकच काळेभोर दिसणारे त्याचे कारुण्यरसपरिप्लुत असे डोळे, अंतःकरणांत उचंबळलेल्या भावना अभावितपणें शब्दरूप धारण करून बाहेर पडूं नयेत म्हणून घट्ट दाबून धरलेले नाजुक व चिमणे ओठ, त्यांवर विशोभितपणें विलसणाऱ्या आखूड मिशा, शरीराला व्यवस्थितपणें विळखा घालतां न आल्यामुळें मागें सरकूं पाहणारा तोटका व बेढव कोट, सैलपणामुळें झोळण्यासारखी ओथंबणारी तुमान, दोन्ही पावलें एकाच बुटांत गुण्यागोविंदानें नांदूं शकतील एवढे मोठे, पण ४ च्या आंकड्याप्रमाणें परस्परांपासून तोंडें फिरवून राहणारे व नीटपणें चालण्यास अडथळा आणणारे लांबलचक बूट, व भंपकपणाचा आव आणणारी पण मोठेपणाला निमित्तमात्र आधार असणारी हातांतील वेताची काठी, हीं सारीं आपल्या मनश्चक्षूंसमोर एकसमयावच्छेदेंकरून उभीं राहतात. इतर माणसांचें व्यक्तिवैशिष्टय शरीराच्या एखाद्या भागांतच किंवा लकबींतच समाविष्ट झालेलें असतें; पण चार्ली चॅप्लिनचें

वैशिष्ट्य त्याच्या बुटांपासून टोपीपर्यंत शरीराच्या प्रत्येक अवयवांत व हालचालींत प्रकट झालेलें दिसून येतें. बहुतेक माणसें फक्त तोंडानें बोलतात; कांहींना आपल्या भावना चेहऱ्यावर व्यक्त करण्याचीहि कला साधलेली असते; परंतु चार्ली चॅप्लिनचें सर्व शरीरच बोलत असतें. फार काय शरीरापासून अगदीं विलग असणारी त्याच्या हातांतील काठीसुद्धां त्याच्या मनांतील भाव स्पष्ट बोलून दाखविते. आपल्या अंतःकरणांतील भावना शरीराच्या नुसत्या हालचालीवरून देखील दुसऱ्याला पटवून देण्याचें सामर्थ्य ज्याच्या ठिकाणीं आहे त्यानें बोलपटांविरुद्ध बंड पुकारून मूकपटालाच आपली कला अर्पण करण्याचा आपला निश्चय जाहीर करावा हें स्वाभाविक नाहीं काय ? आपणाला कोणी दहा लाख डॉलर्स दिले तरी आपण बोलपटांत काम करणार नाहीं अशी त्यानें घोषणा केली होती व तेवढी रक्कम खरोखरीच त्याला देऊं केली असतां तो आपल्या भीष्मप्रतिज्ञेला एकनिष्ठच राहिला. बोलपटांचें राज्य सर्हा सुरू झाल्याला आज कांहीं फार वर्षें झालीं नाहींत. ध्वनिलेखनाच्या नावीन्यामुळें सुरुवातीला बोलपट लोकप्रिय होणें अगदीं स्वाभाविक होतें. शिवाय परिचित व्यक्तींचा आवाज कसा आहे हें जाणण्याची उत्कंठा प्रत्येकाला असतेच. त्यांत आणखी संगीताची भर. असा त्रिवेणी संगम झाल्यामुळें बोलपटानें मूकपटाला मार्गे सारल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. परंतु कांहीं दिवसांपूर्वीं चार्ली चॅप्लिन 'चालू जमान्यांत' ( Modern Times ) पुन्हा अवतीर्ण होतांच त्याला पाहण्याकरितां जेव्हां लोकांच्या झुंडीच्या झुंडी जाऊं लागल्या तेव्हां चार्लीची लोकप्रियता अद्याप पूर्वींइतकीच कायम आहे हें सिद्ध झालें.

## गायन कीं विडंबन !

'मॉडर्न टाइम्स' या चित्रपटांत एका मजलशीच्या प्रसंगीं गाण्याच्या निमित्तानें चार्लीला एकदम वाचा फुटली आहे ही गोष्ट जरी खरी, तरी त्यामुळें चार्लीनें बोलपटाचें श्रेष्ठत्व मान्य केल्याचें बिलकुल सिद्ध होत नाहीं. कारण एक तर हा चित्रपट नव्याण्णव टक्के मुकाच असून क्वचित्प्रसंगीं जे शब्द कानीं पडतात ते निव्वळ यांत्रिक असल्याचें ध्वनित केलें आहे. शिवाय जें एक पद चार्लीनें गाऊन— नव्हे बोलून दाखविलें आहे तें अगदीं निरर्थक आहे; कारण त्यांत संगीत तर नाहींच पण त्यांतील शब्दांनाहि कांहीं अर्थ असेल असें वाटत नाहीं. किंबहुना हें पद गाण्यांत आपला न बोलण्याचा निश्चय कायम ठेवून, बोलपटाची अप्रत्यक्षपणें टर करण्याचा चार्लीचा हेतु असावा असाच संशय येतो; कारण तो जें एक पद म्हणतो तें इटालियन व स्पॅनिश अशा संमिश्र भाषेंत असल्यामुळें तें गाण्यांत पदाच्या निरर्थकपणानें हास्य उत्पन्न करण्यापलीकडे चार्लीचा अन्य कांहीं हेतु असेल असें वाटत नाहीं.

बोलपटामुळें मनुष्याच्या आवाजाला जरी महत्त्व आलें असलें तरी त्यामुळें चित्रपटसृष्टीच्या सर्वंकषपणाला व जागतिक स्वरूपाला मोठा धक्का बसला आहे हें थोड्याशा विचारांतीं सहज ध्यानांत येईल. एखाद्या देशांत त्या भाषेंत होणाऱ्या नाटकाचें जें महत्त्व तेंच आज बोलपटांचें महत्त्व राहिलें आहे. अन्य शब्दांत सांगावयाचें म्हणजे आजच्या बोलपटांत देश व भाषा यांच्या मर्यादा पडल्या आहेत. बोलपटांत भाषण करणाऱ्या पात्राचें बोलणें समजलें व त्यांतील खोंच लक्षांत आली तरच त्या भाषणाचा उपयोग आहे.

६९५९



नाहीं तर अशा भाषणामुळें अभिनयाकडे तर दुर्लक्ष होतेंच, पण भाषण न समजल्यामुळें कथानकांतील कार्यकारणभावाहि नीटसे ध्यानांत येत नाहींत; शिवाय बोलपट हे त्यांतील भाषणामुळेंच लोकप्रिय होतात असें थोडेंच आहे ? तसें असतें तर अमुक बोलपट तयार करण्याकरितां इतका अवाढव्य खर्च करण्यांत आला आहे, असे भव्य देखावे घेण्यांत आले आहेत, अशा जाहिराती देण्याची आवश्यकता कां भासावी ?

## अभिनयसृष्टीचा सम्राट् !

चार्ली चॅप्लिनच्या अभिनयाची विशिष्ट कलापद्धति लक्षांत घेतां त्याचा बोलपटावरील आक्षेप बरोबर आहे असें कबूल करावें लागतें. आज बोलपटांचें राज्य सुरू झालें असलें तरी मूकपटाच्या काळांत चार्ली चॅप्लिन सर्व जगावर आपलें प्रभुत्व गाजवीत होता ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्या वेळीं मूकपटाला राष्ट्रांतरित दर्जा कसा प्राप्त झाला होता तें कळून येतें. चार्लीची मूर्ति अमेरिकेंत आणि युरोपांत जितकी सर्वांच्या परिचयाची होती तितकीच ती चीन व जपान यांसारख्या सर्वस्वीं भिन्न भाषा बोलणाऱ्या व भिन्न संस्कृतीच्या देशांतहि सर्वांच्या परिचयाची होती हें ऐतिहासिक सत्य आहे. पृथ्वीवरील सर्व देशांतील आंकडे मागवून त्यांचें गणित केल्यावर असें सिद्ध झालें होतें कीं, दर दिवशीं एक कोटि वीस लक्ष लोक चार्ली चॅप्लिनची मूर्ति रुपेरी पडद्यावर पाहत असत. राष्ट्रसंघानें जगांतील एकमेवाद्वीतीय विनोदी नट म्हणून जो त्याचा एकमतानें गौरव केला तो योग्यच होय. चार्लीनें जी एवढी लोकप्रियता संपादन केली होती त्याला कारण त्याच्या ठिकाणीं वसत असलेले

विशिष्ट कलात्मक गुण होत. कांहीं कलावंतांची लोकप्रियता एका विशिष्ट वर्गापुरतीच मर्यादित असते; कारण त्यांच्या कलेचें क्षेत्र मर्यादित असतें. परंतु चार्ली हा आबालवृद्धांना सारखाच प्रिय वाटतो. त्याची कला सर्वगामी आहे; देशकालपरिस्थितीच्या बंधनांनीं ती जखडलेली नाहीं; कारण मनुष्याच्या मूलभूत स्वभावावर ती अधिष्ठित झालेली आहे. हसणें आणि रडणें हें मनुष्याला जितकें स्वाभाविक आहे तितकीच त्याची कलाहि स्वाभाविक आहे. चार्लीच्या अभिनयांत हास्य व करुण ह्या परस्परविरुद्ध मानल्या गेलेल्या पण अन्योन्याश्रयी रसांचें बेमालूम मिश्रण झालेलें आढळून येतें. त्याच्या हास्याला करुणरसाची मुरड घातलेली असते व त्याला वाटणाऱ्या शोकस्थानांत हास्याचीं बीजेंहि दृग्गोचर होत असतात. ऊनपावसांत सृष्टीच्या सौंदर्याला जें विलोभनीय स्वरूप प्राप्त होतें तेंच चार्लीच्या कलासृष्टींतहि पाहावयास सापडतें.

## चार्लीचा वेंधळा वेष

चार्लीनें एक कायम ठशाची वेषभूषा पत्करली आहे व ती अजूनहि बदलण्याची त्याला आवश्यकता वाटत नाहीं. कारण तिचें स्वरूप काकतालीयन्यायानें बनलेलें नाहीं. त्यानें स्वतःकरितां निवडलेल्या भूमिकेला सर्वस्वीं अनुरूप अशीच त्याची वेषभूषा आहे. प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं एक प्रकारची अहंकारबुद्धि आढळून येते. या अहंकारबुद्धीमुळें कित्येक प्रसंगीं मनुष्याचें वर्तन हास्यास्पद होतें; पण त्याची त्याला स्वतःलाच जाणीव नसते. आपण पडलों तरी आपलें नाक वरच असें आपल्या मोठेपणाचें समर्थन करण्याची मनुष्यामध्यें जी प्रवृत्ति दिसून येते तीवरच चार्लीनें आपली भूमिका आधारली

आहे. आपल्या मिशा अहंकाराच्या द्योतक असून आपली हॅट ही आपला सामाजिक दर्जा मोठा आहे हें दाखविण्याचें एक साधन होय असें चार्लीनें आपल्या वेषभूषेचें समर्थन केलें आहे. आखूड कोट व हातांत काठी हीं बिकट परिस्थितींत आपण सापडलों असतां आपण डगमगलों नाहीं हें दाखविण्यास फार उपयोगी पडतात असें तो म्हणतो. त्याची सैल तुमान व बेडौल बूट हीं त्याच्या भूमिकेंतील दारिद्र्याचीं चालतीं बोलतीं प्रतीकें होत !

## चार्लीच्या विनोदाचें मर्म

पायांत दारिद्र्याच्या शृंखला असतां डोक्यावर श्रीमंतीची निदर्शकें अशी टोपी घालून मनुष्य समाजांत ऐटीनें वागूं लागला म्हणजे त्याच्यावर हरघडी फजित पावण्याचे जे प्रसंग येतात ते दाखवून, मनुष्याला त्याच्या खऱ्या स्वभावाची ओळख करून देणें हें चार्लीच्या कलेचें एक कार्य आहे. चार्लीच्या बहुतेक चित्रपटांमध्यें तो नेहमीं निरनिराळ्या हास्यास्पद व हास्योत्पादक प्रसंगांत सापडलेला आढळून येतो त्यांतील इंगित हेंच आहे. मोठ्या जमावापुढें व्याख्यान देतांना मनांतून घाबरलेला मनुष्य आपण घाबरलों नाहीं असें भासविण्याची धडपड करतो. रस्त्यांत बेसावधपणामुळें पडलेला मनुष्य लगबगीनें उठून, इकडे तिकडे पाहून पाय मुरगळला असला तरी, जणूं कांहींच झालें नाहीं अशा तऱ्हेनें चालण्याचा प्रयत्न करतो. मारामारींत आपणाला मार बसला असला तरी आपणच प्रतिपक्षाला अधिक मार दिला आहे असें दाखविण्याकडेच मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ति दिसून येते. अशा तऱ्हेच्या प्रसंगनिष्ठ विनोदाचे मासले निवडण्यांत चार्लीचें खरें चातुर्य दिसून येतें. चार्ली म्हणतो, मी जरी लोटांगणें

घालीत जमिनीवर पडलों तरीताबडतोब उठून पडलेली काठी हातांत घेतों, डोक्यावरील टोपी सरळ करतो व नेकटाय सारखा करतो तो अशाकरितां कीं, नेहमींपेक्षां निराळें कांहीं घडलें आहे असें कुणाला वाटूं नये. मी स्वतःच अशा प्रसंगांत वारंवार सापडतों असें नाहीं; तर इतरांसहि शक्य तितकें करून अशा प्रसंगांत आणून त्यांना देखील हास्यास्पद करतों. त्याच्या 'सोन्यासाठीं धावपळ' (Gold Rush) ह्या चित्रपटांत असले प्रसंग किती तरी आहेत. एक प्रसंग असा आहे कीं, चार्ली हा एका प्रमुख नर्तिकेबरोबर नाच करीत असतां एकाएकीं त्याची विजार खालीं सरकूं लागतें. पण तेवढ्यांत प्रसंगावधान राखून जवळच्या टेबलावरील दोरी घेऊन तो ती आपल्या कमरेभोंवतीं गुंडाळतो. दुर्दैवानें त्या दोरीचें दुसरें टोक एका कुत्र्याच्या गळ्याला बांधलेलें असल्यामुळें तो कुत्रा देखील त्या नाचाच्या फेऱ्यांत सापडून त्याच्या पायाजवळ येतो. परंतु चार्लीला कुत्र्याची केविलवाणी स्थिति माहीत नसल्यामुळें तो कुत्र्याला वारंवार दूर हाकलण्याचा प्रयत्न करतो; व सर्वत्र हास्याचे फवारे उडत असतांनाहि त्याचें कारण वस्तुतः चार्लीच्या शरीराशीं निगडित झालें असून त्याला बराच वेळपर्यंत कळत नाहीं. दुसऱ्या एका प्रसंगीं नाचगृहांतील एक नृत्यांगना आपल्याकडे पाहून प्रेमळपणानें हसत असल्याचें चार्लीला आढळून येतें व त्यामुळें त्याला आनंदाच्या गुदगुल्या होतात; पण त्याचा हा आनंद फार वेळ टिकत नाहीं; कारण लवकरच त्याला असें आढळून येतें, कीं ती नर्तिका आपल्याशीं प्रणयचेष्टा करीत नसून आपल्या पाठीमागें उभ्या असलेल्या एका धिप्पाड पुरुषाकडे पाहून ती करीत आहे. चार्लीचा चेहरा खर्रकन् उतरतो, पण आपली मनःस्थिति कोणाच्या लक्षांत येऊं नये म्हणून

अगदीं निर्विकार चेहरा करून तो उभा राहतो. इतक्यांत त्या नर्तिकेचें तेथील रंगेल मंडळीमधील एकमेवाद्वितीय अशा या साधु पुरुषाकडे लक्ष वेधून या वेळीं ती खरोखरच त्याच्याकडे स्मितमुखानें पाहून, आपल्याबरोबर नाचायला बोलाविते. परंतु आपण एकदां फसलों तरी पुन्हा फसावयाचें नाहीं असा निश्चय करून, चार्ली तो धिप्पाड पुरुष आपल्यामागें उभा आहे कीं नाहीं तें हळूच पाहतो; पण तो तर कोठें दिसत नाहीं; तेव्हां आपल्यालाच हिनें वरलें आहे असें त्याला कळून येतें; व मग आनंदातिशयानें तो तिच्याशीं नाचायला प्रवृत्त होतो. आयुष्यांत अशा तऱ्हेचे सुखदुःखाचे व सुखदुःखमिश्रित जे शेंकडो प्रसंग येतात ते निवडून काढण्यांत व तें यथार्थतेनें चित्रित करून दाखविण्यांतच चार्लीच्या कलात्मकतेची खरी थोरवी आहे. वस्तुतः मनुष्य हा परिस्थितीच्या हातांतील एक बाहुलें असल्यामुळें, परिस्थितीशीं टक्कर देतांना त्याची स्थिति बहुतेक वेळां मोठी अनुकंपनीय होते; परंतु अशा प्रसंगींहि अहंकाराच्या आधीन होऊन त्याच्या हातून नेहमीं हास्यास्पद गोष्टी कशा घडत असतात हें दाखविणें हें चार्लीच्या कलेचें प्रमुख कार्य आहे.

## चार्ली चॅप्लिन व चार्लस डिकन्स

परंतु हें कार्य यशस्वी रीतीनें करून दाखविण्यास समाजाच्या खालच्या थरांतील पददलित व्यक्तींच्या आकांक्षा व भावना यांच्याशीं समरस होणें अत्यंत आवश्यक आहे. चार्लीच्या अंतःकरणांत गरीब व पीडित लोकांविषयीं व त्यांच्या दुःखाविषयीं खरीखुरी सहानुभूति असल्यामुळें, त्याची कला कृत्रिमपणापासून बहुतांशीं अलिप्त राहिली आहे. या बाबतींत चार्लीची तुलना डिकन्सशीं करावयास हरकत

नाहीं. दोघांनाहि आयुष्याच्या सुरुवातीलाच संसारांतील कडवटपणा भरपूर चाखावयास मिळाला, टक्केटोणपे खावे लागले, हरतऱ्हेच्या माणसांशीं व्यवहार करावा लागला व जगाचें खरेंखुरें स्वरूप प्रत्यक्ष पाहावयास मिळालें. दोघांनाहि विनोदबुद्धीचा निसर्गदत्त गुण भरपूर प्रमाणांत मिळालेला. प्रसंगनिष्ठ विनोद निर्माण करण्यांत दोघांचाहि हातखंडा. दोघेहि कल्पनेच्या जोरावर प्रतिसृष्टि उत्पन्न करणारे प्रति-विश्वामित्रच. परंतु डिकन्स व चार्ली चॅप्लिन यांच्या कलेच्या साधनांतील फरकामुळें दोघांच्या कृतींत फरक पडलेला दिसून येतो. लोकप्रियता व संपन्नता या बाबतींत चार्लीपुढें डिकन्सला हार खावी लागली तरी चिरंजीवित्वाच्या बाबतींत कलासाधनाच्या नश्वरतेमुळें चार्लीला डिकन्सपुढें माघार घ्यावी लागेल हें उघड आहे. गरीबांविषयींची अनुकंपा व विनोदबुद्धि या बाबींत जरी डिकन्स व चार्ली चॅप्लिन यांच्यामध्यें बरेंचसें साम्य आढळून येतें तरी एका गोष्टींत मात्र या दोघांत एक मोठा महत्त्वाचा फरक आढळून येतो. डिकन्सच्या उपहासगर्भ विनोदाची धार कित्येक वेळां शरीराला चाटून जाण्याऐवजीं जखम करते व त्याच्या उपहासाचें पर्यवसान बहुधा टर करण्यांत होतें. चार्ली-चॅप्लिनच्या विनोदांत हा प्रकार सहसा आढळत नाहीं. कलेला अत्यंत आवश्यक जो संयम तो चार्लीच्या ठिकाणीं फार प्रमाणांत आढळून येतो. विनोदांत अतिप्रसंग होण्याची भीति फार असते. विशेषतः विनोदाचें पर्यवसान अश्लीलपणांत केव्हां होईल हें सांगतां येत नाहीं; परंतु अश्लीलपणाच्या सीमारेषेवर जाऊनहि त्या क्षेत्रांत पाऊल पडणार नाहीं अशी दक्षता चार्लीनें बाळगली असल्यामुळें, संस्कृतीच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर उभ्या असलेल्या लोकांनाहि एकत्र बसून त्याच्या कलेचें निर्मळ सौंदर्य निःसंकोचपणें उपभोगतां

येणें शक्य झालें आहे. दुसरा फरक असा कीं, चार्ली दुसऱ्यांच्या सद्भावना सहसा दुखवीत नाहीं. स्वतःच्या भावनांचें विडंबन करून तो विनोद निर्माण करतों; त्यामुळें त्याची कला अधिक निर्दोष व लोकप्रिय झाली आहे. डिकन्स व मोलिअरप्रमाणें त्याचा विनोद बोचत नाहीं.

## चार्लीचा विनोद आणि मार्क्सचें तत्त्वज्ञान

स्त्रीसौंदर्याचा व्यापारी पद्धतीनें उपयोग करून घेऊन आपले चित्रपट लोकप्रिय करण्याच्या मोहापासून चार्ली नेहमींच दूर राहिला आहे. अल्पवयस्क मुलांबद्दल प्रेक्षकांना वाटणाऱ्या प्रेमळ कुतूहलाचा फायदा घेऊन, केवळ एखाद्या बालनटावर अनेक चित्रपटांची उभारणी करण्यांत येत असते. चार्लीच्या 'कारटें' (The Kid) या चित्रपटांत सुप्रसिद्ध बालनट जॅकी कूगन हा काम करतो. निव्वळ जॅकीच्या कामावर चार्लीला आपला बोलपट सहज यशस्वी करून दाखवितां आला असता. पण चार्लीची कलात्मक बुद्धि श्रेष्ठ दर्जाची असल्यामुळें, त्यानें या बालनटाचा उपयोग केवळ रसपरिपोषाला आवश्यक तेवढाच करून घेतला आहे. सदर बोलपटांत खलपात्र एकहि नसून केवळ आर्थिक विषमतेमुळें कायद्याचा फायदा श्रीमंत लोकांनाच तेवढा कसा मिळतो व बिचारे गरीब लोक मात्र कायद्याच्या कचाट्यांत कसे नाडले जातात याचें हृदयस्पर्शी चित्र काढलें आहे. प्रस्तुत बोलपटांत चार्लीनें मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचा अवलंब केला आहे असें म्हणण्यांत येतें. परंतु चार्लीच्या हातून ही गोष्ट अभावितपणें घडली असली पाहिजे यांत शंका नाहीं. एखाद्या श्रीमंत पण कनवाळू लक्षाधीशानें उपरति होतांच आपलें द्रव्य गोरगरिबांना वाटून टाकलें

म्हणजे तो जसा मार्क्सचा अनुयायी होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें चार्लीच्या एखाद्या चित्रपटांत आर्थिक विषमतेमुळें गरिबांची दुर्दशा कशी होते, याचें चित्र रेखाटलें गेल्यास चार्लीला मार्क्सचें तत्त्वज्ञान समजलें अगर पटलें असें बिलकुल म्हणतां येत नाहीं. कारण चार्लीला मार्क्सचें तत्त्वज्ञान जर खरोखरच समजलें असतें तर, त्याच्या नुकत्याच मुंबईत दाखविलेल्या 'यांत्रिक युग' (Modern Times) या अत्यंत लोकप्रिय चित्रपटांत त्या तत्त्वज्ञानाचा उत्तम आविष्कार करण्यास त्याला भरपूर सवड होती. पण सदरहू बोलपटाच्या सुरुवातीला ज्या आकांक्षा उत्पन्न होतात त्या दुर्दैवानें पुढें सफळ होत नाहींत; एवढेंच नव्हे, तर सुरुवातीच्या गंभीर व हृदयद्रावक दृश्याचें पर्यवसान शेवटीं शेवटीं हास्यास्पद प्रसंगनिर्मितींत झालेलें पाहण्याचें नशिबीं येतें. पण या बाबतींत चार्लीला दोष देण्याचें कारण नाहीं. चार्लीचा जो उद्देशच नव्हता तो त्याच्यावर लादून मग तो फलद्रूप झाला नाहीं म्हणून त्याला हिणविण्यांत काय अर्थ आहे? चार्ली हा व्यक्तिवादी असून त्याला सामुदायिक जाणीव नसल्यामुळें मार्क्सच्या वर्गकलहाचें तत्त्वज्ञान कसें समजणार? 'यांत्रिक युगां'त एखाद्या व्यक्तीवर करुणाजनक व त्याचप्रमाणें हास्योत्पादकहि प्रसंग कसे येऊं शकतात हेंच चार्लीला दाखवावयाचें होतें; व तें त्यानें उत्तम रीतीनें दाखविलें आहे. संप पुकारणाऱ्या कामगाराचें पुढारीपण अभावितपणें प्राप्त होणें व त्यामुळें तुरुंगांत जावें लागणें किंवा तुरुंगांतील कैद्यांच्या मुक्ततेला केवळ योगायोगामुळें कारणीभूत होणें या गोष्टींचा अंतर्भाव तत्त्वज्ञानांत करणें वेडेपणाचें होईल.

## चार्लीच्या कलेचा मर्यादितपणा

कलावन्त या नात्यानें चार्लीचा मोठेपणा हा त्याच्या व्यक्तींचीं

सुखदुःखें सहानुभूतिपूर्वक रेखाटण्यांत प्रतीत होतो हें जितकें खरें, तितकेंच त्याच्या व्यक्तिवादी तत्त्वज्ञानामुळें त्याचें कलाकृतीचें क्षेत्र मर्यादित झालें आहे हेंहि खरें. त्याच्या सर्व चित्रपटांत निरनिराळ्या प्रसंगांत सापडलेल्या व्यक्तींच्याच सुखदुःखांचीं व आकांक्षांचीं चित्रें सहानुभूतीच्या व अनुभूतीच्या पार्श्वभूमीवर रेखाटण्यांत आलीं आहेत व म्हणूनच तीं लहानापासून थोरापर्यंत सर्वांच्या आवडीचीं होऊन बसलीं आहेत. सर्वसामान्य प्रेक्षकांची चित्रपट पाहण्याची दृष्टि ही आत्मनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ असते व चार्लीच्या जागतिक लोकप्रियतेचें खरें गमक हेंच आहे.

## सर्व हुद्दे एकवटलेला कर्णधार!

चित्रपट तयार करण्याची चार्लीची पद्धतिहि अशीच व्यक्तिनिष्ठ व आत्मनिष्ठ आहे. चार्लीचा प्रत्येक चित्रपट म्हणजे त्याच्या वैयक्तिक बुद्धिमत्तेचें व कर्तबगारीचें केवळ स्वसंपादित असें दृश्य फळ होय. चार्लीच्या प्रत्येक चित्रपटाचा निर्माता व लिखिता स्वतः चार्लीच असतो. डायरेक्टर, आर्ट डायरेक्टर, म्यूझिक डायरेक्टर, सिनॅरिओ रायटर, फोटोग्राफर वगैरे जे अलीकडील बोलपटांत असंख्य हुद्दे आढळून येतात ते सर्व चार्ली याजमध्येंच केंद्रीभूत झाले आहेत. याचा अर्थ चार्ली याजपाशीं पुरेशीं माणसें नाहींत असें नाहीं. त्याच्या हाताखालीं चित्रपट-सृष्टींतील अनेक तज्ज्ञ माणसें आहेत; व विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे हीं माणसें चार्लीच्या हाताखालीं वीस वीस वर्षें एकनिष्ठपणें काम करीत आहेत. त्यामुळें चार्लीचा हॉलीवुडमधील स्टूडिओ तेथील इतर स्टूडिओंपेक्षां अगदीं वेगळ्या स्वरूपाचा भासतो. चार्लीचा स्टूडिओ एखाद्या सामायिकपणें नांदणाऱ्या

कुटुंबाप्रमाणें खाजगी स्वरूपाचा आहे. चार्लीचे स्वभावविशेष सर्वांच्या चांगल्या परिचयाचे असल्यामुळें व प्रत्येक मनुष्य चार्लीला खूष ठेवण्याचा मनापासून प्रयत्न करीत असल्यामुळें, तेथील कामें कांहीं-एक गाजावाजा न होतां अगदीं बिनबोभाट पार पडतात. चित्रपटाच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींतहि चार्ली लक्ष घालीत असल्यामुळें व प्रत्येक गोष्ट मनाप्रमाणें होईपर्यंत तिचा पाठपुरावा करण्याचा त्याचा बाणा असल्यामुळें, चार्लीला एक चित्रपट काढण्याला वर्षांच्या वर्षें लागतात. 'सिटी लाइट्स' हा चित्रपट तयार करण्याला चार्लीला तीन वर्षें लागलीं व एकंदर ३,६०,००० फुटांपैकीं फक्त ८६०० फूट चित्रपट दाखविण्यांत आला!

'मॉडर्न टाइम्स' हा चित्रपट तयार करण्याला चार्लीला एक वर्ष पुरें पडलें नाहीं. ह्या चित्रपटाच्या पायीं चार्लीनें दहा लक्ष डॉलर्स खर्च केले. यावरून त्याच्या अवाढव्य उत्पन्नाची कल्पना करतां येईल. चित्रपटांतील प्रत्येक पात्रानें अभिनय कसा करावयाचा तो प्रथम चार्ली स्वतः करून दाखवितो; व प्रत्येकाचें काम मनाप्रमाणें उतरण्याला जरी कितीहि शॉट्स घ्यावे लागले तरी चार्ली त्याची पर्वा करीत नाहीं. सारांश, चार्लीच्या वैयक्तिक लहरी-प्रमाणें चार्लीच्या चित्रपटांचें काम धीमेपणानें व अनियमितपणानें चाललेलें असतें. कांहीं दिवस तर पात्रांची जुळवाजुळव करूनहि कांहीं एक काम करण्यांत येत नाहीं. कित्येक वेळां हजारों फूट फिल्म घेऊनहि तिच्यांतील बहुतेक फिल्म कापली जाते. पण त्यामुळें कोणाचाहि पगार कापण्यांत येत नाहीं. चार्लीची त्याच्या प्रेमळपणाच्या वागणुकीविषयीं व औदार्याविषयीं फार प्रसिद्धि आहे. चार्लीनें लोकप्रियतेइतकाच पैसाहि मिळविला आहे. परंतु इतका

पैसा व प्रसिद्धि मिळवूनहि चार्ली हा जगांतील एक अत्यंत दुःखी प्राणी आहे.

## कार्लीनीचा आधुनिक अवतार !

सबंध जगाला हसविणारा चार्ली स्वतः इतका दुःखी असावा ही विधिघटना आश्चर्यकारक नाहीं असें कोण म्हणेल? चार्लीच्या दुःखमय आयुष्याची आठवण झाली म्हणजे मला नेहमीं कार्लीनी या नांवाच्या एका विख्यात इटालिअन नकलाकाराची आठवण होते. हा सुप्रसिद्ध नकल्या एकदां पॅरिस शहरांत येऊन राहिला होता; व तेथें त्याची पुष्कळ वाहवा झाली. त्याचा मुक्काम पॅरिसमध्यें असतांनाच एकदां असें झालें कीं तेथील एका प्रसिद्ध डॉक्टराकडे एक मनुष्य येऊन असें सांगू लागला कीं, "डॉक्टरसाहेब, माझें चित्त वारंवार उदास होत असल्यामुळें मी जिवाला अगदीं कंटाळून गेलों आहे. तर माझ्या चित्ताला ज्यामुळें प्रसन्नता येईल असें कांहीं तरी औषध मला द्या." डॉक्टरसाहेबांनीं पुष्कळ विचार करून त्याला असें सांगितलें कीं, तुझा रोग औषधांनीं बरा होण्यासारखा नाहीं; परंतु तो रोग नाहींसा होण्याला एक उपाय करून पाहण्यासारखा आहे. तो असा कीं, सध्यां येथें कार्लीनी या नांवाचा जो विख्यात नट आला आहे; त्याच्या नकला तुम्ही कांहीं दिवस पाहा म्हणजे तुमचा उदासपणा अजीबात नाहींसा होऊन जाईल. रोग्यानें उत्तर दिलें, "डॉक्टरसाहेब, ज्या कार्लीनीची तुम्ही एवढी तारीफ करतां तो मीच! मी साऱ्या पॅरिस शहराला खो-खो हसवून सोडीत आहे खरा; पण माझ्याइतका दुःखी प्राणी या पृथ्वीवर दुसरा कोणी असेल असें मला वाटत नाहीं."

# बेपारी इंग्रजांकडून आबाळ

चार्ली चॅप्लिनची स्थिति थेट या कार्लीनीप्रमाणें आहे आणि त्याला परिस्थितीपेक्षांहि त्याचा स्वतःचा व्यक्तिनिष्ठ असा स्वभावच मुख्यत्वें-करून कारणीभूत झाला आहे. ज्या व्यक्तिविशिष्ट तत्त्वज्ञानामुळें चार्लीनें जगांत इतकी लोकप्रियता संपादन केली तेंच तत्त्वज्ञान त्याच्या दुःखाला कारणीभूत व्हावें हें दैवदुर्विलसितच नाहीं तर काय? चार्लीचें बालपण दुःखांत गेलें हें खरें. चार्लीचा बाप (हा गवई होता) त्याच्या लहानपणींच वारला व चार्लीला आपल्या वयाच्या पांचव्या वर्षापासूनच स्वतःच्या पायावर उभें राहावें लागलें. त्याची आई एक सामान्य नटी असल्यामुळें तिला आपल्या मुलांना धड शिक्षणाहि देतां आलें नाहीं. चार्ली हा आज अमेरिकेंत हॉलीवुड येथें जमीनजुमला घेऊन तेथील नागरिक झाला आहे, तरी तो इंग्रज असून त्याचा जन्म खुद्द लंडनमध्येंच झाला आहे हें विसरून चालणार नाहीं. एखादा मनुष्य प्रसिद्धीस आला म्हणजे इंग्रज लोक त्याची वाहवा करतील व उदारपणें त्याला एखादी पदवीहि बहाल करतील; पण ते एखाद्या गुणी माणसाला उत्तेजन देऊन त्याला इंग्लंडमध्यें प्रसिद्धि मिळवूं देणार नाहींत. कोणी प्रसिद्धीस आला म्हणजे त्याच्या मोठेपणाचें श्रेय घ्यावयाला मात्र ते मागेंपुढें पाहत नाहींत. चार्लीनें आपल्या वयाच्या एकविसाव्या वर्षापर्यंत कीर्ति तर दूरच, पण पोटापुरतें अन्न मिळविण्यासाठींच हरतऱ्हेची खटपट करून पाहिली. पण रूक्ष स्वभावाच्या इंग्रज लोकांकडून आपल्या अंगच्या गुणांचें चीज होण्याची चार्लीला आशा दिसेना तेव्हां तो एकविसाव्या वर्षी अमेरिकेंत गेला व तेथें अल्पावधींतच त्यानें भरपूर संपत्ति आणि कीर्ति मिळविली.

## इंग्रजांचे ढोंगी समारंभ

वस्तुतः चार्लीला सुखी होण्यास सर्वस्वीं अनुकूल अशीच परिस्थिति आतां निर्माण झाली होती. त्या वेळच्या मूक चित्रपटाच्या काळांत त्याला कोणीहि प्रतिस्पर्धी उरला नव्हता. कीर्ति आणि पैसा मिळाल्यानंतर त्यानें सर्व जगभर प्रवास केला; व प्रत्येक देशांत त्याचें मोठ्या थाटानें स्वागत करण्यांत आलें. जगप्रसिद्ध नट या नात्यानें तो जेव्हां आपल्या मायभूमीला भेट देण्याकरितां गेला त्या वेळीं इंग्रज लोकांनीं त्याला अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचविलें. वस्तुतः यापूर्वी अमेरिकेंतून तो एकदां इंग्लंडला येऊन गेला होता. परंतु त्या वेळीं त्याची कीर्ति इतकीशी पसरली नव्हती; त्यामुळें त्याजकडे कोणी ढुंकूनहि पाहावयास तयार नव्हतें. परंतु या वेळचा प्रसंग अगदीं वेगळ्या स्वरूपाचा होता. या वेळीं चार्लीचा सन्मान केल्यानें इंग्लंड-चा मान वाढणार होता. त्यामुळें त्याच्या स्वागतार्थ मोठी जय्यत तयारी करण्यांत आली. पॅडिंग्टन स्टेशनवर त्याला उतरून घेण्या-करितां पन्नास हजार लोक गोळा झाले होते. लॉर्ड मेयरप्रमाणें रस्त्यांतून त्याची मिरवणूक काढण्यांत आली. बड्या बड्या लोकांनीं त्याला आपल्याकडे मेजवानीला बोलावून त्याच्याबरोबर आपले फोटो काढून घेतले व चार्लीच्या कीर्तिप्रकाशांत उभें राहून त्यांनीं स्वतः-साठीं तात्पुरती प्रसिद्धिहि मिळविली; परंतु चार्लीला असल्या ढोंगी लोकांच्या स्वागत-समारंभाची मोठी चीड होती. असें सांगतात कीं त्या वेळचे मजूर पुढारी रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनीं चार्लीला आपल्या बिऱ्हाडीं बोलाविल्यावरून तो जेव्हां त्यांजकडे गेला तेव्हां मुख्य प्रधानांशीं बोलतां बोलतांच त्याला खुर्चीवर झोप लागली! यावरून या दोघांमधील संभाषण किती मामुली स्वरूपाचें झालें असेल याची कल्पना

येते. चार्लीच्या मनांतून इंग्लंडांत येतांच आपल्या बालपणीच्या जानी दोस्तांव्यतिरिक्त फक्त एकाच प्रसिद्ध व्यक्तीला आपण होऊन भेट द्यावयाची होती. ती व्यक्ति म्हणजे बर्नार्ड शॉ हे होत. मनांत योजल्याप्रमाणें लंडनला येतांच चार्लीनें प्रथम शॉ यांची भेट घेतली. चार्ली अशिक्षित असला तरी अनेक जगप्रसिद्ध विद्वानांनीं त्याला आपण होऊन आपल्या भेटीचा लाभ दिला आहे. एच्. जी. वेल्स हे अमेरिकेला गेले असतांना हॉलीवुडमध्यें ते चार्लीचेच पाहुणे म्हणून राहत होते. जगविख्यात शास्त्रज्ञ आइन्स्टाइन हे कॅलिफोर्नियांत कांहीं शास्त्रीय शोधाकरितां गेले असतां, त्यांना हॉलीवुडमधील प्रसिद्ध व्यक्तींकडून भेट देण्याकरितां आग्रहाची आमंत्रणें आलीं. हॉलीवुडमध्यें गेल्यावर त्यांनीं सांगितलें कीं, मला फक्त चार्ली चॅप्लिन यांस भेटावयाचें आहे. बाकी कोणालाहि भेटण्याची माझी इच्छा नाहीं. पृथ्वीप्रदक्षिणा करतांना शॉ हे जेव्हां हॉलीवुडमध्यें आले तेव्हां त्यांजबरोबर सदोदित चार्ली चॅप्लिन फिरत असत.

## जगण्याच्या सवयीनें जगणारा माणूस !


परंतु जगांत एवढी मानमान्यता मिळूनहि चार्ली स्वतःला जगांतील एक अत्यंत अभागी इसम समजतो ! माझें सर्व आयुष्य निराशेनें व्याप्त झालें आहे. जगण्याची केवळ सवय झाल्यामुळेंच मी जिवंत आहे असे चार्लीनें स्वतःसंबंधीं उद्गार काढले आहेत. चार्लीनें असे उद्गार कां काढावे तें कळणें मोठें कठीण आहे; परंतु उभ्या आयुष्यांत खरें वैवाहिक सुख असें कधींच न लाभल्यामुळें चार्लीला जें निष्प्रेम आयुष्य कंठावें लागलें याचाच हा परिणाम असावा असें वाटतें. कलावन्ताच्या ठिकाणीं सर्वसाधारणपणें आढळून येणारी

ध्येयवादित्वाची व आत्मनिष्ठतेची मनोवृत्ति लक्षांत घेतली म्हणजे चार्ली यास मनासारखें वैवाहिक सुख कां मिळूं शकलें नाहीं त्याची कल्पना करतां येतें. चार्लीनें आजतागायत पांच-सहा तरुणींशीं वैवाहिक संबंध जोडून सुखी होण्याचा प्रयत्न केला; पण त्यांपैकीं एकहि यशस्वी ठरला नाहीं. काडी-मोड करण्याचे आजवर त्याला अनेक प्रसंग आले आहेत. लग्न होतांच स्वर्गीय सुखाची कल्पना करून वैवाहिक आयुष्य घालविण्यास प्रारंभ करावयाचा व आपण पृथ्वीवरच आहोंत असें आढळून येतांच, वैतागाच्या भरांत जवळचें प्रेम लाथाडून आदर्श प्रेमाचा शोध करीत फिरायचें असा चार्लीचा स्वभाव आहे. चार्लीला लहान मुलांचा फार लळा आहे. पहिल्या संबंधापासून त्याला जो मुलगा झाला होता तो बिचारा नामकरणविधि होण्यापूर्वींच मृत्युमुखीं पडला. चार्लीनें त्याच्या थडग्यावरील दगडावर 'माझा छोटा उंदीर' हें नांव खोदून ठेविलें आहे. त्याच्या थडग्याजवळ बसून चार्लीनें दिवसच्या दिवस रडण्यांत घालविले. चार्लीला लिटा ग्रे या नांवाच्या त्याच्या पत्नीपासून दोन मुलगे झाले असून ते दोघेहि सध्यां त्याजजवळ आहेत. त्यांच्या संगतींत चार्लीचा काळ मोठ्या आनंदांत जातो. दुर्दैव एवढेंच, कीं त्यांना रुपेरी पडद्यावरील आपल्या बापाचें काम पसंत पडत नाहीं. त्यापेक्षां 'मिकी माऊस'च अधिक चांगलें काम करतो असें त्यांचें प्रामाणिक मत आहे. त्यांच्या आईनें मात्र चार्लीशीं कधींच काडीमोड केली आहे.

## चार्लीचें नवें प्रेम

प्रत्येक चित्रपटाबरोबर चार्लीचा नवीन प्रेमसंबंध सुरू होतो. 'मॉडर्न टाइम्स्'मधील मुख्य नटी पॉलेट गोडार्ड हिच्याशीं त्याचा

दोन वर्षांपूर्वींच एका बोटींत गुप्तपणें विवाह झाला असल्याची वदंता आहे. तथापि ही गोष्ट त्यानें अद्याप जाहीर केली नाहीं. आजपर्यंत त्यानें आपले जे विवाह जाहीर केले ते सर्व अपेशी ठरले आहेत; तेव्हां एखादा विवाह जाहीर न केल्यास तो तरी सुखदायी होतो किंवा काय हें पाहण्याचेंच त्यानें ठरविलें असावें. पॉलेटचें वय अवघें बावीस वर्षांचें आहे; व चार्ली हा सत्तेचाळीस वर्षांचा आहे. चार्लीचा जन्म १८८९ मध्यें झाला.



डॉन ब्रॅडमन

# डॉन ब्रॅडमन

## क्रिकेट : खेळांचा राजा

क्रिकेटला 'खेळांचा राजा' म्हणून संबोधण्यांत येतें तें अगदीं बरोबर आहे. पत्ते, कॅरॉम, बुद्धिबळें इत्यादि बैठे खेळ 'गादी'वर बसणाऱ्यांचे असले, तरी ही 'गादी' कांहीं राजाची नव्हे. पत्त्यांत राजा असतो परंतु कांहीं डावांत लग्न लावण्यापलीकडे तो कांहींच पराक्रम करीत नाहीं. कॅरॉममध्यें एक नांवाची राणी असते, परंतु राजाचाच कोठें पत्ता नसतो. बुद्धिबळांत मात्र राजा असतो एवढेंच नव्हे, तर तो आपल्या चतुरंग सैन्यासह शत्रूवर स्वारी करण्यासहि निघालेला असतो. परंतु थाट महायुद्धासारखा असला तरी, तो खेळणारास शारीरिक इजा बिलकुल होत नाहीं. शिवाय बुद्धिबळांतील राजा इंग्लंडच्या राजाप्रमाणें वजिराच्या म्हणजे प्रधानमंडळाच्याच

ताब्यांत असून, त्याला कधीं पदच्युत व्हावें लागलें नाहीं, तरी तो नेहमीं नजरकैदेंत असल्यासारखाच असतो. उपरिनिर्दिष्ट बैठ्या खेळांत शारीरिक सामर्थ्याची बिलकुल आवश्यकता नसते. बुद्धि-बळाच्या डावांत बुद्धीचा तरी उपयोग करावा लागतो; परंतु इतर बैठ्या खेळांत शारीरिक सामर्थ्य तर नकोच, पण डोकेंसुद्धां नसलें तरी चालतें. ही झाली बैठ्या खेळांची दशा. गोल्फ, टेनिस, फूट बॉल इत्यादि चालत्या व धावत्या खेळांसहि क्रिकेटची बरोबरी करतां येईल असें वाटत नाहीं. गोल्फ व टेनिस हे तर बोलून चालून पेन्शनर लोकांचे खेळ; फूट बॉलमध्यें डोक्यापेक्षां पायाचेंच महत्त्व अधिक; पण क्रिकेटमध्यें डोक्यापासून पायांपर्यंत प्रत्येक अवयवाचा बुद्धिपूर्वक उपयोग करावा लागतो. तीव्र बुद्धि, तीक्ष्ण दृष्टि, निधडी छाती, पोलादी हात व चपल पाय एवढी सामग्री नसेल तर क्रिकेटच्या वाटेला कोणीहि जाऊं नये. ज्याच्या मनगटांत जोर असेल त्यानेंच हातांत बॅट घ्यावी. परंतु असें असूनसुद्धां लहानापासून थोरापर्यंत सर्वांना हा खेळ खेळतां येतो. क्रिकेटच्या लोकप्रियतेचें मर्म यांतच आहे. शिकण्याला सोपा पण त्यांत कौशल्य दाखविण्याला वाटेल तितका अवसर. क्रिकेट खेळावयाला जितकें विस्तीर्ण क्षेत्र लागतें, तितकेंच त्या खेळांत चातुर्य दाखविण्यालाहि विस्तीर्ण क्षेत्र आहे. क्रिकेटइतका दुसरा प्रेक्षणीय खेळ नाहीं. सहस्रावधि लोकांना एकत्र जमून जो मार्मिकपणें पाहतां येईल असा क्रिकेटसारखा दुसरा खेळ नाहीं. खेळाडू म्हणून, गोलंदाज म्हणून, यष्टिरक्षक व क्षेत्ररक्षक म्हणून, हरतऱ्हेनें या खेळांत कौशल्य दाखवितां येतें व दाखविलेलें लांबूनहि पाहतां येतें. मनुष्याच्या अंगांतील सर्व शक्तींचा एकसमयाव-च्छेदेंकरून इतका उपयोग व उपभोग इतर कोणत्या खेळांत अंतर्भूत

झाला आहे ? म्हणून क्रिकेटला 'खेळांचा राजा' ही अगदीं अन्वर्थक पदवी मिळालेली आहे यांत शंका नाहीं.

## क्रिकेटचा सार्वभौम सम्राट्

आतां क्रिकेटला जर खेळांचा राजा म्हटलें, तर ब्रॅडमन यास क्रिकेट-चा सार्वभौम सम्राट् म्हणून संबोधलें पाहिजे. कारण सर्व खेळांतल्या या राजाला आपल्या अंकित करून घेऊन त्यांत अग्रपूजेचा मान त्यानें आज मिळविला आहे. रणांगणांत अद्वितीय शौर्य प्रगट केलेल्या योद्धयांचीं नांवें इतिहासतज्ज्ञांखेरीज इतर सर्वांना माहीत असतीलच असें म्हणतां येत नाहीं; साहित्य-क्षेत्रांत लेखणी गाजवून नोबेल प्राइझ मिळविणाऱ्या सरस्वतीच्या भक्ताचें नांवहि साहित्यभक्तांखेरीज इतरांच्या परिचयाचें असण्याचा संभव कमी; पण क्रिकेटक्षेत्रांत अद्वितीय पराक्रम गाजविणाऱ्या ब्रॅडमनचें नांव मात्र आज देश, भाषा व धर्म यांची कोंडी फोडून आबालवृद्धांच्या परिचयाचें झालें आहे. क्रिकेट क्षेत्रांत ब्रॅडमन यानें अगदीं लहानपणापासून आजपर्यंत इतके विक्रम केले आहेत कीं, आज त्याच्या डोक्यावर झळकत असलेला कीर्तीचा मुकुट आणखी कित्येक वर्षेंपर्यंत तरी दुसरा कोणी हिरावून घेईल कीं काय याची शंकाच आहे.

## ब्रॅडमनचे विक्रम

ब्रॅडमन यानें वयाच्या बाराव्या वर्षीं क्रिकेटच्या सामन्यांत शंभरांवर धावा काढल्या. सतराव्या वर्षीं बोरॉल या आपल्या गांवच्या टीमचा स्टार म्हणून तो प्रसिद्धीस आला; आणि त्यानें लागोपाठ प्रत्येक इनिंग्जमध्यें ३२०, ३००, २३० अशा धावा काढल्या. जवळ जवळ सुरुवातीलाच खेळावयास जाऊन शेवटपर्यंत नॉट ऑउट राहण्याच्या

बाबतींत ब्रॅडमनची बरोबरी आजवर एकाहि खेळाडूनें केलेली नाहीं. मध्यंतरीं दोन वर्षेंपर्यंत अनेक सामन्यांत खेळून तो एकदांहि बाद झाला नव्हता. १८ व्या वर्षी त्याला ऑस्ट्रेलियांतील फर्स्ट ग्रेड क्रिकेटच्या सामन्यांत घेण्यांत आलें व पहिल्याच खेपेला त्यानें शंभरांवर धावा केल्या. १९२७ सालीं जेव्हां चॅपमनच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडची टीम ऑस्ट्रेलियांत गेली तेव्हां त्यानें कसोटीच्या तिसऱ्या सामन्यांत ११२ व पांचव्या सामन्यांत १२३ धावा काढून नांव कमाविलें. यानंतर १९३० सालीं वुडफुल याच्या नेतृत्वाखालीं जी ऑस्ट्रेलियन टीम इंग्लंडला गेली व जिनें आदल्या वेळीं चॅपमननें ऑस्ट्रेलियाचें हिरावून नेलेलें यश ( Ashes ) परत ऑस्ट्रेलियाला आणलें, तो काळ म्हणजे ब्रॅडमनच्या कीर्तिमंदिराचा कळस होय असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण तेथें झालेल्या कसोटीच्या पहिल्या सामन्यांत त्यानें १३१, दुसऱ्या सामन्यांत २५४, तिसऱ्या सामन्यांत ३३४ आणि पांचव्या सामन्यांत २३२ अशा धावा काढून इंग्लंडमधील लोकांना स्तिमित केलें. पांचहि कसोटीच्या सामान्यांत मिळून त्यानें एकंदर ९७४ धावा काढल्या. त्यानें आणखी २६ धांवा काढल्या असत्या त्याला १००० धावा काढल्याचें श्रेय मिळालें असतें. इंग्लंडमध्यें आल्यापासून ऑस्ट्रेलियाला परत जाईपर्यंत त्यानें एकंदर ३१७० धावा काढल्या व आजपर्यंत कोणत्याहि ऑस्ट्रेलियन खेळाडूला शक्य न झालेली गोष्ट त्यानें शक्य करून दाखविली! या खेपेस ऑस्ट्रेलियानें इंग्लंडवर जो प्रचंड विजय मिळविला त्याचें बहुतेक सर्व श्रेय ब्रॅडमन ह्यालाच आहे. हे कसोटीचे सामने पुरे होऊन इंग्लंडचा पूर्ण धुव्वा उडाला तेव्हां तेथें प्रसिद्ध झालेल्या एका नियतकालिकांत एक असें चित्र काढिलें होतें कीं, ब्रॅडमन यानें आपल्या हातांत आडवी

बॅट धरली आहे व त्यावर टेस्ट मॅचमधील इंग्लंडचे सर्व खेळाडू रांकेनें उभे राहिले आहेत! ब्रॅडमननें आपल्या बॅटवर इंग्लंडच्या सर्व खेळाडूंना लहान मुलांप्रमानें लीलेनें धारण केल्याचें चित्र काढून त्या चित्रकारानें ब्रॅडमनच्या क्रिकेट-पाटवाचें किती थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे बरें! इंग्लंडमध्यें प्रचंड विजय मिळवून ऑस्ट्रेलियन टीम जेव्हां मायभूमीला परत जावयास निघाली तेव्हां त्यांना जी बोळवणीची मेजवानी देण्यांत आली त्या प्रसंगीं इंग्लंडांतील सुप्रसिद्ध नाटककार सर जेम्स बॅरी यांनीं आपल्या विनोदी भाषणांत ब्रॅडमन यास 'मिस्टर बॅडमन' म्हणून संबोधिलें व म्हटलें कीं, "मिस्टर 'बॅडमन' यास नॉट ऑउट राहण्याची इतकी सवय झालेली दिसते कीं, त्याची बोट ऑस्ट्रेलियाला पोंहचल्यावर देखील तो बोटींतून 'आउट' न होतां डेकवरच इकडून तिकडे फिरत राहील कीं काय अशी मला भीति वाटूं लागली आहे!" यावरून ब्रॅडमन यानें इंग्लंडांतील सामन्यांत किती असामान्य क्रीडाचातुर्य प्रकट केलें असेल व इंग्लंडमधील खेळाडूंच्या अंतःकरणांत त्यानें केवढी दहशत बसविली असेल याची कल्पना करतां येते. लीड्स येथें टेस्ट मॅच सुरू असतांना त्यांत ब्रॅडमननें जास्त धावा करूं नयेत म्हणून एका उपद्व्यापी इंग्रजानें ब्रॅडमनला एक निनांवी टेलिग्राम पाठविला, त्यांत पुढील मजकूर होता: "तुझ्या घराला आग लागली असून तुझी प्रिया तुला तातडीनें भेटूं इच्छिते." अर्थात्, या तारेचा ब्रॅडमनच्या मनावर कांहीं एक परिणाम झाला नाहीं. योगायोग असा कीं, त्याच दिवशीं संध्याकाळीं ब्रॅडमनला आणखी एक टेलिग्राम आला. त्यांत एका ऑस्ट्रेलियन धनिकानें ब्रॅडमनला १००० पौंड बक्षिस देऊं केले होते. सुदैवानें हा टेलिग्राम बनावट नव्हता व ब्रॅडमनला ही रक्कम

खरोखरीच मिळाली. १९३१ सालीं दक्षिण आफ्रिकेंतील टीमनें ऑस्ट्रेलियाला भेट दिली त्या वेळीं ब्रॅडमननें लागोपाठ प्रत्येक सामन्यांत २२६, ११२, व १६७ धावा काढून त्यांचें अभिनव पद्धतीनें स्वागत केलें !

## लारवुड आणि बॉडी-लाइन बोलिंग

१९३० हें साल ब्रॅडमनच्या आयुष्यांत संस्मरणीय होऊन राहिलें आहे. परंतु १९३२-३३ हा काल क्रिकेटच्या इतिहासांतच चिरस्मणीय होऊन राहिला आहे. कारण ह्याच कालांत इंग्लंडमधील सुप्रसिद्ध गोलंदाज लारवुड यानें जार्डिनच्या नेतृत्वाखालीं आपल्या गोलंदाजीच्या कुलपी गोळ्यांनीं ऑस्ट्रेलियन खेळाडूंचीं तंगडें शेकलीं, बोटें पिंजून टाकलीं, छातीच्या बरगड्या मोडून टाकल्या, डोकीं फोडलीं व अशा रीतीनें ऑस्ट्रेलियन लोकांचा पराभव करून त्यांच्या अस्थि ( येथें तरी Ashes बद्दल अस्थि हा शब्द वापरावयास हरकत नाहीं. ) इंग्लंडला परत आणल्या व क्रिकेट-क्षेत्रांत मोठेंच वादळ निर्माण केलें. 'बॉडी-लाइन बोलिंग' म्हणजे 'शरीरयष्टिप्रत-गोलंदाजी' हा एक नवीन शब्द ह्याच काळांत अस्तित्वांत येऊन रूढ झाला. ह्याच काळांत बरेचसे खेळाडू एकाएकीं लेखक बनले. ज्यांनीं हातांत बॅट घेऊन फक्त क्रीडाक्षेत्रांत प्रवेश करावा त्यांनीं आपल्या हातांत लेखणी धरली व साहित्य-क्षेत्रांत प्रवेश करून इतका धुमाकूळ मांडला कीं, कांहीं दिवसपर्यंत वर्तमानपत्रांत 'बॉडी-लाइन'व्यतिरिक्त दुसऱ्या महत्त्वाच्या बातम्याच येईनाशा झाल्या ! क्रिकेटपटूंच्या मुलाखतीवर मुलाखती प्रसिद्ध होऊं लागल्या. ज्या क्रिकेटच्या खेळामुळें ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहतींचे परस्परांशीं असलेले तुटक संबंध अधिक

जिव्हाळ्याचे होऊं लागले होते ते ह्या लारवुड-प्रकरणामुळें दुरावूं लागतात कीं काय अशीहि कित्येकांस भीति वाटूं लागली. क्रिकेट-च्या सामन्यामुळें देशांदेशांमधील सलोखा कमी होऊन वैमनस्य मात्र वाढतें म्हणून हे राष्ट्रांतरीय सामने एक फतवा काढून एकदम बंद करून टाकावे असा जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनीं सल्ला दिला ! अमेरिकन वसाहतींप्रमाणें बॉडी-लाइनचें निमित्त पुढें करून ऑस्ट्रेलिया देखील इंग्लंडविरुद्ध बंड करून स्वतंत्र होते कीं काय, अशी भीति वाटावी इतका या वादाचा वणवा ह्या दोन देशांमध्यें त्या वेळीं भडकला होता. पण जॅक हॉब्ज यासारख्या खऱ्या खिलाडू वृत्तीच्या खेळाडूंनीं बॉडी-लाइन गोलंदाजीचा निषेध करून हा द्वेषाग्नीचा वणवा लवकरच शांत केला. परंतु ह्या वणव्यांत लारवुडची आहुति पडल्यावांचून राहिली नाहीं. कारण तेव्हांपासून लारवुड यास टेस्ट मॅचमधून खड्यासारखे वगळण्यांत आलें. आपलें बोट दुखवल्यामुळें आपणास मॅचमध्यें खेळणेंच शक्य नव्हतें असें प्रसिद्ध करून लारवुड यांनीं आपलें समाधान करून घेतलें, परंतु अशा रीतीनें बोटें मोडण्याखेरीज त्याच्या हातांत दुसरें कांहीं राहिलें नव्हतें हें वाचकांनीं तेव्हांच ताडलें.

## लारवुड विरुद्ध ब्रॅडमन

लारवुड हे आज क्रिकेट-क्षेत्रांतून अस्तंगत झाल्यासारखेच आहेत. (नाहीं म्हणायला मुंबईच्या गेल्या चौरंगी सामन्यांत ते थोडेसे लुक-लुकले, पण चमकले नाहींत !) पण १९३२–३३ या वेळच्या टेस्ट मॅचिसमध्यें जार्डिन यांनीं लारवुडच्याच जोरावर ऑस्ट्रेलियन खेळाडूंचे अस्थिपंजर खिळखिळे करून टाकून, त्यांस धूळ चारली यांत शंका नाहीं. ऑस्ट्रेलियन खेळाडू हे एकंदरींत लेगच्या बाजूला लंगडे असल्याचें पाहून, जार्डिन यानें लारवुडच्या बळावर त्यांच्याविरुद्ध

'लेग थिअरी' अमलांत आणली व त्यांचा त्यानें धुव्वा उडविला. पॉनस्फोर्ड व किपॅक्स यांसारखे झुंजार खेळाडू लेग स्टंपच्या बाजूला दुर्बल ठरल्यामुळें, लारवुडनें त्यांच्या लेगकडील यष्टि उडविण्याचा सपाटाच चालविला होता. खरी गोम अशी होती कीं, ही 'लेग थिअरी' मुख्यत्वेंकरून ब्रॅडमनच्या विरुद्ध योजण्यांत आली होती. दुर्दैवानें पहिल्या कसोटीच्या सामन्यांत ब्रॅडमन आजारी पडल्यामुळें त्याला घेण्यांतच आलें नाहीं. परंतु दुसऱ्या टेस्टमध्यें एक धाव काढण्यापूर्वीच ब्रॅडमनची दांडी उडाल्यामुळें लारवुडची गोलंदाजी अचूक लागू पडली याबद्दल जार्डिन व लारवुड या दोघांसहि अत्यानंद झाला. पण ब्रॅडमन इतका वस्ताद कीं, त्यानें दुसऱ्याच इनिंगमध्यें १०३ धावा काढल्या व शेवटपर्यंत नॉट ऑउट राहिला! ऑस्ट्रेलिया-मध्यें ब्रॅडमनबद्दल लोकांस जें विलक्षण कौतुक व प्रेम वाटतें तें जार्डिन यांस बिलकुल सहन झालें नाहीं. ब्रॅडमनवरची लोकांची अंधभक्ति ही ऑस्ट्रेलियांतील क्रिकेटच्या खेळाला मोठी विघातक होऊन बसली आहे असें जार्डिन यानें आपलें मत नमूद करून ठेविलें आहे. लार-वुडच्या अचूक पण शरीरानुरोधी गोलंदाजीमुळें १९३२–३३ सालीं इंग्लंडनें जय मिळविला ही गोष्ट खरी; परंतु याला खरें कारण म्हणजे ब्रॅडमन व वुडफुल यांचें आजारीपण हें होय ही गोष्ट खुद्द जॉर्डिन यानेंहि अप्रत्यक्षपणें कबूल केली आहे. उरलेल्या खेळाडूंमध्यें फिंगल्टन-व्यतिरिक्त कोणालाहि लारवुडसमोर उभें राहण्याची छाती होईना. त्यामुळें ऑस्ट्रेलियन खेळाडूंचें धैर्य खचलें व त्यांचा पराभव झाला. परंतु लारवुडसारख्या जगांतील अत्यंत फास्ट बोलरच्या बोलिंगला सेंचरी काढून व नॉट-ऑउट राहून ब्रॅडमन यानें आपलें व्यक्तिविशिष्टत्व व खेळांतलें धुरीणत्व कायम राखलें ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

## ब्रॅडमन : ऑस्ट्रेलियाचा विजयी कर्णधार

नुकतेच ऑस्ट्रेलियामध्यें, इंग्लंड व ऑस्ट्रेलिया यामध्यें कसोटीचे सामने झाले. त्यांत ऑस्ट्रेलियानें इंग्लंडवर जो जय मिळविला त्याचें सर्व श्रेय ब्रॅडमन यासच दिलें पाहिजे. या वेळीं ऑस्ट्रेलियन टीमचें नेतृत्व ब्रॅडमन यांजकडे असल्यामुळें विजयाचें सर्व श्रेय त्याजकडे ओघानेंच जातें; परंतु निव्वळ टीमचा कर्णधार म्हणून त्याजकडे हें श्रेय जात नसून, त्यानें शेवटच्या तिन्ही टेस्ट मॅचिसमध्यें जीं शतकें केलीं त्यामुळेंच विजयश्रीनें त्याला माळ घातली हें लक्षांत ठेवावयास पाहिजे. पहिल्या दोन कसोटीच्या सामन्यांत पाऊस इंग्लंडच्या मदतीला धावून आल्यामुळें, इंग्लंडचा जय झाला. कसोटीच्या दुसऱ्या सामन्यांत पावसामुळें ऑस्ट्रेलियाची फारच लेधा उडाली व त्यांनीं ११ वुइकेट्सचा मारा खाल्ला. वस्तुतः या सामन्यांत पावसानेंच ऑस्ट्रेलियाला झोडपलें होतें. परंतु मुंबईच्या टाइम्सनें त्याचें रूपांतर इंग्लंडनें ऑस्ट्रेलियाला झोडपलें असें करून इंग्रज खेळाडूंची भरमसाट स्तुति केली! परंतु ती लवकरच आंगलट येईल याची त्याला कल्पना आली नाहीं. कारण पुढील लागोपाठ तिन्ही सामन्यांत इंग्लंडचा पराभव होऊन शेवटच्या सामन्यांत तर इंग्लंडलाच ११ वुइकेट्सचा मारा खावा लागला! इंग्लंडमधील एका नियतकालिकानें इंग्लंडच्या ऑस्ट्रेलियांतील या सफरीचें वर्णन करतांना 'खुज्या लोकांची राक्षसांवर स्वारी' असे उद्गार काढले आहेत! यावरून पहिल्या दोन सामन्यांतील इंग्लंडला मिळालेला विजय हा खेळाडूंच्या पराक्रमावर अधिष्ठित झालेला नसून, इंग्लंडवर दयेनें आर्द्र अंतःकरण झालेल्या वरुणदेवतेच्या कृपाप्रसादावरच अधिष्ठित झाला होता हें सिद्ध होतें. कसोटीचे जे एकंदर पांच सामने झाले त्यांत ब्रॅडमन याची पहिल्या दोन सामन्यांत

अगदीं केविलवाणी स्थिति झाली. कारण पहिल्या सामन्यांतील दोन डावांत त्यानें अनुक्रमें ३८ व ० धावा काढल्या व दुसऱ्या सामन्यांतील दोन डावांत त्याच्या अनुक्रमें ० व ८२ अशा धावा झाल्या. ८२ धावा म्हणजे इतर खेळाडूंच्या दृष्टीनें वाईट नाहींत. परंतु ब्रॅडमनला त्या फारशा भूषणावह नाहींत. चांदीचे दागिने भिकाऱ्याच्या अंगावर शोभून दिसतील; पण हिरेमाणकांनीं मढविलेल्या आपल्या शरीरावर एखाद्या लक्षाधीशानें ते धारण करावे म्हणजे त्याचें दिवाळेंच निघालें आहे म्हणून समजावें. परंतु आपल्यावरील हे डाग ब्रॅडमननें पुढील तिन्ही सामन्यांत २७०, २१२ व १६९ अशा धावा काढून साफ धुऊन टाकले एवढेंच नव्हे, तर ती जागा विजयचिन्हांनीं सुशोभित केली.

## ब्रॅडमनच्या यशाची मीमांसा

ब्रॅडमन याचें हल्लीं वय २९ वर्षांचें आहे. तिशी उलटण्याच्या आंत टेस्ट मॅचचा कॅप्टन होण्याचें भाग्य दुसऱ्या कोणाच्या वाट्यास आलें असेल असें वाटत नाहीं. ब्रॅडमन याच्या वाट्यास हें भाग्य आलें असें म्हणण्यापेक्षां त्यानें तें आपल्या पराक्रमाच्या जोरावर मिळविलें असेंच म्हटलें पाहिजे.

अगदीं सुरुवातीपासून क्रिकेटच्या क्षेत्रांत ब्रॅडमन यानें हें जें अभूतपूर्व यश मिळविलें त्याबद्दल केवळ आश्चर्य प्रकट करण्यापेक्षां तें यश त्यानें कोणत्या गुणसमुच्चयावर मिळविलें याची मीमांसा करणेंच अधिक इष्ट होईल. ब्रॅडमनचा पहिला गुण म्हणजे त्याचें क्रिकेटमधील नैसर्गिक नैपुण्य होय. हा गुण अर्थातच दैवी किंवा नैसर्गिक किंवा आनुवंशिक म्हटला पाहिजे. ब्रॅडमनचे काका

हे मोठे क्रिकेट-पटु होते व त्यांनींच ब्रॅडमनला क्रिकेटचें बाळकडू पाजलें असें म्हणावयास हरकत नाहीं. ह्या चुलत्या-पुतण्यांनीं क्रीडाक्षेत्रावर जी एक अजब मर्दुमकी गाजविली ती या ठिकाणीं सांगण्यासारखी आहे. ब्रॅडमनचे काका जॉर्ज व्हॉटमन हे बोरॉल क्रिकेट टीमचे कॅप्टन होते व त्याची शेजारचाच गांव जो मॉसव्हेल त्याच्याशीं मॅच व्हायची ठरली होती. सामना अटीतटीचा होता; पण मॅचचे नियम चमत्कारिक होते! दर शनिवारीं दोन ते सहा वाजेपर्यंत अशा रीतीनें ही मॅच खेळली जावयाची होती. दोन्ही बाजूचे दोन दोन डाव पुरे होईपर्यंत मॅच बंद करावयाची नसल्यामुळें ती किती आठवडे चालेल याचा नेम नव्हता. पहिल्या शनिवारीं खेळास सुरुवात झाली. ब्रॅडमनच्या काकांनीं टॉस् जिंकला, व त्यांनीं आपल्या पुतण्यास पहिल्यानें खेळावयास पाठविलें. पुतण्यानें संध्याकाळपर्यंत धीमेपणानें खेळ खेळून ८० धावा केल्या व त्या दिवसाचा खेळ आटपला आणि टीम आपल्या गांवीं परत आली. पुढच्या शनिवारीं टीम मॉसव्हेल येथें जाऊन पुन्हा खेळास सुरुवात झाली. पुतण्यानें बाद न होतां संध्याकाळपर्यंत २७९ धांवा काढल्या; दरम्यान काकांनीं आपला आंकडा १०० चे आसपास नेला होता, व फक्त एकच गडी बाद झाला होता. तिसऱ्या शनिवारीं पुतण्यानें बरोबर ३०० धावा काढल्या व बॉउंडरीवर त्याचा कॅच गेला. त्या दिवशीं संध्याकाळीं ६०० धावा होऊन ६ गडी बाद झाले. पण काका अद्याप नॉट ऑउटच होते व त्यांच्या २२० धावा झाल्या होत्या. त्याच्यापुढच्या शनिवारीं एकहि धाव काढण्याच्या आधींच काकांची दांडी उडाली. अशा रीतीनें हा सामना सहा शनिवार म्हणजे दीड महिना चालला होता. त्यांत शेवटीं ब्रॅडमनच्या

पक्षानें प्रतिपक्षास अकरा वुइकेट्सचा मारा दिला! ह्या हकीगती-वरून ब्रॅडमनचें क्रिकेटमधील नैपुण्य आनुवंशिकच कसें होतें हें दिसून येईल. परंतु केवळ आनुवंशिक गुणावरच ब्रॅडमन यास लोकोत्तर यश मिळवितां आलें नसतें.

## ब्रॅडमनची अभ्यासु वृत्ति

त्याकरितां सतत परिश्रम व अभ्यास यांची आवश्यकता होती. ब्रॅडमनला क्रिकेटचे धडे कोणीच घालून दिले नाहींत. तो स्वतःच क्रिकेट शिकला. लहानपणीं तो एकटाच क्रिकेट खेळत असे. पत्त्यामध्यें कांहीं डाव असे आहेत कीं, ते एकट्यानेंच खेळतां येतात. परंतु क्रिकेट एकट्यानेंच खेळणें कसें शक्य आहे? पण क्रिकेटमधील अशक्य समजल्या जाणाऱ्या गोष्टी अगदीं लहानपणापासून शक्य करून दाखवावयाच्या असें ब्रॅडमननें ठरविलेलें दिसतें व एकट्यानें क्रिकेट खेळणें ही गोष्ट त्यांतलीच आहे असें त्यानें सिद्ध करून दाखविलें असें म्हणावयास हरकत नाहीं. ब्रॅडमनची बॅट म्हणजे एक झाडाची जाड काठीच्या आकाराची एक लहानशी फांदी! घराजवळच्या मोकळ्या जागेंत एक विटांची भिंत होती. ब्रॅडमन या भिंतीपासून कांहीं अंतरावर उभा राहून या भिंतीवर चेंडू मारी व तो उसळून परत आला कीं, आपल्या हातांतील काठीरूपी बॅटनें त्याचे टोले लगावीत असे. केव्हां केव्हां ब्रॅडमन भिंतीऐवजीं वाटोळ्या लोखंडी गजांवरच चेंडू मारून तो झेलीत असे. या सरावामुळें ब्रॅडमनला अगदीं लांबूनहि अचूक नेम मारतां येऊं लागला. पुढें इंग्लंडमध्यें एकदां त्यानें अगदीं बाउंडरीवरून नेम मारून मधली दांडी उडविली व त्याला हॉब्जचा

रन ऑउट घेतला. असले लांबून दांडी उडविण्याचे चमत्कार त्यानें अनेकदां करून दाखविले आहेत. बॅटिंगचें शिक्षण हें वर सांगितल्या-प्रमाणें स्वतःच झाडाच्या फांदीनें चेंडू मारून त्यानें मिळविलें आहे. कोचिंग किंवा पद्धतशीर शिक्षण असें ब्रॅडमनला कधींच मिळालेलें नाहीं. इंग्लंडमध्यें कोचिंगचें वेड फारच फैलावलें आहे असें सेवेल याचें मत आहे. त्यांतूनहि कोचिंगकरितां तिकडे खेळाडू नेण्याचा जो हल्लीं प्रघात पडूं लागला आहे तो हिंदुस्थानाला भूषणावह असला तरी एकंदरींत आचरटपणाचाच वाटतो.

## ब्रॅडमनचे आवडते खेळाडू

परिश्रमांबरोबरच अभ्यासु वृत्ति हा ब्रॅडमनचा मोठा गुण आहे. जॅक हॉब्ज्, सट्क्लिफ, हॅमंड,' मॅकार्टने यांचा खेळ पाहून आपणाला किती तरी फायदा झाला असें खुद्द ब्रॅडमन यानें स्वतः कबूल केलें आहे. " To my mind, watching the 'class' player is one of happiest and most effecive means of Learning the art of Cricket." ब्रॅडमनला धुलीप-सिंग यांची खेळण्याची शैली अतिशय आवडते. धुलीपच्या उत्कृष्ट बॅटिंगबद्दल ब्रॅडमननें त्यांची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. ब्रॅडमनचा दुसरा मोठा गुण म्हणजे त्याची दुर्दमनीय महत्त्वाकांक्षा. क्रिकेटच्या खेळांत नांव कमावण्याचें त्यानें अगदीं लहानपणापासून ठरविलें व त्या दृष्टीनें प्रयत्न करण्याचा त्यानें कधीं आळस केला नाहीं.

## ब्रॅडमनचा धीमेपणा

या महत्त्वाकांक्षेला धीमेपणाची व विचाराची जोड दिली गेल्या-

मुळें त्याची महत्त्वाकांक्षा फलद्रूप व्हावयाला फारच मदत झाली. दोनदोनशें, तीनतीनशें धावा काढणें हा ब्रॅडमन यास तळहातचा मळ वाटतो. आमचे खेळाडू शंभराचे आसपास आले कीं, एकदम गोंधळल्यासारखे होतात. कोणाला ९५ पासून १०० पर्यंत आंकडा न्यावयास एक तास लागतो, तर कोणी ९९ जवळ आले कीं बहुधा आउट होतात. सुदैवानें शंभराचा आंकडा गाठलाच तर कृतकृत्य झाल्यासारखें वाटून एखाद्या लहान मुलालाहि शोभणार नाहीं अशा पद्धतीनें बॅट हवेंत फिरवावयाला लागतात व लगेच कॉट ऑउट होतात ! मनुष्याचें आयुष्य शंभर वर्षांचें धरल्यामुळें १०० धावा काढल्यानंतर आउट न झाल्यास देवाघरचे आपण अपराधी ठरूं अशी आपल्या खेळाडूंची समजूत दिसते. नाहीं तर शंभर धावा मोठ्या गमतीनें काढणाऱ्या नायडूंना एकदांहि दोनशें धावा कां काढतां येऊं नयेत तें समजत नाहीं. १९२९-३० सालीं ऑस्ट्रेलियांत न्यू साउथ वेल्स विरुद्ध क्वीन्सलँड यामध्यें जो क्रिकेटचा सामना झाला त्यांत ब्रॅडमननें शेवटपर्यंत बाद न होतां ४५२ धावा काढून जागतिक विक्रम करून ठेविला आहे. धीमेपणाखेरीज ही गोष्ट कधींहि शक्य नाहीं. परंतु धीमेपणा म्हणजे एकहि धाव न काढतां तासन् तास खेळत राहणें नव्हे. तर शक्य तितक्या धावा काढून, भलत्याच वेळीं चेंडूचा फटकारा मारण्याचा मोह न होणें यालाच धीमेपणा म्हटलें पाहिजे. ब्रॅडमन यानें अगदीं पहिल्या बॉलला देखील बाउंडरी मारल्याचे दाखले आहेत. किंबहुना प्रत्येक बॉल आपणाला धाव काढण्याच्या दृष्टीनें मारतां आला पाहिजे असा ब्रॅडमनचा कटाक्ष आहे. परन्तु याचा अर्थ तिकडे गोलंदाजानें चेंडू फेकण्याकरितां हात वर केला कीं, इकडे टोला लगवायला बॅट वर

उचलली असा नव्हे. ब्रॅडमनला सुरुवातीला ही सवय होती; परंतु एकदां या सवयीमुळें पहिल्याच बॉलला आपली दांडी उडालेली पाहून ब्रॅडमननें स्वतःला नियम घालून घेतला कीं, गोलंदाजाच्या हातांतून चेंडू सुटेपर्यंत कोणत्या प्रकारचा टोला मारावयाचा हें केव्हांहि आगाऊ ठरवावयाचें नाहीं. (Motto- never make up your mind what to do with a bat before it is bowled and also gauge the pace of the wicket before you attempt a risky shot.) अर्थात् चांगल्या खेळाडूला कौशल्याबरोबर शारीरिक बळाचीहि आवश्यकता आहे. सुदैवानें ब्रॅडमन यास निसर्गानें पोलादासारखें मनगट व दणकट शरीर दिलें आहे. ब्रॅडमनचे पाय आकारानें अतिशय लहान असून खेळत असतांना त्यांची ;चाललेली हालचाल मोठी प्रेक्षणीय असते असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. ब्रॅडमननें आपले बूट ऑस्ट्रेलियाला नजर करावे, म्हणजे त्यांजकडे पाहून पुढील पिढयांना त्याच्यासारखें पायांचें चापल्य दाखविण्याची स्फूर्ति होईल असे उद्गार एका इंग्रज क्रिकेटपटूनें काढले आहेत. पण ब्रॅडमननें मिळविलेलें अपूर्व यश त्यानें केवळ आपल्या पायांवरच मिळविलेलें नाहीं. त्यांत पायांपेक्षांहि डोक्याचा भाग अधिक आहे. कोणत्याहि प्रकारचा गोलंदाज असो, त्यानें चेंडू फेकतांच तो कशा रीतीनें टोलकावितां येईल याचा निर्णय त्याचें डोकें क्षणाचाहि विलंब न लावतां देतें व त्याची आज्ञा त्याचे पाय आणि हात तत्काळ अमलांत आणतात. परंतु या सर्वांना मध्यवर्ती छाती असून तिच्या निधडेपणामुळेंच ब्रॅडमनला अगदीं सुरुवातीपासूनच एवढें यश मिळवितां आलें. ज्याला आपण नव्‍‌र्हसनेस किंवा सभा-कंप म्हणतों त्याचा ब्रॅडमनचे

ठिकाणीं लवलेश सुद्धां नाहीं, यासंबंधीं त्यानें स्वतःच जे उद्‌गार काढले आहेत ते लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणतोः—

"I am almost a total stranger to that species of nervousness common to most people whenever involved in an unusual happening." प्रसंग जितका अधिक आणीबाणीचा तेवढा ब्रॅडमन यास अधिक आनंद; परंतु या स्वभावाचा एक उलटा असा परिणाम झाला आहे कीं, सर्वसाधारण सामन्यामध्यें ब्रॅडमनला फारशा धावा काढतां येत नाहींत! परंतु खाजगी सामन्यांत शतकांवर शतकें लावून चुरशीच्या किंवा कसोटीच्या सामन्यांत हातांत भोपळा घेऊन येणाऱ्या इतर अनेक खेळाडूंपेक्षां ब्रॅडमन याचा हा दोष कांहीं वाईट नव्हे.

ब्रॅडमन यास ज्याला फॉरवर्ड गेम म्हणतात तो खेळणें आवडतें. क्वचित् प्रसंगीं स्लो बोलिंगला तो क्रीज सोडूनहि बराच बाहेर जातो. परन्तु त्याचा टोला कधींहि चुकत नसल्यामुळें त्याजवर आउट होण्याचा प्रसंग क्वचितच आला आहे. नाहीं म्हणायला ग्रिमेटनें मात्र ब्रॅडमनला असाच क्रीजच्या बाहेर बराच आणून एकदां आउट घेतलें होतें. इंग्लंडमधील सर्व खेळाडूंना बॅकवर्ड गेम खेळावयास शिकवीत असल्यामुळें इंग्लंडचें क्रिकेटच्या सामन्यांत बरेंच नुकसान झालें आहे असें पुष्कळांचें मत आहे.

## चतुरस्र खेळाडू

ब्रॅडमनच्या खेळांत दोष असा जवळ जवळ नाहींच. परंतु सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास त्याच्या बॅटिंगमध्यें एक दोष आढळतो व तो म्हणजे ऑफ स्टंपच्या बाजूला फेकलेला चेंडू त्याला मारतां येत नाहीं

हा होय. जेव्हां जेव्हां ब्रॅडमन कॉट ऑउट होतो तेव्हां तो बहुधा त्या बाजूस फेकलेल्या चेंडूलाच होतो. खेळण्याच्या धाटणीच्या दृष्टीनें त्याच्यांतला आणखी एक दोष म्हणजे पट्टा फिरवितांना बॅट आडवी धरणें हा होय. सुप्रसिद्ध गोलंदाज टेट यानें ब्रॅडमनला बॅट आडवी न धरण्याबद्दल एकदां मुद्दाम सूचना दिली होती; परंतु ब्रॅडमनला अशी बॅट करण्याची सवयच पडून गेली आहे. पण ब्रॅडमनचा टोला नेहमीं अचूक असल्यामुळें ह्या दोषापासून त्याचें नुकसान असें कधींहि झालेलें नाहीं. ब्रॅडमनला नेहमीं ओपनिंग बॅट्समन् म्हणून जावयाला आवडतें. परंतु एकदां दुर्दैवानें पहिल्यांदा जाऊन लगेच आउट झाल्यामुळें, तेव्हां-पासून नेहमीं त्याला एक गडी बाद झाला कीं पाठविण्यांत येतें. ब्रॅडमन हा उत्तम क्षेत्ररक्षक असून त्याला बोलिंगहि चांगलें टाकतां येतें. ब्रॅडमनला क्रिकेटइतकाच टेनिसहि चांगला खेळतां येतो व एकदां तर लवकर आउट झाल्यामुळें क्रिकेट सोडून टेनिसलाच वाहून घेण्याचें त्यानें ठरविलें होतें. परंतु क्रिकेटचे व टेनिसचे असे दोन्ही सामने जवळ जवळ एकाच वेळीं आल्यामुळें व दोन्ही सामन्यांना रजा देण्याचें त्याच्या वरिष्ठानें नाकारल्यामुळें ब्रॅडमननें अगोदर क्रिकेटचा सामना सुरू होणार होता म्हणून त्याकरितांच रजा घेतली व तेव्हांपासून टेनिसचा नाद त्यानें सोडून दिला. फुटबॉलमध्येंहि त्याची गति चांगली आहे. ब्रॅडमनचा स्वभाव अगदीं निगर्वी व साधा आहे. दारूला त्यानें अजूनपर्यंत स्पर्शहि केला नाहीं. त्याचा जन्म २७ ऑगस्ट १९०८ सालीं न्यू साउथ वेल्समध्यें कूटमुंड्रा येथें झाला. त्याला तीन बहिणी असून एक भाऊ आहे. त्याचें संबंध नांव डोनाल्ड जॉन ब्रॅडमन असें आहे हें पुष्कळांना माहीतहि नसेल.

---

# फिलिप स्नोडन

गेल्या महिन्याच्या १८ तारखेस लॉर्ड स्नोडन यांस काळजाच्या विकारानें एकाएकीं मृत्यु आला. त्यांच्या मृत्यूमुळें इंग्लंडच्या इतिहासांतील पहिल्या मजूर प्रधानमंडळांतला एक तत्त्वनिष्ठ व कडवा वीर नाहींसा झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. १९२४ सालीं अधिकारारूढ झालेल्या मजूरपक्षाची पुढें सहा-सात वर्षांच्या आंतच जी वाताहत झाली ती पाहण्याचें दुर्भाग्य स्नोडन यांस त्यांच्या हयातींतच आलें. १९३१ सालीं व्यापारी मंदीमुळें व वाढत्या बेकारी मुळें मजूरप्रधान-मंडळानें राजीनामा दिल्यावर राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यांत आलें. त्या वेळीं मजूर पक्षांतलि पुढाऱ्यांत फाटाफूट झाली व त्या पक्षाचें महत्त्व अजीबात नाहींसें झालें. मॅक्डोनाल्ड व थॉमस हे मजूर पक्षाशीं निमकहराम होऊन राष्ट्रीय पक्षाच्या नांवाखालीं हुजूर पक्षाला जाऊन मिळाले. स्नोडन यांनीं देखील राष्ट्रीय सरकारशीं कांहीं काळपर्यंत सहकार्य केलें; पण परिस्थितीशीं व विरुद्ध पक्षाशीं टक्कर देत असतांना



फिलिप स्नोडन

मजूर पक्षांत जी पांगापांग झाली ती पाहून स्नोडन हे वैतागानें किंवा निराशेनें एकाएकीं रंकाचे राव बनण्यास तयार झाले व उमराव होऊन लॉर्डांचे सभेंत बसूं लागले. व्यावहारिक जगांत रंकाचा राव बनण्यास भाग्य लागतें; परंतु इंग्लंडच्या राजकारणांत रंकाचा राव हें कर्तृत्व-शक्तीची वाढ खुंटल्याचें गमक समजलें जात असल्यामुळें तें पर्यायानें राजकीय अधःपाताचेंच लक्षण मानलें जातें. स्नोडन हे उमराव बनले त्या वेळीं त्यांनीं आपला राजकीय पराभव कबूल केला, असें म्हणा-वयास हरकत नाहीं. परंतु स्नोडन यांच्या राजकीय क्षेत्रांतील अपयशाला त्यांच्या पक्षांतील कांहीं प्रमुख व्यक्तींचें धरसोडीचें वर्तन व त्या वेळची इंग्लंडमधील राजकीय परिस्थिति जितकी कारणीभूत झाली तितकीच त्यांची स्वतःची तत्त्वनिष्ठाहि कारणीभूत झाली, असें आढळून येईल.

## स्नोडन यांचा करारी स्वभाव

स्नोडन यांच्या आजोबासंबंधीं अशी एक गोष्ट सांगतात कीं, त्यांची धर्मभ्रष्टता लक्षांत घेऊन, त्यांच्या शेवटच्या दुखण्यांत त्यांच्या कांहीं सनातनी हितचिंतकांनीं त्यांना आपल्या पापांचा झाडा देण्याचा उपदेश केला. तो ऐकून स्नोडन यांचे आजोबा म्हणाले, “ मित्रांनो, मरणोत्तर मी कोठें जाणार आहे याची मला कांहींच कल्पना नाहीं. मी माझें सर्व आयुष्य धर्मबाह्य वर्तन करण्यांतच घालविलें आहे. अशी वस्तुस्थिति असतां आयुष्याच्या शेवटच्या क्षणीं केवळ माझ्या आत्म्याचें रक्षण करण्याकरितां माझ्या वर्तनक्रमांत एकाएकीं बदल करावयाला मी बिलकुल तयार नाहीं. कारण त्यामुळें मी भित्रा ठरेन. म्हणून आयत्या वेळीं कोणत्याहि प्रकारची माघार न घेतां मी प्राण सोडणार.

मरणोत्तर मला जीं दुःखें सहन करावीं लागतील तीं बिनतक्रार सहन करण्याची माझी तयारी आहे.” आजोबांचा हा निर्भयपणा व करारी बाणा त्यांच्या नातवांत पुरेपूर उतरलेला होता. फरक एवढाच कीं, आजोबांच्या धर्मलंडपणाचें रूपांतर नातवाच्या धर्मप्रवणतेंत झालें होतें. राजकीय बाबतींत स्नोडन हे जो कडवेपणा दाखवीत तो वस्तुतः त्यांच्या मूळ धार्मिक मनोवृत्तीचाच परिणाम होता.

## राजकारणाचें बाळकडू

स्नोडन यांचा जन्म यॉर्कशायर परगण्यांतील एका अत्यंत गरीब अशा कुळांत झाला, व त्यांना आपल्या आयुष्याचे बहुतेक दिवस अतिशय दारिद्र्यांत घालवावे लागले. स्नोडन यांचे वडील हे राजकारणांत उदारमतवादी होते व आपल्या मुलाकरवीं त्यांनीं प्रागतिक पुढाऱ्यांच्या राजकीय भाषणांतले बरेचसे निवडक उतारे पाठ करून घेतले होते. निवडणुकी आल्या कीं, छोट्या स्नोडनच्या बहिणी प्रागतिक पक्षाची निशाणी असणारी पिवळी फीत त्याच्या कोटावर लावून कोठें गर्दी जमली कीं, त्याला हीं पाठ केलेलीं भाषणें म्हणावयास लावीत. पुढें पार्लमेंटांत अस्खलित वक्तृत्व गाजविण्याला त्यांना हे बाळपणीचे पाठ फार उपयोगी पडले असले पाहिजेत. त्यांनीं पार्लमेंटांत जें पहिलें भाषण केलें तें फार अस्खलित, मुद्देसूद व परिणामकारक झालें असें त्या वेळच्या बहुतेक सभासदांचें मत आहे. परंतु स्नोडन यांच्या भाषणानंतर लगेच स्मिथ (नंतरचे लॉर्ड बर्कनेहेड्) यांनीं जें। भाषण केलें तें अधिक सरस व सफाईदार झाल्यामुळें स्नोडन यांच्या भाषणाला थोडेंबहुत वैगुण्य आलें; नाहीं तर तें अधिकच संस्मरणीय झालें असतें.

## सुरुवातीचे व्यवसाय

स्नोडन यांनीं सुरुवातीला आपल्या गांवच्या शाळेंत मास्तरकीचें काम केलें. नंतर एक-दोन वर्षें त्यांनीं एका विमा कंपनींत काढलीं. पुढें एक परीक्षा देऊन (या परीक्षेंत ते पहिल्या वर्गांत आले) ते कस्टम खात्यांत शिरले. पुढें फडणीस ह्या नात्यानें आपण ह्या व तत्सदृश इतर खात्यांचे सर्वांत वरिष्ठ अधिकारी होऊं हें त्यांना त्या वेळीं खरें तरी वाटलें असतें काय? ह्या खात्यांत काम करीत असतांना स्नोडन यांच्या कर्तव्यनिष्ठेचें एक उदाहरण उद्धृत करण्यासारखें आहे. आपल्या कामानिमित्त फिरत असतां एका मैदानांत पक्ष्यांची पारध करीत असलेली एक लहानशी टोळी त्यांच्या दृष्टीस पडली. स्नोडन ह्यांनीं ह्या टोळींतील लोकांजवळ परवानगी-पत्रकें (लायसेन्स) पाहावयास मागितलीं. टोळीच्या नायकाव्यतिरिक्त तीं कोणाजवळहि नव्हतीं. टोळीचे नायक वॉल्टर लॉंग हे फडणीस खात्यांतील एक बडे अधिकारी होते. त्यांनीं स्नोडन यांस आपली पायरी ओळखून वागण्यास सांगितलें व पर्यायानें नोकरीवरून काढून टाकण्याचीहि धमकी दिली. परंतु स्नोडन कांहीं कच्च्या दिलाचे नव्हते. त्यांनीं लॉंग यांच्या धमकीची क्षिति न बाळगतां बेपरवाना पारध करीत असल्याबद्दल वरिष्ठांकडे रिपोर्ट केला व आपणाला नोकरी सोडण्याचा हुकूम केव्हां येतो याची वाट पाहत बसले. पण पुढील सर्व प्रकार स्नोडन यांच्या अपेक्षेपेक्षां अगदीं निराळाच झाला. बिन-परवाना पक्ष्याची पारध केल्याबद्दल टोळींतील दर एक माणसावर खटला भरण्यांत येऊन प्रत्येकाला पांच-पांच पौंड दंड करण्यांत आला व आपलें काम उत्तम रीतीनें बजावल्याबद्दल स्नोडन यांस रेव्हिन्यू

बोर्डाच्या अध्यक्षांकडून पांच पौंड बक्षिस देण्यांत आले! पुढें वीस वर्षांनंतर पार्लमेंटांत लॉग यांस ह्या प्रसंगाची आठवण करून देण्यांत आली तेव्हां ते विनोदानें म्हणाले कीं, "स्नोडन यांनीं परवाने पाहावयास मागितले याचा आम्हांला संताप आला नाहीं; परंतु त्यांच्या आगमनामुळें आम्हीं हेरून ठेवलेले सर्व पक्षी उडून गेले याचेंच आम्हांला अधिक दुःख झालें!"

## पाय मोडल्यामुळें डोक्यांत झालेले फरक

स्नोडन हे सोशॅलिस्ट कसे बनले यासंबंधींची हकीकत मोठी मनोरंजक आहे. स्नोडन ह्यांस आपल्या नोकरीनिमित्त ठिकठिकाणीं फिरावें लागत असे. हा प्रवास ते सायकलीवरून करीत. एकदां अपघातांत सापडून स्नोडन सायकलीवरून खालीं पडले व त्यांच्या पायास इतकी मोठी इजा झाली कीं, एक वर्षपर्यंत त्यांना घराबाहेर जातां आलें नाहीं. शिवाय तेव्हांपासून त्यांचा पाय कायमचा अधु झाल्यामुळें काठीचा आधार घेतल्याखेरीज चालणें त्यांना अशक्य होऊन बसलें; परंतु ह्या आजारपणांतच ते एक लढवय्ये, समाजसत्तावादी (सोशॅलिस्ट) बनले. त्या गांवच्या प्रागतिक क्लबातर्फें स्नोडन यांस समाजसत्तावादावर एक निबंध वाचून दाखविल्याबद्दल विनंति करण्यांत आली. या निबंधलेखनाची तयारी करण्याकरितां स्नोडन यांनीं जेव्हां समाजसत्तावादाच्या अभ्यासाला सुरुवात केली तेव्हां आपण समाजसत्तावादीच असल्याचें त्यांस आढळून आलें!

## रामावांचून रामायण

परंतु स्नोडन यांचा समाजसत्तावाद हा त्यांच्या उदारमतवादाचा एकांतिक प्रकार होता. गरीब कुळांत जन्म, दारिद्र्यांत गेलेलें बाळपण,

मजुरांच्या वस्तींत व सहवासांत घालविलेलें आयुष्य व वडिलांनीं उदारमतवादाचें पाजलेलें बाळकडू ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे स्नोडन यांच्या संस्कारक्षम मनावर समाजसत्तावादाचा अनुकूल परिणाम होणें अगदीं स्वाभाविक होतें असेंच म्हणावें लागतें. परंतु ह्या समाजसत्तावादाची इमारत केवळ भूतदयेवरच अधिष्ठित झाली होती, त्यांत क्रान्तिकारक असें कांहींच नव्हतें. वर्गकलह, गुप्तमंडळें, संप, अडवणुकीचें धोरण, बंडाची तयारी, कामगारवर्गाची तात्पुरती अनियंत्रित सत्ता, इत्यादि क्रांतिकारक सूत्रांचा स्नोडन यांच्या राजकीय तत्त्वज्ञानांत नुसता अभाव होता एवढेंच नव्हे, तर समाजसत्तावादाचें हें तंत्रच स्नोडन यांस सर्वथैव नापसंत होतें. आपण कार्ल मार्क्सचे ग्रंथ अजीबात वाचलेले नाहींत असें ते प्रामाणिकपणें सांगत असत. ह्यावरून त्यांचा समाजसत्तावाद हा किती निर्लेप होता हें कळून येतें. कारण कार्ल मार्क्सखेरीज समाजसत्तावाद आणि रामावांचून रामायण यांत कांहींच फरक नाहीं. स्नोडन यांच्या समाजसत्तावादाच्या कार्यक्रमांत मजुरांच्या कामाचे तास कमी करणें, याजकरितां कमी भाड्याच्या चाळींची व्यवस्था करणें, त्यांचें आरोग्य सुधारण्याविषयीं योजना करणें व त्यांच्या शिक्षणाची सोय करणें वगैरे गोष्टी होत्या. ह्या कार्यक्रमांतील मोठ्यांत मोठी उडी म्हणजे कोळशाच्या खाणी, व मोठमोठे कारखाने हे राष्ट्राच्या मालकीचे करणें ही होय. परंतु ही योजना सनदशीर मार्गानें म्हणजे पार्लमेंटाच्या द्वारेंच अमलांत आणावयाची; त्याकरतां युद्ध करावयाचें तें पार्लमेंटांत करावयाचें! यावरून ही योजना अमलांत आणणें कितपत शक्य होतें याची कल्पना करतां येईल.

## स्नोडन यांची लढाऊ वृत्ति

स्नोडन हे शांततावादाचे कट्टे पुरस्कर्ते असूनहि त्यांच्या समाजसत्ता-

वादाच्या धोरणामुळें त्या वेळीं इंग्लंडमधील सर्वसाधारण जनता त्यांस क्रांतिकारकच समजत असे; परंतु याची उपपत्ति लावणें अगदीं सोपें आहे. ज्या काळांत स्नोडन हे सोशॅलिस्ट बनून समाजसत्तावादाचा पुरस्कार करूं लागले तो काळ आपण लक्षांत घेतला पाहिजे. विसावें शतक सुरू होण्याच्या पूर्वीच स्नोडन हे समाजसत्तावादाचे प्रचारक बनले व त्याकरितां १८९३ सालीं त्यांनीं आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामाहि दिला. सतत तेरा वर्षें त्यांना आपला उदरनिर्वाह फक्त समाजसत्तावादावर व्याख्यानें देऊन व तत्संबंधीं लेख लिहून जे काय पैसे मिळत त्यावर करावा लागला. ज्या वेळीं समाजसत्तावाद हा शब्द देखील सर्वसाधारण जनतेच्या परिचयाचा झाला नव्हता. त्या वेळीं स्नोडन हे भांडवलशाहीचा पाडाव व सामाजिक क्रान्तीची आवश्यकता प्रतिपादन करीत असल्यामुळें लोकांना त्यांचें तत्त्वज्ञान ज्वलज्जहाल वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. समाजसत्तावादी म्हणजे श्रीमंत लोकांची कत्तल करून त्यांची मालमत्ता गोरगरिबांस वाटून टाकणारी दरवडेखोरांची टोळी असा त्या वेळीं सर्वसाधारण लोकांचा समज होता. हा पुष्कळ लोकांमध्यें अजूनहि आढळतो; मग त्या वेळीं तो किती भयंकर प्रमाणांत असला पाहिजे याची कल्पनाच करणें बरें. वस्तुतः स्नोडन हे कार्ल मार्क्ससारखे केस पिंजारलेल्या व दाढी वाढविलेल्या अक्राळ-विक्राळ राक्षसासारखे दिसत नव्हते.

## वामन मूर्ति– मोठी कीर्ति

स्नोडन हे दिसण्यांत ठेंगू व चालण्यांत पंगु होते. त्यांची कृश शरीरयष्टि, हाडकुळा चेहरा व लंगडा पाय पाहून कोणालाहि त्यांची

भीति वाटण्याऐवजीं कींवच वाटण्याचा संभव अधिक. परंतु त्यांची मूर्ति जितकी मवाळ तितकीच त्यांची भाषणपद्धति जहाल होती. त्यांच्या भाषणांत मार्दव बिलकुल नव्हतें. अनुनय, तडजोड, खुलासे इत्यादि कुशल व धोरणी वक्त्याच्या ठिकाणीं असणाऱ्या गुणांचा स्नोडन यांच्या ठिकाणीं पूर्ण अभाव होता. जेवीन तर तुपाशीं, नाहीं तर उपाशी, अशी त्यांची वृत्ति होती. १९०६ सालीं ते जेव्हां पार्लमेंट-करितां मजूरपक्षातर्फे उभे राहिले तेव्हां त्यांच्याविरुद्ध अनेक प्रकारचे गैरसमज पसरविण्यांत आले. "स्नोडन हे पाखंडी आहेत, स्नोडन यांस सरकारी नोकरीवरून बडतर्फ करण्यांत आलें." अशा तऱ्हेच्या एक ना दोन, शेंकडों खोट्यानाट्या गोष्टी पसरविण्यांत आल्या. स्नोडन यांच्या स्नेह्यांनीं त्यांस ह्या खोट्या गोष्टींचा इन्कार करून आपली अब्रू साफ करून घेण्याचा अनेकवार उपदेश केला; परंतु त्या सर्वांस स्नोडन यांचें एकच उत्तर ठरलेलें होतें—"मी ही निवडणूक माझ्या वैयक्तिक गुणावरच लढविणार नसून, केवळ माझ्या राजकीय मतांवरच लढविण्याचें निश्चित केलें आहे; आणि कांहीं झालें तरी मी माझ्या निर्धारापासून एक तसूभरहि माघार घेणार नाहीं." आश्चर्याची गोष्ट अशी कीं, शेवटीं स्नोडन यांची तत्त्वनिष्ठाच प्रभावी ठरली आणि जी जागा हुजूर पक्षानें पंचवीस वर्षेंपर्यंत बळकावून ठेविली होती, ती स्नोडन यांनीं त्यांजपासून हिसकावून ते निवडणुकींत यशस्वी झाले! स्नोडन यांच्या भाषणपद्धतींतील कडवटपणा पार्लमेंटमधील सभासदांस रुचण्यासारखा नव्हता. पार्लमेंटमधील निरनिराळ्या पक्षांमध्यें कितीहि चुरस किंवा वैमनस्य असलें, व परस्परांवर टीका करतांना वक्त्यांनीं प्रसंगोपात्त कितीहि कठोर शब्द वापरले, तरी तेथील एकंदर वातावरण खेळीमेळीचें असल्यामुळें बहुतेक

सभासद एकमेकांशीं खिलाडू वृत्तीनेंच वागतात व आपल्या जळजळीत भाषणालासुद्धां विनोदाची मुरड घालून तें चटकदार करण्याचा प्रयत्न करतात. मर्मभेदक भाषणपद्धतीपेक्षां मार्मिकपणाकडे, विद्वत्तेपेक्षां विनोदाकडे आणि वक्तृत्वापेक्षां विवादनैपुण्याकडेच बहुतेक सभासदांचा कल असतो; नाहीं तर पार्लमेंटच्या बैठकी नेहमीं अगदीं कंटाळवाण्या झाल्या असल्या व दिवसभर काम करून थकलेल्या सभासदांना जागृत राहण्याकरितां फारच प्रयास पडले असते. परंतु काळवेळ न पाहतां लांबलचक व कंटाळवाणीं भाषणें करणारे, केवळ वक्तृत्व गाजविण्याकरितां शिरा तणाणून बोलणारे व लढाईचा आव आणून प्रतिपक्षावर तुटून पडणारे असे देखील कांहीं सभासद असतात. स्नोडन हे कंटाळवाणी भाषणेंहि करीत नसत किंवा वक्तृत्व गाजविण्याकरितां निरर्थक आलंकारिक भाषाहि वापरीत नसत. परंतु त्यांच्या भाषणांत समरभूमीचा आवेश फार असल्यानें पार्लमेंटांतील बहुतेक प्रमुख सभासद त्यांस वचकूनच असत. त्यामुळें स्नोडन यांस पार्लमेंटांत फारशी लोकप्रियता मिळवितां आली नाहीं. स्नोडन यांस विनोदाचें अगदीं वावडें होतें असें नाहीं; परंतु एखाद्या वक्त्यानें आपल्या विनोदपूर्ण भाषणानें सभासदांच्या तोंडावर हास्यलहरी उत्पन्न केल्यानंतर संतापानें त्याच्या कपाळावर लगेच आठ्या पडतील असें त्वेषयुक्त भाषण करण्याला स्नोडन यांस बिलकुल दिक्कत वाटत नसे. अंदाजपत्रकासारख्या महत्त्वाच्या पण आंकडेशास्त्रामुळें रूक्ष वाटणाऱ्या विषयावरहि आपल्या विनोदप्रचुर भाषणानें सभागृहांत हास्याच्या उकळया फोडण्याबद्दल चर्चिल यांची ख्याति होती. अर्थात् आपल्या अंदाजपत्रकांतील वैगुण्यें श्रोत्यांच्या ध्यानांत येऊं नयेत व तें लवकरच पसार व्हावें हाच आपल्या भाषणांत विनोदाची पेरणी करण्यांत

त्यांचा अंतस्थ हेतु असे. परंतु भाषण कितीहि विनोदी किंवा चटकदार असलें तरी त्यांतील दोषस्थळें नेमकीं रोखून ठेवून त्यावर आपल्या वक्तृत्वाचा तोफखाना चालविण्यांत स्नोडन यांचा हातखंडा होता. १९२९ सालीं इंग्लंडची आर्थिक परिस्थिति फार हलाखीची झाली होती. त्या सालीं ज्या निवडणुकी झाल्या त्यांत ही आर्थिक परिस्थिति सुधारण्याबद्दल आपल्या मतदारांना पोकळ आश्वासनें व गोड थापा देऊन चर्चिल हे निवडून आले. परंतु असल्या कोरड्या आश्वासनांनीं अंदाजपत्रकांतील तूट थोडीच भरून येणार होती ? पण चर्चिल हे राजकारणांत पक्के मुरलेले. अंदाजपत्रकांतील करवाढ कोणाच्या लक्षांत येऊं नये, व आलीच तरी ती निदान त्यांच्या डोळ्यांत खुपूं नये व म्हणून त्यांनीं सभासदांच्या डोळ्यांत आपल्या भाषणांतील विनोदाची धूळ फेकण्याचें ठरविलें, व तदनुसार असें कांहीं विनोदप्रचुर भाषण केलें कीं, सभागृह हास्यध्वनींनीं नुसतें दुमदुमून गेलें. चर्चिल यांनीं आपलें भाषण संपविलें तेव्हां तर टाळ्यांचा नुसता गजर झाला. परंतु त्यानंतर लगेच स्नोडन हे भाषण करावयास उभे राहिले व त्यांनीं आपल्या भाषणांतील पहिल्याच वाक्यानें चर्चिल यांनीं आपल्या वाक्चातुर्यानें मिळविलेलें सर्व श्रेय पुसून टाकलें. स्नोडन म्हणाले,— "मतदारांना पोकळ आश्वासनांची लांच देऊन निवडून आलेल्या सभासदाचें हें अंदाजपत्रक आहे हें विसरूं नका."

दुसऱ्या एका प्रसंगीं स्नोडन यांच्या विरुद्ध पक्षांतील एका सभासदानें भाषण करतांना स्नोडन यांजकडे पाहून ते आपल्या भाषणाला हसत आहेत असा उल्लेख केला. स्नोडन त्यांजवर एकदम उसळून म्हणाले—"मी हसत नसून तुला दांत विचकून दाखवीत आहे."

या उदाहरणांवरून स्नोडन यांच्या स्वभावांतील कडवटपणा व

भाषणांतील तिखटपणा यांची चांगलीच ओळख पटते. आपल्या स्वभावांतील ह्या विशेषाबद्दल स्नोडन यांनीं स्वतःच खुलासा केला आहे. ते म्हणतात—

" भाषणांतलि कडवटपणाबद्दल माझ्याइतकी दुसऱ्या कोणावर टीका झाली असेल असें वाटत नाहीं. परंतु माझे टीकाकार ज्याला कडवटपणा म्हणतात तो वस्तुतः कडवटपणा नसून, माझ्या सात्त्विक संतापाचा स्वाभाविक उद्रेक आहे. ढोंगी, अप्रामाणिक, लुच्चा आणि उडवाउडवींचीं उत्तरें देणाऱ्या वक्त्याची मला मनस्वी चीड येते; व त्यामुळें अंतःकरणांत तिरस्कार व चीड इत्यादि भावना आवरून धरण्यास माझें मन घेत नाहीं."

## स्नोडन व मॅक्डोनाल्ड

स्नोडन यांचें हें स्वभाववैशिष्टय लक्षांत घेतलें म्हणजे रॅम्से मॅक्डोनाल्ड यांच्याशीं त्यांचें कां पटलें नाहीं तें कळून येतें. दोघेही मजूरपुढारी म्हणून राजकारणांत पुढें आले तरी दोघांच्याहि स्वभावांत जमीन अस्मानाएवढें अंतर. रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचा जन्म गरीब कुळांत झाला होता तरी राजकारणांत प्रतिष्ठा प्राप्त होतांच त्यांचा स्वभाव पार बदलून गेला; किंवा खरें बोलायचें म्हणजे त्यांचा मूळचा स्वभाव प्रकट झाला. अहंमन्यता, तुसडेपणा, अधिकारलालसा मिरविण्याची अनिवार हौस, संदिग्ध व अर्थशून्य वक्तृत्व करण्याची सवय इत्यादि त्यांच्या स्वभावविशेषांमुळें त्यांचें स्वपक्षीय सहकाऱ्यांशीं व त्यांतून स्नोडन यांच्याशीं कधींच जमलें नाहीं. मजूर पक्षाचें पार्लमेंटमधील संख्याबल कमी झाल्यामुळें

जेव्हां राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यांत आलें तेव्हांपासून तर मॅक्डोनाल्ड हे स्वपक्षीयाशीं इतके फटकून वागूं लागले कीं, त्यांचे सहकारी त्यांस हुजूरपक्षीयच समजूं लागले. स्नोडन हे स्वपक्षाभिमानी, तत्त्वनिष्ठ, आणि आग्रही स्वभावाचे असल्यामुळें मॅक्डोनाल्ड यांची तत्त्वभ्रष्टता त्यांस बिलकुल मानवण्यासारखी नव्हती. स्नोडन हे खुल्या व्यापारी तत्त्वाचे पक्षपाती, जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां अगदीं नाइलाजानें त्यांनीं संरक्षक जकातींतील कांहीं भागांना मूक संमति दिली. परंतु बाहेरून येणाऱ्या खाण्याच्या पदार्थांवरहि जकात बसविण्यांत येऊन मजुरांच्या पोटावर पाय आणण्यांत आला तेव्हां स्नोडन यांचें पित्त खवळलें व ओटावा करारानें ह्या संरक्षक जकातीच्या धोरणावर कळसच चढविला. ह्या करारानें खुल्या व्यापाराच्या तत्त्वाला पूर्णपणें हरताळ फासला गेल्यामुळें, स्नोडन यांनीं संतापानें आपल्या प्रधानकीचा राजीनामा देऊन टाकला. ह्या प्रकरणासंबंधीं स्नोडन यांनीं काढलेले उद्‌गार मोठे उद्‌बोधक आहेत. रॅम्से मॅक्डोनाल्ड हे त्या वेळीं मुख्य प्रधान होते. त्यांना पाठविलेल्या एका पत्रांत स्नोडन म्हणतात—

"तीन आठवड्यांपूर्वी तुम्हीं माझ्याशीं चर्चा करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती; परंतु ती करण्याला तुम्हांला अजूनहि सवड सापडली नाहीं. गेला सर्व आठवडा व रविवारसुद्धां मी तुमच्याशीं चर्चा करण्याला वेळ मिळावा म्हणून मोकळा ठेवला होता. परंतु तुम्ही तो दिवस सायमन व बाल्डविन यांच्याच संगतींत घालविलात. ह्या सबंध वर्षांत तुमचें माझ्याशीं तीन मिनिटेंहि खाजगी संभाषण झालेलें नाहीं. ओटावा करारासारख्या महत्त्वाच्या बाबतींत तरी

माझीं मतें काय आहेत व माझें काय धोरण राहील हें तुम्हीं निदान समजावून घ्यावयास पाहिजे होतें."

स्नोडन यांनीं आपल्या प्रधानकीचा राजीनामा देण्याचा निश्चय मॅक्डोनाल्ड यांस कळविला तेव्हां त्यांनीं स्नोडन यांस राजीनामा न देण्याविषयीं विनंति केली. परंतु स्नोडन यांनीं त्यांस पत्र पाठवून असें कळविलें कीं, "ह्या (ओटावा) कराराशीं आपला कांहीं संबंध नसावा असें तुम्हांस वाटत असूनहि तुम्ही राष्ट्रीय सरकारच्या इभ्रतीसाठीं त्यांच्याशीं एकनिष्ठ राहण्याचें ठरविलेंत; परंतु व्यक्तिनिष्ठ राहण्याच्या विनंतीलाहि कांहीं मर्यादा आहेच; शिवाय प्रत्येकाला तत्त्वनिष्ठा म्हणून कांहीं असतेच कीं नाहीं?"

## स्नोडन यांचें अपेशी राजकारण

अशा रीतीनें राष्ट्रीय सरकारशीं सहकार्य करण्यांत स्नोडन यांनीं कांहीं काळपर्यंत आपली तत्त्वनिष्ठा कांहींशी ढिली केली होती तरी ती फार ताणली जात आहे असें दिसून येतांच त्यांनीं ती तुटूं नये म्हणून राष्ट्रीय सरकारशीं असलेला आपला संबंधच तोडून टाकला, व पर्यायानें राजसंन्यासच घेतला असें म्हणावयास हरकत नाहीं. स्नोडन हे राजकीय आखाड्यांत उतरल्यापासून त्यांनीं प्रतिपक्ष्यांशीं झुंज खेळण्यांत विलक्षण चिकाटी आणि असामान्य धैर्य दाखविलें ही गोष्ट त्यांच्या शत्रूंनींहि कबूल केली आहे. परंतु मजूर सरकार अधिकारारूढ होऊन स्नोडन यांना आपलीं तत्त्वें प्रत्यक्ष अमलांत आणण्याचा प्रसंग आला तेव्हां इंग्लंडमधील एकंदर राजकीय परिस्थितीनेंच त्यांना विरोध करावयाचा ठरवून त्यांच्या पदरीं अपयश बांधलें. १९२४ सालीं मजूर पक्षानें इंग्लंडचीं राज्यसूत्रें आपल्या हातांत

घेऊन कांहीं महिने होतात न होतात तोंच, झिनोव्हिफच्या बनावट पत्रानें लोकांत इतकी विलक्षण खळबळ उडवून दिली कीं, त्यामुळें पार्लमेंटांत मजूर पक्षाचा पराभव होऊन त्याला हातीं आलेलीं राज्य-सूत्रें लगेच सोडून द्यावीं लागलीं. पुढील पांच वर्षांत त्यांना हुजूर पक्षा-वर तोंडसुख घेण्याव्यतिरिक्त दुसरा कांहींच कार्यक्रम उरला नाहीं. १९२९ सालीं मजूर पक्षानें पार्लमेंटांत पुन्हा २६१ जागा काबीज केल्या; पण हुकमी बहुमत नसल्यामुळें त्यांस आपलें आसन टिक-विण्याकरितां उदार व स्वतंत्र पक्षाच्या सहानुभूतीवरच अवलंबून राहावें लागलें. मजूर पक्षाच्या दुर्दैवानें नेमकी ह्याच वेळीं जागतिक मंदीला विलक्षण तेजी येऊन बँकांचीं दिवाळीं निघालीं व जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. हुजूर पक्षाच्या कारकीर्दीतच इंग्लंडांतील बेकारांची संख्या इतकी वाढली होती कीं, सरकारला त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करण्याकरितां लक्षावधि पौंड एका बाजूला काढून ठेवावे लागले होते. बेकारांची ही संख्या मजूर सरकारच्या कारकीर्दींत वाढत जाऊन वीस लक्षांपर्यंत गेली, व स्नोडन यांस जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां करवाढ तर करावी लागलीच, पण मजुरां-च्या पगारांत कपात करून त्यांच्या कामाचे तासहि वाढवावे लागले. प्रत्यक्ष आईनेंच आपल्या मुलांच्या तोंडांतला घास काढून घेण्यांतलाच हा प्रकार झाला. मजुरांच्या हितास्तव स्नोडन यांनीं आपलें सर्व आयुष्य वेचलें; पण परिस्थितीनें शेवटीं त्यांजवर मजुरांचे पगार कमी करण्याची पाळी आणली. उदारमतवादी पक्षावर स्नोडन यांचा एवढा घुसा; पण पार्लमेंटपुढें अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वी त्यांस ॲस्क्विथ यांचे घरीं खेटे घालतां घालतां पुरेवाट झाली. नाहीं म्हणायला हेग कॉन्फरन्सच्या वेळीं जर्मनीकडून खंडणी वसूल करण्याचा प्रश्न निघाला त्या वेळीं

स्नोडन यांनीं इंग्लंडचे वतीनें जें खंबीर धोरण स्वीकारलें त्याबद्दल त्यांनीं सर्व पक्षांकडून शाबासकी मिळविली. पण हेग कॉन्फरन्सच्या वेळीं स्नोडन यांनीं स्वीकारलेलें धोरण एखाद्या हुजूरपक्षीय कडव्या सभासदाला शोभण्यासारखें होतें. मजूर पक्षातर्फे निवडून येऊनहि त्यांस आपल्या कारकीर्दींत विरोधी पक्षाशीं संगनमत व सहकार्य करावें लागलें. ज्यांना एका काळीं त्यांनीं शिव्यांची लाखोली वाहिली होती त्यांच्याशीं गोड बोलण्यावांचून त्यांना गत्यंतर उरलें नाहीं. परिस्थितीनें स्नोडन यांचा सूड घेतला तो असा. स्नोडन यांचें दुर्दैव इतकें खडतर कीं, विरोधकांशीं सहकार्य करूनहि त्यांना आपलें आसन स्थिर करतां आलें नाहीं. १९२९ सालीं राज्यकारभाराचा बोजा मजूर पक्षानें आपल्या शिरावर घेतल्यानंतर एकदोन वर्षांतच जागतिक मंदीनें इतकें उग्र स्वरूप धारण केलें कीं, स्नोडन यांस इंग्लंडचें सुवर्णचलन टिकविण्यास आटोकाट प्रयत्न करावे लागले व शेवटीं तें टिकविणें अशक्य झालेलें पाहून मजूर पक्षाला अपयश पदरीं घेऊन अधिकारत्याग करावा लागला. आणि मौज अशी कीं, सुवर्ण-चलन टिकवण्याचीं अभिवचनें देऊन हुजूर पक्षानें राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं व तीं हातीं येतांच सुवर्णचलनाचा त्याग केला.

स्नोडन यांना सार्वजनिक आयुष्यांत जरी अशा रीतीनें अपयशाचे धनी व्हावें लागलें, तरी त्यांचें खाजगी वैवाहिक आयुष्य मात्र पूर्ण सुखांत गेलें. त्यांना देखणी, सुशील व प्रेमळ पत्नी लाभली होती. स्नोडन ह्यांनीं आपल्या वयाच्या चाळिसाव्या वर्षीं विवाह केला. हा विवाह-समारंभ ज्या दिवशीं साजरा करण्यांत आला तो महिन्याचा तेरावा दिवस होता. तेरा हा आंकडा अशुभ मानला जातो. त्या लोक-भ्रमाला उद्देशून स्नोडन यांनीं काढलेले उद्गार त्यांचें वैवाहिक आयुष्य

...प्रकाश...



किती सुखाचें गेलें ह्याची उत्तम साक्ष पटवितात. ते म्हणतात कीं, " तेरा ह्या आंकड्याच्या अशुभत्वाविषयीं जो सार्वत्रिक समज वा गैर-समज आहे त्यांत कितपत तथ्य आहे हें मला माहीत नाहीं; परंतु माझ्या वैवाहिक आयुष्याला आज तिसांपेक्षां अधिक वर्षे होऊन गेलीं त्यावरून मी खात्रीपूर्वक म्हणून म्हणूं शकतों कीं, ह्या तेराच्या सिद्धान्ताला अपवाद असूं शकतात." स्नोडन यांनीं आत्मचरित्र लिहिलें तें त्यांनीं आपल्या प्रेमळ पत्नीसच अर्पण केलें आहे. स्नोडन यांस अपत्यसुख लाभलेलें नाहीं; कदाचित् 'तेरा' या आंकड्याचाच हा परिणाम असेल !

# लॉर्ड बर्कनहेड्

“ Born for success, be secured
With grace to win, with heart to hold
With shining gifts that took all eyes.”

## त्यांचें चरित्र काय शिकवितें ?

मृत्युसमयीं लॉर्ड बर्कनहेड् यांचें वय अठ्ठावन वर्षांचें होतें. इंग्लंड-मधील दीर्घायुषी पुरुषांची परंपरा पाहतां बर्कनहेड्साहेबांचें निधन कांहींसें अकालींच झालें असें म्हणावयास हरकत नाहीं. चौसष्ट वर्षांचे मॅक्डोनाल्ड व सत्तराच्या घरांत येऊं घातलेले लॉइड जॉर्ज यांची काम करण्याची आजची धडाडी पाहिली म्हणजे बर्कनहेड् यांना इहलोकींची यात्रा जरा लवकरच संपवावी लागली असें म्हटलें पाहिजे! खरें पाहिलें असतां ‘इहलोकींची यात्रा’ हा प्रयोग बर्कनहेड् यांच्या आयुष्याला अनुलक्षून यथार्थतेनें लावतांच येणार नाहीं. कारण ‘इहलोकींची यात्रा’ या प्रयोगावरून ह्या जगांतील आयुष्याला यात्रेचें धार्मिक स्वरूप दिलें जातें, एवढेंच नव्हे तर परलोकहि अभिप्रेत केला जातो! बर्कनहेड् यांच्या आयुष्यविषयक तत्त्वज्ञानांत या दोन्ही कल्पनांना



लॉर्ड बर्कनहेड्

बिलकुल स्थान नाहीं! परलोकाच्या अस्तित्वाविषयीं व तो असल्यास तेथील भ्रामक सुखदुःखांसंबंधीं विचार करून आपला इहलोकीचा अमूल्य वेळ फुकट घ्यावयाला ते तयार नव्हते; आणि येथील आयुष्याला यात्रेची उपमा देण्याइतका धर्मावर व धार्मिक आचारांवर त्यांचा विश्वास नव्हता. जग ही एक रणभूमि असून पैसा, सुख आणि कीर्ति हीं मिळविण्याकरितां प्रत्येकानें धैर्यानें लढलें पाहिजे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुष्टयांतील मधले दोन हेच काय ते खरे पुरुषार्थ होत! हे दोन अर्थ प्राप्त करून घेण्याकरितां प्रत्येकानें स्वार्थाची कास जरूर धरली पाहिजे. जो स्वार्थसाधु नाहीं तो साधूच नव्हे! असें बर्कनहेड म्हणतात. "Self-interest not only is but must be and ought to be the mainspring of human conduct." बर्कनहेड् यांची विचारसरणी ही अशा प्रकारची असल्यामुळें, त्यांची वाणी आणि करणी कोणत्या प्रकारची होती याची सहज कल्पना करतां येण्यासारखी आहे; परंतु एवढ्यावरून बर्कन-हेड् यांचें तत्त्वज्ञान चार्वाकपद्धतीचें होतें असें म्हणतां येणार नाहीं. "भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः" या वचनावर जरी त्यांचा दृढ विश्वास होता, तरी चार्वाकाच्या "ऋणं कृत्वा घृतं पिबेत्" या उक्तींतील पूर्वार्ध त्यांनीं कधींच मान्य केला नसता व यामुळें त्यांचें चरित्र जरी उदात्त वाटलें नाहीं, तरी उज्ज्वल वाटतें. तूपसाखर खाण्याला त्यांची ना नव्हती; परंतु ती खाण्याला दुसऱ्याजवळ तोंड वेंगाडून भीक मागण्याची चार्वाकाची नामर्दपणाची नीति त्यांना नापसंत होती. सुखाचें ध्येय पुढें ठेवणें यांत कांहींच वाईट नाहीं; परंतु तें मिळविण्या-करितां स्वतः खपलें पाहिजे तरच जन्माला आल्याचें चीज; नाहीं तर आयुष्यांत कांहींच स्वारस्य राहणार नाहीं. बर्कनहेड् यांच्या चरित्र-

वाचनापासून जरी दुसरा कांहीं फायदा झाला नाहीं. तरी 'उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः' या श्लोकांतील आत्मप्रत्ययाची शिकवण मनावर उत्तमपणें ठसण्याला अनुकूल असेंच त्यांचें चरित्र आहे हें मान्य केलें पाहिजे.

## शाळा-कॉलेजांतील दिवस

बर्कनहेड् यांनीं जो मोठेपणा मिळविला व जें यश संपादन केलें तें सर्व स्वतःच्या कर्तबगारीवर होय. त्यांचा जन्म श्रीमंत घराण्यांत झाला नसल्यामुळें उद्योगाचें त्यांना बाळकडूच मिळालें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. लहानपणापासूनच वाचनाची गोडी त्यांच्या वडिलांनीं त्यांना लाविली असल्यामुळें, शाळेंत नांव मिळविण्याला बर्कनहेड् यांना फारसे प्रयास पडले नाहींत. शाळेंत असतांना त्यांना अभ्यासाइतकीच खेळ खेळण्याचीहि आवड असे. उत्कृष्ट बुद्धिमत्ता, आणि उंच व काटक शरीरयष्टि हीं त्यांना जन्मतःच लाभलीं असल्यामुळें, शाळेंत आणि शाळेबाहेरील क्रीडांगणांत त्यांनीं पहिल्या प्रतीचें प्रावीण्य मिळविलें. शाळेंतील यशापयशावर पुढील आयुष्यांतील यशापयश अवलंबून असतें अशी त्यांची समजूत होती व ती निदान त्यांच्या बाबतींत तरी बरोबर ठरली असें मान्य केलें पाहिजे. प्रवेश-परीक्षेंत त्यांनीं इतके चांगले गुण मिळविले कीं, ऑक्सफोर्ड येथें कॉलेजांत त्यांना शिष्यवृत्ति देण्यांत आली. या कॉलेजांत बर्कनहेड् यांनीं आपल्या पुढील आयुष्याचा पाया घातला असें म्हणावयास हरकत नाहीं; कारण ज्या गुणसमुच्चयामुळें पुढें त्यांनीं पैसा आणि कीर्ति मिळविली त्या गुणांचा विकास ह्या कॉलेजांतील अनुकूल वातावरणांत त्यांनीं प्रथम करून घेतला. कॉलेजांत असतांना आपल्या बुद्धिमत्तेची चमक दाखविण्याची एकहि संधि त्यांनीं वायां जाऊं

दिली नाहीं. तेथें असतांना एकामागून एक बक्षिसें काबीज करण्याचा त्यांनीं जणूं विडाच उचलला होता असें म्हणावें लागतें. तथापि त्यांनीं खरें नांव कमविलें तें तेथील वक्तृत्वोत्तेजक सभांतूनच होय. वडील बॅरिस्टर असल्यामुळें बर्कनहेड् यांना वक्त्याचे गुण आनुवंशिकपणानेंच प्राप्त झाले होते असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्या गुणाला बुद्धिमत्ता, धडाडी आणि उद्योग यांची जोड मिळाल्यामुळें बर्कनहेड् हे कॉलेजांत असतांनाच नामांकित वक्ते म्हणून गाजले; एवढेंच नव्हे तर पुढें लवकरच त्यांना तेथील वक्तृत्वसभेचे अध्यक्षहि नेमण्यांत आलें. कॉलेजांतील शिक्षणक्रम आटोपल्यानंतर त्यांना तेथें वेतन देऊन फेलो नेमण्यांत आलें. या स्वकष्टार्जित पैशाचा उपयोग आपलें वाकिलीचें बस्तान नीट बसेपर्यंत आपणाला फार चांगला झाला असें त्यांनीं म्हटलें आहे.

## वडिलांचें भाकित

बॅरिस्टर झाल्यानंतर बर्कनहेड् यांना पैसा व नांव कमावण्यास फार अवधि लागला नाहीं. त्यांची गणना लवकरच प्रमुख बॅरिस्टरांत होऊं लागली. बर्कनहेड्च्या वडिलांना आपल्या मुलाच्या बुद्धिमत्तेंतील चमक त्याच्या लहानपणींच दिसून आली असली पाहिजे. याला कारण त्यांचे पुढील उद्गार होतः—

"There is no reason in the world why you should not become Lord Chancellor." वडिलांचें हें भाकित बर्कनहेड् यांनीं पुढें लवकरच खरें करून दाखविलें. मुख्य न्यायाधीश असतांना त्यांनीं जे निवाडे दिले आहेत ते त्यांच्या सूक्ष्म बुद्धिमत्तेची उत्तम साक्ष पटवितात असें तज्ज्ञांचें मत आहे. त्यांचें

Fourteen English Judges हें पुस्तक देखील प्रसिद्ध असून फार वाखाणण्यांत येतें.

## उत्कृष्ट वक्ते

बर्कनहेड् हे उत्कृष्ट वक्ते असल्याबद्दल वर उल्लेख आलाच आहे. त्यांचें वक्तृत्व किती श्रेष्ठ दर्जाचे असे याची यथार्थ कल्पना दोन दाखले दिले असतां सहज होईल. नुकतेच परलोकवासी झालेले टी. पी. ओकोनर हे एकदां ज्या परगण्यातर्फे पार्लमेंटकरितां उभे राहिले होते, त्याच परगण्यातर्फे बर्कनहेड् हे देखील उमेदवार म्हणून उभे राहिले. निवडणुकीकरितां बर्कनहेड् यांनीं व्याख्यानांचा जो दौरा काढला होता त्यांत एका ठिकाणीं त्यांनीं इतके उत्कृष्ट भाषण केलें कीं, त्यांनीं तें सर्व भाषण पहिल्यापासून शेवटपर्यंत पुनः करावें म्हणून टाळ्यांच्या कडकडाटांत श्रोतृवर्गाकडून त्यांना आग्रह करण्यांत आला! जो प्रकार फक्त नाटकगृहांतच पाहावयास सापडतो तो नाटकगृहाबाहेर आपल्या बाबतींत होईल अशी बर्कनहेड् यांना कल्पनाहि नसल्यामुळें त्यांना साभिमान आश्चर्य वाटलें असेल अशी कल्पना करावयास हरकत नाहीं. पार्लमेंटांत बर्कनहेड् ह्यांनीं ज्या वेळीं पहिल्यांदा भाषण केलें त्या वेळींहि एक मौजेचा प्रकार घडला. बर्कनहेड् यांचें नांव F. E. Smith असें आहे हें पुष्कळांस माहीत नसण्याचा संभव आहे. W. H. Smith या नांवाचे दुसरेहि एक सभासद त्या वेळीं पार्लमेंटांत होते. अध्यक्षांनीं Mr. Smith असें म्हणतांच ते दोघे सभासद आपल्याच नांवाचा पुकारा झाला असें समजून बोलावयास एकदमच उभे राहिले. बर्कनहेड् ह्यांनीं आपल्या भाषणास सुरुवात करतांच या दुसऱ्या स्मिथचे शब्द त्यांच्या कानीं पडूं लागले, व हे आपल्या शब्दाचे

प्रतिध्वनिच होत आहेत कीं काय असाहि त्यांना भास झाला. पुढें हे दुसरे स्मिथ विनयशीलपणें लवकरच खालीं बसल्यामुळें बर्कनहेड् यांच्यावर आलेली आपत्ति दूर झाली! बर्कनहेड् यांनीं प्रास्ताविक शब्द बोलून झाल्यानंतर जेव्हां आपल्या खऱ्या भाषणास सुरुवात केली तेव्हां सर्व सभागृह तटस्थ झालें व प्रत्येकजण या नवीन पोरसवदा वक्त्याकडे आश्चर्ययुक्त आदरानें पाहूं लागला. बर्कनहेड् यांचें भाषण संपतांच त्यांच्या पक्षाप्रमाणें विरुद्ध पक्षाकडूनहि टाळ्यांच्या गजरानें त्यांचें जें स्वागत करण्यांत आलें त्यावरून त्यांचें हें पहिलें भाषण किती परिणामकारक झालें असलें पाहिजे याची कल्पना येते.

## उतरती कळा

तथापि राजकारणांत बर्कनहेड् यांस यश संपादन करतां आलें नाहीं एवढेंच नव्हे, तर राजकारणांत शिरल्यापासून त्यांच्या यशाला उतरती कळा लागली असेंच म्हणावें लागतें. आणि बर्कनहेडसाहेबांचा स्वभाव लक्षांत घेतल्यास असें होणें अगदीं अपरिहार्य होतें. त्यांचा गर्विष्ठ आणि बेमुर्वतखोर स्वभाव, कनिष्ठांशींच काय पण वरिष्ठांशींहि त्यांचें अरेरावीचें वर्तन, वागणुकींतील तोरा व उच्छृंखलपणा, आणि बेलगामी व धमकीवजा भाषण करण्याची त्यांची प्रवृत्ति इत्यादि गुणावगुण व्यक्तिशः कितीहि नजरेंत भरणारे असले तरी, इंग्लंडांतील राजकीय वातावरणांत ते सर्वांच्या डोळ्यांत खुपणारेच ठरावेत यांत नवल तें काय? कुटिल नीतींत प्रवीण असलेल्या इंग्रज मुत्सद्द्यांस बर्कनहेड् यांचा सुलतानी सरळपणा आणि स्पष्टवक्तेपणा मानवणार कसा? बर्कनहेड् यांस, पक्षभेदावरच जिवंतपणा अवलंबून असलेल्या या राजकीय वातावरणांत लवकरच गुदमरल्यासारखें झालें. बाल्डविनसाहेबांच्या

बुद्धिमत्तेबद्दल बर्कनहेड् यांस बिलकुल आदर नसल्यामुळें त्यांचें पुढारीपण मान्य करून त्यांच्यापुढें मान वाकविण्यास त्यांस कमीपणा वाटूं लागला; शिवाय त्यांच्या दरबारी राहणीला व बादशाही खर्चाला त्यांचें वेतनहि कमी पडूं लागलें. वर्तमानपत्रांत राजकीय विषयांवर लेख लिहून पैसे मिळवावयालाहि बाल्डविन यांची बंदी! आयर्लंडच्या बाबतींत बर्कनहेड् यांस चांगली थप्पड बसलेली होतीच! दडपशाहीच्या वरवंट्याखालीं आयर्लंडमधील राजकीय चळवळ चिरडून टाकण्याची धमकी देणारे बर्कनहेड् पुढें लवकरच सामोपचाराची सौम्य भाषा वापरून तडजोड करण्यास तयार झाले हें पाहून कोणासहि बर्कनहेड यांची कींव आल्यावांचून राहणार नाहीं. परंतु आयर्लंडनें शिकविलेला राजकारणाचा हा पहिला धडा शिकण्याइतका बुद्धीचा विनयशीलपणा बर्कनहेड यांच्या ठिकाणीं कधींच आला नाहीं. पुढें बर्कनहेडसाहेब हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी नेमण्यांत आले. भारतमंत्र्याची ही जागा त्यांस केव्हांहि मानवण्यासारखी नव्हती. हिंदुस्थानचा राज्यकारभार इंग्लंडमधील व्हाइट हॉलच्या खोलींत बसून चालविणें हें खरोखरीच उंटावरून शेळ्या हाकण्यासारखें आहे! उर्मट भाषण करण्यास चटावलेल्या चवचाल जिभेची खुमखुम व्हाइसरॉयसाहेबांनीं हिंदुस्थानांतून पाठविलेल्या कागदांत डोकें खुपसून भागणार कशी? लॉर्ड चॅन्सेलर असतांना पार्लमेंटांत प्रतिपक्षावर वेळींअवेळीं वाटेल तसें तोंडसुख तरी घ्यावयास मिळे, पण हिंदुस्थानचें राजकारण पक्षभेदातीत असल्यामुळें हें शाब्दिक सौख्यहि बर्कनहेड् यांस आतां मिळेनासें झालें! याचा परिणाम शेवटीं व्हावयाचा तोच झाला. बर्कनहेड् यांनीं राजकारणांतून आपलें अंग काढलें व पैसा कमावण्याकरितां ते व्यापारांत शिरले.

मराठी ग्रंथ संग्रहालय



## वाङ्मय क्षेत्रांत

बर्कनहेड्सारख्या उच्छृंखल मनोवृत्तीच्या माणसाला इंग्लंडमधील नेमस्त राजकारणांत अपयश न येतें तरच नवल! त्यांच्या बेलगामी बुद्धिमत्तेला बेफामपणें दौड करावयाला वाङ्मयक्षेत्रांत त्यांना पुष्कळच अवसर मिळाला असता. कांहीं महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी निबंधसंग्रहाला त्यांनीं जी सुंदर प्रस्तावना लिहिलेली आहे त्यावरून राजकारणापेक्षां वाङ्मयांतच त्यांनीं चांगलें नांव कमाविलें असतें असें म्हणण्याचा मोह पडतो. राजकारणांतील प्रमुख व्यक्तींचा परिचय करून देण्याकरितां त्यांनीं लिहिलेली लेखमाला पुस्तकरूपानें जी प्रसिद्ध आहे तीवरून बर्कनहेड् यांस लेखनकला चांगली अवगत होती असें म्हणावें लागतें. त्यांचा वाङ्मयाचा व्यासंग जरी प्रदीर्घ नव्हता, तरी आपले विचार थोडक्यांत व सुमक रीतीनें वाचकांसमोर मांडण्याइतकी भाषाशैली त्यांनीं हस्तगत केली होती. राजकारणांत डिझरायली, काव्यांत टेनिसन व किप्लिंग, कादंबरीकारांत स्कॉट, डिकन्स, थॅकरे, डयूमा बॅल्झॅक, इतिहासकारांत गिबन व निबंधकारांत मेकॉले हे त्यांचे आवडते ग्रंथकार होते. शेक्सपियरचीं नाटकें त्यांनीं आदरपूर्वक वाचलीं होतीं. वाङ्मयांत जें जें दूरान्वित आणि दुर्बोध असे त्याचा त्यांना अत्यंत तिट्कारा होता. मेरिडिथच्या कादंबऱ्या क्लिष्ट म्हणूनच त्यांना वाचवत नसत. निसर्गाशीं तन्मय होणाऱ्या वर्डस्वर्थच्या तत्त्वज्ञानाची त्यांना जरा देखील सहानुभूति वाटत नव्हती. कार्लाइलचे विचार व ते मांडण्याची त्याची तऱ्हेवाईक पद्धति त्यांना नापसंत असल्यामुळें त्याजविषयीं त्यांचें मन कलुषित झालें होतें. शेले व कीट्स यांच्या काव्यांतील तत्त्वज्ञान खेरीजकरून बाकीचा भाग त्यांना प्रिय होता.

## ध्येयशून्य आयुष्य

एकंदर तत्त्वज्ञानाविषयीं बर्कनहेड् यांच्या मनांतील अढी लक्षांत घेतली म्हणजे प्रखर बुद्धिमत्ता असूनहि आयुष्यांत त्यांना चिरकालिक यश कां प्राप्त करून घेतां आलें नाहीं, याचें उत्तर मिळतें. बर्कनहेड् यांचें आयुष्य ध्येयशून्य होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. तात्कालिक मिळकत आणि मोठेपणा यांच्याच मागें ते सदैव लागलेले असत. भविष्यकाळाविषयीं विचार करून त्रिकालाबाधित सिद्धान्त काढण्याची त्यांच्या उथळ मनाला हौस नव्हती व शक्तिहि नव्हती. नाहीं म्हणावयाला इ. स. २०३० या सुमारास जगाची काय स्थिति असेल ( The World in 2030 ) याविषयीं त्यांनीं एक पुस्तक लिहिलें आहे. परंतु मौज अशी कीं, त्यांत त्यांनीं आधिभौतिक सुधारणांचाच ऊहापोह केला आहे; व त्यांतील बहुतेक विचार वेल्स वगैरे ग्रंथकारांनीं त्यांच्या अगोदरच जगापुढें मांडले आहेत. या पुस्तकांत त्यांनीं स्त्रीवर्गाच्या उन्नतीकरितां जे उपाय सुचविले आहेत ते फारसे उद्बोधक नसले तरी गमतीचे आहेत.

## स्त्रीवर्गाविषयीं मतें

बर्कनहेड् यांच्या मताप्रमाणें स्त्री-स्वातंत्र्याच्या मार्गांत येणारी मुख्य अडचण म्हणजे त्यांची गर्भधारणा व प्रसूतीनंतर त्यांना करावें लागणारें अपत्यसंगोपन ही होय. ही अडचण दूर करण्याकरितां त्यांनीं असा उपाय सुचविला आहे कीं, स्त्रीच्या ठिकाणीं गर्भधारणा झाली कीं, तो गर्भ तिच्या पोटांतून काढून त्याची वाढ कृत्रिम साधनांनीं घडवून आणावी! अशा रीतीनें वाढविण्यांत येणाऱ्या बालकांना त्यांनीं Test tube baby अशी संज्ञा दिली आहे. गर्भधारणेला आणि अपत्यसंगोपनाला कंटाळलेल्या स्त्रीवर्गाला ही हकीकत वाचून

भविष्यकालीन अशा परिस्थितींतहि पुढील शतकांतील या भाग्यशाली स्त्रियांविषयीं मत्सर वाटेल यांत शंका नाहीं; परंतु ललना सर्व बाबतींत पुरुषवर्गाची बरोबरी करूं शकणार नाहींत हा बर्कनहेड् यांचा अभिप्राय जर त्यांना कळला, तर त्यांना आनंद होईल कीं दुःख वाटेल तें सांगतां येणार नाहीं! बर्कनहेड् म्हणतात कीं, स्वातंत्र्या-करितां धडपडणाऱ्या स्त्रियांची पुरुषवर्गाबद्दल मुख्य तक्रार हीच कीं जगांत पुढें येण्याला पुरुषवर्गाप्रमाणें त्यांना अनुकूल संधि व वातावरण मिळत नाहीं. बर्कनहेड् यांचें त्यावर उत्तर असें कीं, जगांत जे थोर व कीर्तिमान् पुरुष होऊन गेले ते सर्व प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर देऊनच पुढें आले. बर्कनहेड् म्हणतात—

"These feminine champions explain away the fact that history has yet to record the triumphs of superb female genius by pointing out that, until the present day, women have laboured under acute educational and social disadvantages compared with men. This argument is specious but it is absurd. Most of the male genius which has illuminated past ages sprung from obscure and poor surroundings. It was uneducated; it was unendowed with either social advantage or wealth; it achieved its self-expression in spite of rather than by the aid of society."

माझ्या भगिनीवर्गापैकीं कोणी तरी बर्कनहेड् यांच्या वरील दर्पोक्ती-ला समर्पक उत्तर द्यावें अशी माझी त्यांना विनंति आहे. असो.

## सुरनळा पेटला आणि विझला

बर्कनहेड् यांना आपल्या बुद्धिमत्तेबद्दल फार घमेंड होती. त्यांच्या पक्षाचे पुढारी बाल्डविन यांची बुद्धिमत्ता केवळ दुय्यम दर्जाची (second-class brains) असें म्हणून त्यांचा उपहास करण्यालाहि त्यांनीं कमी केलें नाहीं. तथापि निव्वळ पहिल्या प्रतीच्या बुद्धिवैभवावर जगांत यश आणि मोठेपणा हीं मिळवितां येतात असें नाहीं. या गोष्टीचें आकलन त्यांच्या बुद्धीला करतां आलें नाहीं. बुद्धिमत्तेपेक्षांहि जगांत सत्यनिष्ठा आणि तत्त्वनिष्ठा यांना अधिक मोल आहे. बर्कनहेड् हे सत्यनिष्ठ नव्हते व तत्त्वनिष्ठ तर खास नव्हते. उदात्त ध्येय डोळ्यांसमोर ठेवून तें साध्य करण्याकरितां त्या ध्येयाला आपली बुद्धि अर्पण करून स्वतःसहि वाहून घेण्यासारखी त्यांची मनोरचनाच नव्हती. तत्त्वज्ञानाबद्दल म्हणूनच त्यांना तिटकारा वाटत असे. त्यांचें आयुष्य एखाद्या धूमकेतूप्रमाणें भासलें तें यामुळेंच. त्यांच्या आयुष्याच्या यशाची कमान दिवाळींत लाविल्या जाणाऱ्या सुरनळ्याप्रमाणें एकदम चढत गेली, पण लगेच एकाएकीं विझूनहि गेली. दिवाळींतील दारूकाम आपण मौजेनें पाहतों; परतु झपाट्यानें पेटणाऱ्या या दारूचें क्षणभंगुरत्व आपल्या नजरेस तात्काळ आल्याखेरीज राहत नाहीं. दारूंत दाहकशक्ति आहे व तिचा प्रकाशहि एकदम बराच पडतो; परंतु लांबच्या प्रवासाला या प्रकाशाचा उपयोग होणार नाहीं. बर्कनहेड् यांची बुद्धिमत्ता कांहीं काळपर्यंत जरी तेजाळपणें चमकली तरी भविष्यकाळांतील मार्ग शोधून काढण्याकडे तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं असाच निष्कर्ष शेवटीं काढावा लागतो.

---

या पुस्तकांतील सर्व चित्रें व वेष्टनावरील चित्र हीं सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डी. डी. दलाल यांनीं काढिलीं आहेत.

# खुलासा

पुस्तकांत प्रस्तावना सुरुवातीला छापलेली असते तरी ती लिहिलेली असते शेवटींच. प्रस्तुत पुस्तकांत ती शेवटींच छापण्याचें ठरविल्या-मुळेंच प्रस्तावनेचा हा 'खुलासा' करावा लागत आहे.

पंधरा वर्षांपूर्वी बर्नार्ड शॉ यांजवर एक लेखमाला लिहिण्याची मी तयारी करीत होतों. त्याकरितां वाङ्मयक्षेत्रांतील त्यांचे प्रतिस्पर्धी जी. के. चेस्टर्टन् याचें लिखाण मला वाचावें लागलें. त्यांचे ग्रंथ मला इतके चटकदार वाटले कीं, शॉ यांजवर लिहिण्यापूर्वी चेस्टर्टन्वरच लिहिण्याचें मीं ठरविलें व त्यांजवर तीन लेखांक लिहिले. ते त्या वेळीं अत्यंत लोकप्रिय झालेल्या 'रत्नाकर' मासिकांत १९३० सालीं छापले गेले. हे तिन्ही लेखांक प्रस्तुत पुस्तकांत समाविष्ट केले आहेत. पुढें १९३६ सालीं चेस्टर्टन् ख्रिस्तवासी झाले, तेव्हां 'ज्योत्स्ना' मासिकांत मीं त्यांजवर मृत्युलेख लिहिला. परंतु पुनरुक्ति टाळावी म्हणून तो या पुस्तकांत घेतला नाहीं.

चेस्टर्टन् यांजवरील लेखमाला मीं ज्या वेळीं लिहिली, त्या वेळीं शॉ, वेल्स, चेस्टर्टन्, गॉल्स्वर्दी, आणि आर्नोल्ड बेनेट इत्यादि लेखक इंग्रजी वाङ्मयांत अग्रेसर समजले जात होते. या सर्वांवर लहान मोठे लेख लिहिण्याचा माझा विचार होता; त्यांपैकीं वेल्स यांचे ग्रंथ वाचण्याच्या माझ्या गतीपेक्षां त्यांची ग्रंथ लिहिण्याची गति अधिक प्रभावी ठरल्या-मुळें मला त्यांजवर लेख लिहिणें शक्य झालें नाहीं. गॉल्स्वर्दीवर 'प्रतिभा' पाक्षिकांत मीं एक लेख लिहिला होता. आर्नोल्ड बेनेट अशा चमत्कारिक वेळीं मरण पावले कीं, मला त्यांचा मृत्युलेख लगेच लिहिणें शक्य नव्हतें; कारण ते ज्या महिन्यांत मरण पावले त्या वेळीं माझी एम्. ए.ची परीक्षा अगदीं गळ्याशीं आली होती. त्यामुळें परीक्षेच्या व्यापांतून मोकळा झाल्यावर बेनेटवर लेख लिहिला व तो

१९३१ च्या जूनच्या 'रत्नाकरां'त प्रसिद्ध झाला. या लेखांत बेनेट यांच्या वाङ्मयापेक्षां त्यांच्या व्यक्तित्वाचाच परिचय करून देण्याचा मीं प्रयत्न केला आहे.

१९२५ ते १९३५ या दरम्यानच्या काळांत आपल्या इकडील सुशिक्षित तरुणांना रशियानें वेड लावलें होतें. याचा परिणाम तत्कालीन मराठी वाङ्मयावर झालेला दिसून येईल. या काळांत कलेकडे पाहण्याचा नेहमींचा दृष्टिकोन बदलून वाङ्मयांत साम्यवादाच्या अनुषंगानें नवीन शब्द रूढ होऊं लागले. सुप्रसिद्ध क्रांतिकारक कलावन्त मॅक्झिम गॉर्की याच्या मृत्यूनंतर कांहीं दिवसांनीं १६ सप्टेंबर १९३६ रोजीं हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं गॉर्की-दिन साजरा करण्यांत आला. त्या वेळीं 'ज्योत्स्ने'च्या वाचकवर्गाला गॉर्कीचा परिचय करून द्यावा म्हणून मीं त्याजवर जो लेख लिहिला तोच प्रस्तुत पुस्तकांत उद्धृत केला आहे.

१९२४ सालीं इंग्लंडांत मजूरपक्ष प्रथमच अधिकारारूढ झाला. इंग्लंडच्या इतिहासांत ही घटना अपूर्व होती. हिंदुस्थानांतील लोकांच्या राजकीय आकांक्षांनाहि या घटनेमुळें आशेचे नवीन अंकुर फुटूं लागले (हे पुढें अगदीं अल्पावधींतच करपून गेले ही गोष्ट वेगळी). मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड हे मजुरांचे पुढारी म्हणजे गरिबांचे कैवारी. त्यांत आणखी त्यांनीं पूर्वीं हिंदुस्थानला भेट देऊन या हतभागी देशाच्या आकांक्षांविषयीं सहानुभूति प्रकट केलेली. त्यामुळें ते इंग्लंडचे मुख्य प्रधान होतांच त्यांजविषयीं गौरवपर लेख जिकडे तिकडे येऊं लागले. मी देखील नवीनच सुरू झालेल्या 'प्रगति' या साप्ताहिकांत मॅक्डोनाल्ड यांजवर एक परिचयात्मक लेख लिहिला. तेव्हांपासून ब्रिटिश पार्लमेंटमधील प्रमुख व्यक्तींविषयीं अनेक ग्रंथ आणि लेख माझ्या वाचनांत आले व प्रसंगोपात्त त्या व्यक्तींवर निरनिराळ्या नियतकालिकांतून मीं अनेक लेख लिहिले. प्रस्तुत पुस्तकांतील लॉर्ड बर्कनहेड व फिलिप स्नोडन् यांजवरील लेख त्यांपैकींच होत.

इंग्लंडांतील प्रसिद्ध क्रिकेट-पटूंचीं वर्णनें इंग्लिश वर्तमानपत्रांतून आणि मासिकांतून वारंवार वाचावयास मिळत. पण त्यांना प्रत्यक्ष पाहण्याची संधि एम्. सी. सी. नें क्रिकेटची टीम हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरविल्यापासून मिळूं लागली. मध्यंतरीं ऑस्ट्रेलियन क्रिकेट टीमहि हिंदुस्थानांत आली होती. ज्या प्रसिद्ध खेळाडूंचा टीममध्यें अंतर्भाव करण्यांत आला नव्हता, त्यांना हिंदुस्थानांतील कांहीं संस्थानिकांनीं येथें आणलें. अशा रीतीनें निरनिराळ्या प्रसंगीं हॉब्ज, सट्क्लिफ्, टेट्, व्हेरिटी, वायट, जार्डिन, ग्रिमेट, सॅन्डहॅम्, रायडर इत्यादि सुप्रसिद्ध खेळाडूंचा खेळ मला अनायासें पाहावयास मिळाला. परंतु त्या सुमारास कीर्तिशिखरावर आरूढ झालेला ब्रॅडमन् कांहीं हिंदुस्थानांत येण्याचें लक्षण दिसेना. तेव्हां शेवटीं ब्रॅडमन्वर लेखच लिहावयाचें ठरविलें. हा लेख 'ज्योत्स्ने'च्या १९३७ च्या एप्रिलच्या अंकांत प्रसिद्ध झाला होता. वाङ्मय-क्षेत्रांतून क्रीडाक्षेत्रांत उतरण्याचा अपराध माझ्या हातून कां घडला याचा उलगडा या खुलाशावरून होईल.

परंतु याहिपेक्षां माझ्या हातून घडलेले अघोर अपराध म्हणजे ग्रीटा गार्बो व चार्ली चॅप्लिन यांजवरील माझे लेख! माझ्या लेखनाविषयीं थोडाबहुत आदर असलेल्या माझ्या एका स्नेह्यानें गार्बोवरील माझा लेख जेव्हां पाहिला, तेव्हां लेखक या नात्यानें माझ्या अधःपातास सुरुवात झाली अशी भावना त्याच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झालेली मला दिसली. पण लेखकवर्गालाहि क्रिकेटचे सामने आणि चित्रपट पाहावयाचा अधिकार असला पाहिजे अशा मताचा मी आहे. तेव्हां प्रेक्षक या नात्यानें आपलें मत सांगण्याचा हा हक्क प्रस्थापित करण्याच्या इराद्यानेंच मी चार्ली चॅप्लिन आणि ग्रीटा गार्बो यांजवर लेख लिहिण्यास प्रवृत्त झालों, हें या ठिकाणीं नमूद करून ठेवतों. अमेरिकेंतील सिनेमा-नटींविषयीं चरित्रविषयक माहिती देण्यांत धोका असा होता कीं, लेख लिहून तो छापून प्रसिद्ध होण्याच्या दरम्यानच्या काळांतच ती

काडीमोड करून दुसऱ्या कोणाशीं तरी विवाहबद्ध झालेली असा-
वयाची ! पण गार्बोवरील लेख लिहून आज चार वर्षें होऊन गेलीं तरी ती लेखांत चित्रित केल्याप्रमाणेंच अद्यापि राहिली आहे. नाहीं म्हणायला कांहीं महिन्यांपूर्वीं प्रसिद्ध झालेल्या 'निनोच्का' या बोलपटांत गार्बो खदखदां हसतांना दृष्टीस पडते एवढेंच !

प्रस्तुत पुस्तकांत माझे जे लेख घेण्यांत आले आहेत त्यांची पार्श्व-भूमि समजावी म्हणून मीं हा येवढा खुलासा केला. पुण्यांतील देशमुख आणि कंपनी या प्रकाशन-संस्थेचे व्यवस्थापक श्री. रा. ज. देशमुख यांनीं मोठ्या हौसेनें सदरहू लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें मनावर घेतलें. त्यांनीं हें पुस्तक अत्यंत सुंदर आणि सुबक रीतीनें छापल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सुविख्यात आर्टिस्ट दलाल यांनीं काढललीं चित्रें इतकीं उत्तम उतरलीं आहेत कीं, फोटोवरून ब्लॉक्स करूनहि तीं तितकीं हुबेहूब दिसलीं नसतीं. प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध झालेलें पाहण्याला माझा धाकटा भाऊ विश्वनाथ या वेळीं हयात असता तर त्याला माझ्या-पेक्षांहि अधिक आनंद त्याला झाला असता; कारण माझें अशा स्वरूपाचें पुस्तक प्रसिद्ध व्हावें अशी त्याची फार फार इच्छा होती. ती त्याची इच्छा पूर्ण होण्याच्या आधींच तो आम्हांला सोडून गेल्यामुळें हें पुस्तक मीं त्याच्या प्रेमळ स्मृतीस अर्पण केलें आहे.

६१५१
REFBK-0006151